जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, मंगळवार १७ नोव्हेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०



'तुम्ही त्या खुर्चीवर बसण्यास पात्र नाहीत'

वकिलाची सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्याबद्दल आक्षेपार्ह टिप्पणी

नवी दिल्ली/वृत्तसंस्था-सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सुर्य कांत यांच्याबद्दल एका वकिलाने एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान आक्षेपार्ह टिप्पणी केल्याचा प्रकार सोमवारी (१६ नोव्हेंबर) घडला आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.एका प्रकरणाबाबत तातडीच्या सुनावणीची मागणी करत एका वकिलाने सरन्यायाधीश सूर्य कांत यांना 'तुम्ही त्या खुर्चीवर बसण्यास पात्र नाहीत' असं म्हणत आक्षेपार्ह टिप्पणी केली. या प्रकारानंतर सर्वोच्च न्यायालयातील ➪(पान २ वर)

रोहित पवारांकडून VSR कंपनीच्या परदेशातील कोट्यवधींच्या संपत्तीचा गौप्यस्फोट

'मफलर मॅन' म्हणून दाखवला मुख्यमंत्री फडणवीसांचा फोटो!

अजितदादांच्या विमान अपघातप्रकरणी पुन्हा गंभीर आरोप

- VSR च्या मालकाला वाचवले जात असल्याचा दावा, अमेरिकेतील आलिशान गाड्या
- फ्लोरिडातील १८ कोटींचे घर व दुबईतील विमानांच्या व्यवहारांवर प्रश्नचिन्ह

सीबीआय चौकशीची मागणी



मुंबई/प्रतिनिधी- दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताला साडेनऊ महिने उलटूनही अंतिम चौकशी अहवाल जनतेसमोर आलेला नसल्याच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी सोमवारी पुन्हा एकदा गंभीर आरोप केले. विमान चालवणाऱ्या रेड कंपनीच्या मालकांचे राजकीय संबंध, परदेशातील कथित कोट्यवधींची मालमत्ता, विमानांचे व्यवहार आणि अपघाताच्या आसपासच्या काळातील संशयास्पद आर्थिक व्यवहारांचा मुद्दा उपस्थित करत त्यांनी राज्य सरकार आणि तपास यंत्रणांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

विशेष म्हणजे गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेल्या 'मफलर मॅन'चा उल्लेख करत रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा एक फोटो दाखवला. हा फोटो VSR कंपनीचे मालक व्ही. के. सिंग यांचे पुत्र रोहित सिंग यांच्या विवाहसमारंभातील असल्याचे त्यांनी सांगितले.'मुख्यमंत्री फडणवीस यांचा अजितदादांच्या अपघाताशी किंवा घातपाताशी संबंध आहे, असे मी म्हणत नाही. मात्र VSR कंपनी आणि तिच्या मालकाला वाचवण्याचा प्रयत्न होत असल्याचा आमचा आरोप आहे,' असे पवार यांनी स्पष्ट केले.

'मफलर मॅन'च्या फोटोमुळे राजकीय चर्चांना उधाण- रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेत रोहित सिंग यांच्या विवाहसमारंभातील काही छायाचित्रे आणि व्हिडिओ दाखवले.जयपूर येथे नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेल्या या विवाहसोहळ्यास विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थिती लावली होती, असा दावा त्यांनी केला. या कार्यक्रमातील एका छायाचित्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मफलर घातलेल्या अवस्थेत दिसत असल्याचे सांगत रोहित पवार यांनी त्यांचा फोटो पत्रकार परिषदेत प्रदर्शित केला. या फोटोमध्ये राघव शर्मा नावाची व्यक्तीही असल्याचा त्यांनी उल्लेख केला. VSR कंपनीचे मालक व्ही. के. सिंग आणि त्यांच्या कुटुंबीयांचे राज्यातील प्रभावशाली नेत्यांशी संबंध असल्याचा दावा त्यांनी केला. विवाहसोहळ्यातील अनेक फोटो आणि व्हिडिओ नंतर इंटरनेटवरून हटवण्यात आल्याचाही आरोप त्यांनी केला. मात्र फोटो किंवा विवाहसमारंभातील उपस्थिती याकरून कोणत्याही व्यक्तीचा विमान अपघाताशी थेट संबंध सिद्ध होत नाही.

'व्ही. के. सिंग आणि रोहित सिंग यांना अटक करा!'-अजित पवार यांच्या अपघातानंतर संबंधित विमान कंपनीच्या व्यवस्थापनावर कोणती कायदेशीर कारवाई करण्यात आली, असा सवाल रोहित पवार यांनी उपस्थित केला. VSR कंपनीचे मालक व्ही. के. सिंग आणि रोहित सिंग यांची सखोल चौकशी करण्यात यावी. आवश्यक पुरावे ➪(पान २ वर)

SC/ST आरक्षणावर सुप्रीम कोर्टाचा मोठा निर्णय

जिल्हा परिषदेत रोटेशन पद्धतीवर सरकारचा हक्क मान्य



नवी दिल्ली/वृत्तसंस्था- सुप्रीम कोर्टाने देशातील निवडणूक आरक्षण आणि मतदारसंघांच्या रोटेशनसंदर्भात सोमवारी एक महत्त्वपूर्ण निकाल दिला. कायद्यानुसार SC/ST समुदायांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राजकीय प्रतिनिधित्व मिळते, परंतु एखादा विशिष्ट मतदारसंघ कायमस्वरूपी किंवा ठराविक कालावधीसाठी आरक्षित राहील याची हमी दिली जात नाही असं कोर्टाने म्हटलं. हे प्रकरण महाराष्ट्रातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या जागांच्या आरक्षणाशी संबंधित होते. आरक्षणाचा उद्देश साध्य करण्यासाठी कायदेशीर चौकटीचे पालन करणे आवश्यक असले तरी जागांचे आरक्षण वैयक्तिक पसंतीच्या आधारावर ठरवता येणार नाही असं कोर्टाने स्पष्ट केले.

२०२५ मध्ये महाराष्ट्र सरकारने जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांमधील आरक्षणाच्या रोटेशनसाठी नवीन नियम लागू केले. या नियमांनी १९९६ च्या जुन्या नियमांची जागा घेतली. नवीन नियमांमधील नियम १२ नुसार आरक्षित जागांच्या रोटेशनची गणना करण्यासाठी एक नवीन आधार निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार २०२५ च्या दुरुस्तीनंतर होणारी पुढील सार्वत्रिक निवडणूक ही रोटेशनची सुरुवात मानली जाईल. या वादाला आव्हान देणारी याचिका सुरुवातीला मुंबई हायकोर्टाने फेटाळून लावली होती. नंतर याचिकाकर्त्याने हे नियम बदल रद्द करण्यासाठी सुप्रीम कोर्टात अपील केले.

याचिकाकर्त्यांच्या विरोधाची प्रमुख कारणे- नवीन नियमामुळे आरक्षणाचे रोटेशन केवळ कागदोपत्री मर्यादित राहू शकते. कमी अनुसूचित जाती/जमाती लोकसंख्या असलेल्या मतदारसंघांना दीर्घकाळ आरक्षणाच्या संधी मिळणार नाहीत. त्यांनी या नियमाला मनमानी आणि संविधानाच्या अनुच्छेद १४ अंतर्गत समानतेच्या हक्काचे उल्लंघन असल्याचा याचिकाकर्त्यांनी युक्तिवाद केला. नवीन रोटेशनमुळे जुन्या आरक्षण रोटेशन लाभांवर परिणाम होईल अशीही या याचिकेत चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

राखीव जागांच्या हक्कावर सुप्रीम कोर्टाची सुनावणी आणि निर्णय- महाराष्ट्रातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी राखीव जागांच्या रोटेशन पद्धतीला आव्हान देणाऱ्या रूपाली इंद्रभूषण सोंडे विरुद्ध महाराष्ट्र राज्य आणि इतर या खटल्याची सुनावणी करताना, भारताचे सरन्यायाधीश (CJI) सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची व व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने हायकोर्टाच्या निर्णयाबरोबरच ➪(पान २ वर)

CRPF वर हल्ला करणाऱ्या २ दहशतवाद्यांचा एन्काउंटर

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- पाच दिवसांपूर्वी कुलगाम जिल्ह्यातील लारू येथील सीआरपीएफ चौकीवर तैनात असलेल्या जवानांवर ३० गोळ्या झाडणाऱ्या दोन दहशतवाद्यांना लष्कराने ठार केले. या हल्ल्यात तीन जवान जखमी झाले.काश्मीर झोन पोलिसांनी सांगितले की, ठार झालेले दहशतवादी हे खोऱ्यातील लश्कर-ए-तोयबाचा एकमेव उरलेला कमांडर लतीफ भट आणि त्याचा साथीदार उमर होते. सुरक्षा यंत्रणांनी उमरचा मृतदेह ताब्यात घेतला आहे, परंतु लतीफचा मृतदेह अद्याप सापडलेला नाही. ठार झालेला दहशतवादी लतीफ भट यावर्षी कुलगाम आणि अनंतनागमध्ये झालेल्या मालिकेतील हल्ल्यांमध्ये सहभागी होता. यामध्ये अनंतनागच्या लाल चौकात पोलिस कर्मचाऱ्यांची हत्या आणि कुलगाममध्ये दोन स्थलांतरित मजुरांची हत्या यांचा समावेश आहे.एका लष्करी अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, दहशतवाद्यांविषयी माहिती मिळाल्यानंतर जम्मू आणि काश्मीर पोलीस आणि सुरक्षा दलांच्या संयुक्त पथकाने तो परिसर सील केला.शोधमोहीम एका संदिग्ध ठिकाणाजवळ पोहोचताच, लपून बसलेल्या दहशतवाद्यांनी सुरक्षा दलांवर गोळीबार केला. दोन्ही बाजूंनी चकमक सुरू झाली. तीन तासांच्या चकमकीनंतर ते ठार झाले. चकमकीदरम्यान, लष्कराने चकमकीच्या ठिकाणाजवळील शाळांमधून मुलांना सुरक्षितपणे बाहेर काढले. जम्मू-काश्मीरच्या कुलगाम जिल्ह्यात बुधवारी दुपारी दुचाकीवरून आलेल्या हल्लेखोरांनी सीआरपीएफच्या अखरान कॅम्पमध्ये नाकाबंदीसाठी तैनात जवानांवर गोळीबार केला होता.

ऑपरेशन सिंदूरनंतर तणाव शिगेला, तरीही पाकिस्तानी मंत्री दिल्लीत येत आहेत




नवी दिल्ली/वृत्तसंस्था- ऑपरेशन सिंदूरनंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील राजनैतिक आणि क्रीडा क्षेत्रातील संबंध कमालीचे ताणले गेलेले असतानाच, आता दोन्ही देश पुन्हा एकदा एका आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर समोरासमोर येणार आहेत. २० ते २२ नोव्हेंबरदरम्यान नवी दिल्लीतील ऐतिहासिक पुराना किल्ला येथे होणाऱ्या शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनायझेशनच्या (SCO) 'सिव्हिलायझेशनल डायलॉग फोरम'मध्ये पाकिस्तानचे हवामान बदल मंत्री डॉ. मुसादिक मसूद मलिक सहभागी होणार आहेत. मात्र, या दौऱ्यामागे द्विपक्षीय शांतता चर्चा हा उद्देश नसून बहुपक्षीय राजनैतिक आणि सामरिक समीकरणे त्यामागे दडलेली आहेत.

मे २०२३ मध्ये तत्कालीन परराष्ट्रमंत्री बिलावल भुट्टो झरदारी गोव्यातील SCO बैठकीसाठी भारतात आले होते. त्यानंतर प्रथमच पाकिस्तानचे केंद्रीय मंत्री भारतात येणार आहे. मात्र, या दौऱ्याचा अर्थ भारत-पाकिस्तान संबंधांमध्ये सुधारणा किंवा द्विपक्षीय चर्चेची सुरुवात असा लावता येत नाही. या घडामोडीमागे बहुपक्षीय राजनैतिक, प्रादेशिक हितसंबंध आणि सामरिक समीकरणे आहेत.

SCO चा उद्देश काय घटना?- १५ जून २००१ रोजी स्थापन झालेली एस्ट ही युरेशिया क्षेत्रातील राजकीय, आर्थिक आणि सुरक्षाविषयक सहकार्य करणारी इंटरगव्हर्नमेंटल संघटना आहे. चीन, रशिया, भारत, पाकिस्तान, इराण, बेलारूस, कझाकस्तान, किर्गिझस्तान, ताजिकिस्तान आणि उझबेकिस्तान असे तिचे दहा सदस्य देश आहेत. अफगाणिस्तान आणि मंगोलिया निरीक्षक देश आहेत. दहशतवाद, फुटीरतावाद, कट्टरवाद, प्रादेशिक सुरक्षा, व्यापार, ऊर्जा, वाहतूक आणि सांस्कृतिक देवाणघेवाण हे संघटनेच्या कामकाजाचे प्रमुख विषय आहेत. २०१७ साली भारत आणि पाकिस्तान यांना संघटनेचे पूर्ण सदस्यत्व देण्यात आले. त्यामुळे दोन्ही देशांमधील द्विपक्षीय संबंध ➪(पान २ वर)

अयोध्येनंतर आता श्रीकृष्ण जन्मभूमी अजेंडा टॉपवर

भाजपाच्या चिंतन बैठकीत मोठ्या निर्णयाचे संकेत



नवी दिल्ली/वृत्तसंस्था- उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपानं आपला अजेंडा आणि रणनीती अभियान आखायला सुरुवात केली आहे. त्यातूनच सोमवारपासून भाजपाची २ दिवसीय चिंतन बैठक सुरू झाली आहे. मथुरेतील या महत्त्वाच्या चिंतन बैठकीत श्रीकृष्ण जन्मभूमीचा मुद्दा भाजपाच्या मुख्य अजेंड्यात समाविष्ट करण्यात आला आहे. माहितीनुसार, बैठकीत या संवेदनशील आणि महत्त्वाच्या विषयावर गंभीर विचारमंथन करण्याची ➪(पान २ वर)

एनसीएमसी स्मार्ट कार्ड व ई-बसमुळे एसटीच्या अमरावती विभागाचे उत्पन्न रिव्हर्स गिअरमध्ये, १.८८ कोटींचा फटका

जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन; तोट्याची रक्कम सरकारने द्यावी - बरगे


अमरावती/प्रतिनिधी- एनसीएमसी स्मार्ट कार्डच्या सक्तीमुळे आणि इलेक्ट्रिक बस वाहतुकीमुळे अमरावती विभागाच्या उत्पन्न रिव्हर्स गिअर मध्ये असून उत्पन्नात मोठी घट झाली आहे. या दोन्ही योजना सरकारच्या असून, या योजनांमुळे झालेल्या तोट्याची रक्कम सरकारने द्यावी, अशी मागणी महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी अमरावतीचे जिल्हाधिकारी, श्री आशिष येरेकर यांना निवेदन देऊन केली आहे.

हे निवेदन आज जिल्हाधिकारी यांना त्यांच्या कार्यालयात देण्यात आले. या निवेदनाद्वारे राज्य शासनाच्या वित्त व परिवहन विभागाकडे पाठविण्याची विनंती करण्यात आली आहे. यावेळी संघटनेचे, अमरावती विभागाचे अध्यक्ष जयंत मुळे, विभागीय सचिव संदीप मुळे, पंकज देशमुख, प्रवीण चरपे, योगेश कोकाटे, राम अजमेरे, प्रमोद दीपटे, उमेश

उंबरकर, शिवदास स्वर्गे आदी पदाधिकारी उपस्थित होते. सप्टेंबर २०२६ मध्ये एनसीएमसी स्मार्ट कार्डमधून ३.५५ कोटी रुपये उत्पन्न मिळाले होते. ऑक्टोबर २०२६ मध्ये हेच उत्पन्न केवळ १.८४ कोटी रुपयांवर आले आहे. म्हणजेच केवळ एका महिन्यात १.७१ कोटी रुपयांचे उत्पन्न कमी झाले आहे. याशिवाय इलेक्ट्रिक बसमधून सप्टेंबरमध्ये १.३३ कोटी रुपये उत्पन्न मिळाले होते, ते ऑक्टोबरमध्ये १.१६ कोटी रुपयांवर आले आहे. याचाच अर्थ इलेक्ट्रिक बस वाहतुकीत सुद्धा १७ लाखांची घट झाली आहे.म्हणजेच केवळ ऑक्टोबर महिन्यात या दोन्ही योजनांमुळे अमरावती विभागाला एकूण १ कोटी ८८ लाख रुपयांचा तोटा झाला आहे. एकाच महिन्यात इतक्या मोठ्या प्रमाणात उत्पन्न घटणे ही गंभीर बाब असल्याचे निवेदनात म्हटले आहे. ➪(पान २ वर)

रात्रीच्या अंधारात दोन चिमुकल्या मुलींना रस्त्यावर सोडले;

एसटीच्या चालक-वाहकाचे थेट निलंबन!



नागपूर/प्रतिनिधी- एसटी बसमधून प्रवास करणाऱ्या दोन अल्पवयीन मुलींना रात्रीच्या अंधारात रस्त्यावर उतरविण्याचा धक्कादायक प्रकार समोर आल्यानंतर एसटी प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. या प्रकरणी संबंधित चालक आणि वाहकाला निलंबित करण्यात आले आहे. माध्यमांमधून हा प्रकार उघड झाल्यानंतर परिवहन मंत्र्यांनी तातडीने हस्तक्षेप केला. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी एसटी कर्मचाऱ्यांची असून, भविष्यात अशा प्रकाराची पुनरावृत्ती झाल्यास संबंधितांना थेट सेवेतून बडतर्फ केले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

नेमकी घटना काय घडली होती? १४ नोव्हेंबर २०२६ रोजी भंडारा आगाराच्या एसटी बसमधून दोन अल्पवयीन मुली प्रवास करीत होत्या. या मुलींना रात्रीच्या वेळी रोहा येथे अंधारातच बसमधून उतरविण्यात आल्याचा प्रकार समोर आला. रात्रीच्या वेळी दोन चिमुकल्या मुलींना अशा प्रकारे रस्त्यावर सोडल्याने त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला. या घटनेचे वृत्त स्थानिक वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या आणि समाजमाध्यमांवर प्रसिद्ध झाल्यानंतर एसटी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्न उपस्थित झाले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन एसटी प्रशासनाने प्राथमिक चौकशी सुरू केली. भंडारा विभाग नियंत्रक आणि आगार ➪(पान २ वर)

फॉर्म ६ कुणी बदलला, SIR चा निर्णय कुणाचा..?

◆ इंडिया आघाडीचे ४८ प्रश्न, सुप्रीम कोर्टात याचिका ◆

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- इंडिया आघाडीच्या नेत्यांनी सुप्रीम कोर्टात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, इतर दोन्ही आयुक्त आणि आयोगाच्या आयटी महासंचालकांशी वैयक्तिक चौकशी करण्याची परवानगी मागितली आहे. विरोधकांनी सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली आहे. ज्यात SIR प्रक्रियेशी निगडित अनेक त्रुटींवर प्रश्न विचारले आहेत. मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर आयुक्तांना विचारण्यात येणारे प्रश्न SIR निगडित असल्याचं काँग्रेसचे म्हणणं आहे.

आपल्या याचिकेत विरोधी आघाडीने आयोगाला कथित मतदान गैरप्रकार आणि मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरावलोकनाशी (SIR) संबंधित ४८ मूलभूत प्रश्न विचारले आहेत. निवडणूक आयोगाने सुप्रीम कोर्टात जे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे त्यात मतचोरी आणि एंट



निगडित कुठल्याही मुख्य प्रश्नाला उत्तर दिले नाही असा आरोप विरोधी पक्षांनी केला आहे. त्यामुळे विरोधकांनी सुप्रीम कोर्टात ४८ प्रश्नांची यादी सोपवली आहे ज्यात निवडणूक आयुक्तांकडून वैयक्तिक उत्तर मागितले आहे. एंट प्रक्रियेत अनेक त्रुटी होत्या. त्यामुळे मोठ्या प्रमाणात मतदारांची नावे हटवण्यात आली. त्यातून कथित मतचोरीचा मार्ग मोकळा झाला असं विरोधकांचे म्हणणं आहे.

विरोधी पक्षाने त्यांच्या प्रश्नांच्या यादीत देशव्यापी एसआयआर (SIR) राबवण्याचे, फॉर्म ६ मध्ये सुधारणा करण्याचे आणि ईआरओनेट (ERONET) व ईसीआयनेट (ECINET) चे केंद्रीकरण करण्याचे निर्णय कोणी घेतले याबद्दलच्या प्रश्नांचा समावेश आहे. इतकेच नाही तर इतर दोन निवडणूक आयुक्तांनी मुख्य निवडणूक आयुक्तांशी किती निर्णयांवर असहमती दर्शवली असा प्रश्नही त्यांनी विचारला आहे.

चांदी-सोने स्वस्त

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- चांदीच्या दरात आज मोठी घसरण झाली आहे. इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन (IBJA) नुसार, १ किलो चांदीची किंमत ८,७२०



रुपयांनी घसरून १.६९ लाख रुपयांवर आली आहे.दुसरीकडे, १० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याचे दर १,४२९ रुपयांनी घसरून १.३४ लाख रुपयांवर आले आहेत. गेल्या आठवड्याच्या शेवटच्या व्यवहाराच्या दिवशी म्हणजेच १३ नोव्हेंबर रोजी सोने १.३६ लाख रुपये आणि चांदी १.७८ लाख रुपयांवर होती.या महिन्यात आतापर्यंत चांदी १७,००० ➪(पान २ वर)

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
paper www.janmadhyam.com

पान १ व १० वरून

तुम्ही त्या खुर्चीवर बसण्यास

ऑडिओ आणि व्हिडीओ लाईव्ह स्ट्रीमिंग तात्काळ बंद करण्यात आल्याची माहिती सांगितली जात आहे. या संदर्भातील वृत्त 'लाईव्ह लॉ'ने दिलं आहे. वृत्तानुसार, सर्वोच्च न्यायालयात सोमवारी एका वकिलाने एका प्रकरणावर तातडीच्या सुनावणीची मागणी केली. मात्र, यावेळी त्या वकिलाने सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्याबद्दल वैयक्तिक आणि आक्षेपार्ह टिप्पणी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यानंतर संबंधित वकिलाला सर्वोच्च न्यायालयामधून बाहेर काढण्यात आलं. या सर्व प्रकारामुळे काहीवेळ गोंधळ निर्माण झाला होता. या प्रकारानंतर कामकाजाचे ऑडिओ आणि व्हिडीओ प्रक्षेपण काही वेळासाठी बंद करण्यात आलं होतं, असं वृत्तात म्हटलं आहे.दरम्यान, संबंधित वकिलाने सरन्यायाधीशांना बोलताना म्हटलं की, 'तुम्ही या खुर्चीवर बसण्यास पात्र नाहीत. तुमच्यात प्रामाणिकपणा नाही' अशी टिप्पणी त्या वकिलाने केली. ही टिप्पणी करण्यामागचं कारण म्हणजे सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी त्या वकिलाला काही वेळ वाट पाहण्यास सांगितलं होतं.झालं असं की २ नोव्हेंबर रोजी सरन्यायाधीशांच्या कार्यालयात संबंधित वकिलाने एका प्रकरणाबाबत कागदपत्रे सादर केली होती. मात्र, त्यावर अद्याप कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. हे प्रकरण अवमान याचिकेशी संबंधित असल्याचं वृत्तात म्हटलं आहे. या प्रकरणावर संबंधित वकिलाने तातडीने सुनावणी घेण्याची मागणी केली. पण त्या वकिलाला सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी 'आम्ही पाहू, तुम्ही थोडा वेळ थांबा', असं सांगितलं. मात्र, तो वकील थांबण्यास तयार नव्हता. त्या वकिलाने लगेच म्हटलं की, 'तुम्ही त्या खुर्चीवर बसण्यास पात्र नाहीत. कारण तुमच्याकडे प्रामाणिकपणा नाही.' दरम्यान, या प्रकारानंतर काही जणांनी त्या वकिलाच्या वर्तनाबद्दल कारवाई करण्याची मागणी केली आहे.

रोहित पवारांकडून VSR कंपनीच्या

आढळल्यास त्यांच्यावर गुन्हे दाखल करून अटकेची कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. अपघाताच्या तांत्रिक चौकशीवरोबरच संभाव्य गुन्हेगारी निष्काळजीपणा किंवा अन्य गैरप्रकारांचा स्वतंत्र तपास होणे आवश्यक असल्याचे सांगत त्यांनी हे प्रकरण राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडून (CID) केंद्रीय अन्वेषण विभागाकडे (CBI) सोपवावे, अशी मागणी केली.

VSR च्या परदेशातील मालमत्तेबाबत गंभीर आरोप- रोहित पवार यांनी व्हीं कंपनीशी संबंधित व्यक्तींच्या परदेशातील कथित संपत्तीची माहिती पत्रकार परिषदेत मांडली. त्यांच्या दाव्यानुसार, कंपनीशी संबंधित व्यक्तींचे दुबईत व्यावसायिक हितसंबंध असून, तेथे महागडी विमाने आणि अमेरिकेत आलिशान गाड्या तसेच मालमत्ता आहेत. राहुल सिंग यांच्याकडे गोल्डन व्हिसा असल्याचा दावा करत त्यांनी दुबईतील कंपनीच्या नोंदणीबाबतही माहिती दिली. ग्लोबल ५०० प्रकारच्या एका विमानाची किंमत सुमारे १५० कोटी रुपये असल्याचा दावा करत या विमानाशी संबंधित मालकी आणि व्यवहारांची चौकशी करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

'विश्वसमुद्र' या हैदराबादस्थित कंपनीचाही उल्लेख करून संबंधित विमानांच्या मालकीबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले.मात्र या विमानांची मालकी, नोंदणी आणि आर्थिक व्यवहारांची स्वतंत्र अधिकृत पडताळणी अद्याप झालेली नाही.

अमेरिकेतील कोट्यवधींच्या आलिशान गाड्या कोणाच्या?- रोहित पवार यांनी अमेरिकेतील महागड्या मोटारींचाही मुद्दा उपस्थित केला.साडेनऊ कोटी, साडेचार कोटी, साडेसात कोटी आणि अडीच कोटी रुपये किंमतीच्या आलिशान गाड्या रोहित सिंग, राहुल सिंग आणि व्ही. के. सिंग यांच्याशी संबंधित असल्याचा दावा त्यांनी केला.या गाड्या अमेरिकेत असल्याचे सांगत त्यांनी संबंधित व्यक्तींच्या उत्पन्नाचे स्रोत आणि मालमत्तेच्या व्यवहारांची चौकशी करण्याची मागणी केली. त्याचप्रमाणे N29VK या नोंदणी क्रमांकाच्या विमानाचाही उल्लेख त्यांनी केला.या मालमत्तांचा अजित पवार यांच्या विमान अपघाताशी काही संबंध आहे का, हे तपासातूनच स्पष्ट होऊ शकते.

'अजितदादांच्या निधनानंतर दोन दिवसांनी फ्लोरिडात १८ कोटींचे घर खरेदी!'- पत्रकार परिषदेतील आणखी एक महत्त्वाचा दावा म्हणजे अमेरिकेतील फ्लोरिडा राज्यातील कथित मालमत्ता व्यवहार. रोहित पवार यांच्या म्हणण्यानुसार, अजित पवार यांच्या निधनानंतर अवघ्या दोन दिवसांनी VSRशी संबंधित कुटुंबाने फ्लोरिडामध्ये सुमारे १८ कोटी रुपये किमतीची मालमत्ता खरेदी केली.ही मालमत्ता अमेरिकन रॅपर कोडॅक ब्लॅक यांच्याकडून खरेदी करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला.या व्यवहाराची तारीख, मालकी, रक्कम आणि निधीचा स्रोत यांची चौकशी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र ही कथित खरेदी, संबंधित व्यक्तींची मालकी आणि विमान अपघाताशी कोणताही संबंध स्वतंत्र पुराव्यांद्वारे सिद्ध झालेला नाही.

अपघाताच्या काळातील ५ कोटी ३३ लाखांच्या व्यवहारांवर प्रश्न- रोहित पवार यांनी शिवनिका ट्रस्ट आणि समता पतसंस्थेशी संबंधित आर्थिक व्यवहारांचाही मुद्दा उपस्थित केला.त्यांच्या दाव्यानुसार, २७ ते २९ जानेवारी २०२६ या कालावधीत समता पतसंस्थेमार्फत सुमारे ५ कोटी ३३ लाख रुपयांचे व्यवहार झाले.

२७ जानेवारीला व्यवहारांशी संबंधित १७ संदेश, तर २८ जानेवारीला १९ संदेश प्राप्त झाल्याचे सांगत त्यांनी या व्यवहारांच्या वेळेबाबत संशय व्यक्त केला. नेहमीच्या व्यवहारांच्या तुलनेत या काळातील व्यवहारांची संख्या वेगळी का होती, याचा तपास व्हावा, अशी मागणी त्यांनी केली.मात्र व्यवहारांची संख्या किंवा त्यांची वेळ यावरून ते बेकायदेशीर असल्याचे सिद्ध होत नाही. संबंधित बँकिंग नोंदी आणि व्यवहारांचे स्वरूप तपासणे आवश्यक आहे.

विमानातील इंधन, ब्लॅक बॉक्स आणि सुरक्षेबाबत सवाल- अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या तांत्रिक तपासाबाबतही रोहित पवार यांनी प्रश्न उपस्थित केले.विमानात पुरेसे इंधन होते काय, ब्लॅक बॉक्सची स्थिती नेमकी काय होती, विमानाच्या देखभालीत त्रुटी होत्या काय आणि विमानाच्या सुरक्षिततेसंबंधी पूर्वी काही आक्षेप नोंदवण्यात आले होते काय, याची उत्तरे मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (DGCA) VSR कंपनीच्या विमानांच्या कार्यपद्धतीत काही अनियमितता आढळल्याचा दावा त्यांनी केला.तांत्रिक अपघात तपास आणि फौजदारी तपास या दोन स्वतंत्र प्रक्रिया असून दोन्हीचे निष्कर्ष महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

फडणवीस यांच्यावर आरोप; भाजपचा पलटवार- रोहित पवार यांच्या आरोपांवर भाजपनेही प्रतिक्रिया दिली आहे.भाजपचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी रोहित पवार यांचे आरोप फेटाळून लावत त्यांच्यावर प्रसिद्धीसाठी राजकारण केल्याची टीका केली.VSR कंपनी २०१३ पासून विविध राजकीय पक्षांना आणि राज्य सरकारांना विमानसेवा देत असल्याने अनेक नेत्यांचे कंपनीशी व्यावसायिक संबंध आले असतील. विवाहसमारंभात उपस्थित राहणे किंवा एकत्र फोटो असणे यात गैरकाही नाही, अशी भूमिका बन यांनी मांडली. केवळ एका छायाचित्राच्या आधारे मुख्यमंत्री किंवा अन्य नेत्यांबाबत संशय निर्माण करणे योग्य नसल्याचे त्यांनी सांगितले.

'अजितदादांना न्याय मिळण्यासाठी सीबीआय चौकशी करा!'- अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर त्यांच्या कुटुंबीयांप्रमाणेच महाराष्ट्रातील जनतेलाही सत्य समजण्याचा अधिकार असल्याची भूमिका रोहित पवार यांनी मांडली.आपण अजितदादांचे पुतणे असल्याने या प्रकरणातील सत्य शोधण्याची आपली जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. प्रकरणातील सर्व कागदपत्रे, विमानाचे तांत्रिक तपशील, संबंधित कंपनीचे व्यवहार आणि संभाव्य निष्काळजीपणाची चौकशी निष्पक्षपणे होण्यासाठी सीबीआयकडे तपास सोपवण्यात यावा, अशी मागणी त्यांनी पुन्हा केली.

चौकशीचा निष्कर्ष समोर येणार कधी?- २८ जानेवारी २०२६ रोजी बारामतीजवळ झालेल्या विमान दुर्घटनेत अजित पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला होता.या दुर्घटनेला साडेनऊ महिने उलटले असताना अंतिम चौकशी अहवाल सार्वजनिक करण्याची मागणी अधिक तीव्र होत आहे. रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेत मांडलेले परदेशातील मालमत्तेचे व्यवहार, राजकीय संबंध आणि आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप हे तपासून पाहण्यासारखे मुद्दे असले, तरी त्यावरून कोणत्याही व्यक्तीचा गुन्ह्यात सहभाग सिद्ध झालेला नाही.

जिल्हा परिषदेत रोटेशन

घटनात्मक तथ्यांचाही विचार केला. कोणताही मतदार किंवा उमेदवार यांना विशिष्ट मतदारसंघ आरक्षित करण्याचा कोणताही अंगभूत कायदेशीर हक्क नाही. कायदा अनुसूचित जाती/जमातींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण सुनिश्चित करतो. याचा अर्थ एखादी विशिष्ट जागा आरक्षित राहील किंवा भविष्यात आरक्षित केली जाईल असा नाही. त्यामुळे केवळ एखाद्या भागासाठी आरक्षणाची अट पूर्ण होत नाही म्हणून तो नियम घटनाबाह्य घोषित केला जाऊ शकत नाही असं न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांनी स्पष्ट केले.

अनुसूचित जाती/जमातींच्या लोकसंख्येच्या घटत्या क्रमानुसार राखीव जागांचे रोटेशन केले जाऊ शकते. ही प्रक्रिया कशी आणि केव्हा राबवायची हे ठरवण्याचा अधिकार सरकारला आहे. नियम १२ अंतर्गत २०२५ च्या दुरुस्तीनंतर होणारी पुढील सार्वत्रिक निवडणूक हा प्रारंभ बिंदू मानल्याने कायद्यात नमूद केलेल्या आरक्षण आणि रोटेशनच्या तत्त्वाचे उल्लंघन होत नाही. या नियमात हस्तक्षेप करण्यासाठी न्यायालयाला कोणताही आधार आढळला नाही असं सुप्रीम कोर्टाने मत मांडले. महाराष्ट्र नियम २०२५ मधील नियम १२ घटनाबाह्य घोषित करण्याची मागणी करणारी याचिका स्वीकारण्यास सुप्रीम कोर्टाने नकार दिला. हा नियम मूलभूत आरक्षण किंवा जागा रोटेशन प्रणालीचे उल्लंघन करत नाही. याचिका फेटाळल्याने आरक्षित जागा रोटेशन प्रणालीवर पुनर्विचार करण्याची मागणी करणाऱ्या निवेदनांना सरकारकडे सादर करण्यापासून रोखले जाणार नाही असं याचिका फेटाळताना कोर्टाने म्हटले. कोर्टाने रोटेशन पद्धतीमधील सरकारचा हक्क मान्य केला आहे. हा निर्णय महाराष्ट्रातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांशी संबंधित आहे. त्यामुळे तो लोकसभा आणि विधानसभेतील राखीव जागांनाही लागू होतो असा अर्थ लावणे चुकीचे ठरेल कारण त्यासाठी स्वतंत्र घटनात्मक आणि कायदेशीर तरतुदी आहेत.

ऑपरेशन सिंदूरनंतर तणाव

तणावपूर्ण असले तरी संघटनेच्या अधिकृत बैठकांमध्ये सहभागी होण्याची संस्थात्मक चौकट कायम आहे.

नवी दिल्लीतील परिषद का महत्त्वाची?- SCOची ही परिषद म्हणजे सदस्य देशांच्या राष्ट्रप्रमुखांची वार्षिक शिखर परिषद नाही. तर ती सांस्कृतिक आणि नागरीकरणविषयक संवादासाठी आयोजित करण्यात आलेली स्वतंत्र बहुपक्षीय परिषद आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर २०२५ मध्ये तियानजिन येथील एस्क शिखर परिषदेत या संवादाची संकल्पना मांडली होती. त्यानंतर भारताने या परिषदेचे आयोजन करण्याची घोषणा केली.केंद्रीय संस्कृती आणि पर्यटनमंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनी सांगितले की, या परिषदेसाठी सदस्य देश, निरीक्षक आणि संवाद भागीदार अशा एकूण २५ देशांना निमंत्रित करण्यात आले. त्यासाठी १३ नोव्हेंबरपर्यंत १५ देशांनी सहभाग निश्चित केला होता. पुराना किल्ला येथे होणाऱ्या चर्चेत प्राचीन संस्कृती, कला-वास्तुकला, भाषा, साहित्य आणि हस्तलिखितांचा समावेश असेल. सांस्कृतिक वारशाच्या माध्यमातून नागरिकांमधील संबंध अधिक दृढ करणे हा यामागील उद्देश आहे.।? भारताने पाकिस्तानचे राष्ट्रीय वारसा आणि संस्कृतीमंत्री औरंगजेब खान खिची यांना निमंत्रण दिले होते. मात्र, पाकिस्तानने डॉ. मुसादिक मलिक यांची निवड केली. पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाने त्यांच्या नियुक्तीची अधिकृत घोषणा केली आहे. मलिक यांचा सिंधू नदीच्या पाणीवाटपाच्या प्रश्नावर भारताविरोधातील आक्रमक पवित्रा लक्षवधी आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने २३ एप्रिल २०२५ पासून १९६० चा सिंधू जलवाटप करार स्थगित ठेवण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे पाकिस्तानसाठी हा विषय केवळ दोन देशांमधील पाणीवाटपाचा राहिलेला नाही; तर तो पर्यावरण, जलसुरक्षा आणि आंतरराष्ट्रीय कायद्याशी संबंधित मुद्दा म्हणूनही मांडला जाण्याची शक्यता आहे. म्हणूनच त्यांनी केलेली हवामानमंत्र्यांची निवड या पार्श्वभूमीवर राजनैतिकदृष्ट्या महत्त्वाची ठरते.

ऑपरेशन सिंदूरनंतर भारताची भूमिका- २२ एप्रिल २०२५ रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला. त्यानंतर ७ मे २०२५ रोजी भारताने ऑपरेशन सिंदूरअंतर्गत हल्ला करून पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी पायाभूत सुविधा उद्ध्वस्त केल्या. पाकिस्तानसोबतचे द्विपक्षीय संबंध नियमित करायचे असतील तर सीमापार दहशतवाद थांबणे आवश्यक आहे, अशी ठाम भूमिका भारताने घेतली. त्यामुळे एस्क्च्या बैठकीत सहभाग म्हणजे द्विपक्षीय चर्चेला हिरवा कंदील नव्हे. बहुपक्षीय संघटनेतील सदस्यत्वाच्या जबाबदाऱ्या आणि द्विपक्षीय धोरण या दोन स्वतंत्र बाबी असल्याचे भारताच्या भूमिकेतून स्पष्ट होते.

पाकिस्तानमध्ये भारतीय अधिकाऱ्याचा दौरा- या संदर्भातील आणखी एक महत्त्वाची घटना म्हणजे सप्टेंबर २०२६ मधील भारतीय शिष्टमंडळाचा इस्लामाबाद दौरा. पराष्ट्र मंत्रालयातील अतिरिक्त सचिव आणि भारताचे एस्क राष्ट्रीय समन्वयक आलोक डिमरी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय प्रतिनिधींनी २८ ते ३० सप्टेंबरदरम्यान झालेल्या एस्क राष्ट्रीय समन्वयकांच्या बैठकीत सहभाग घेतला. ऑपरेशन सिंदूरनंतर भारतीय अधिकाऱ्यांचा पाकिस्तानमधील हा महत्त्वाचा अधिकृत सहभाग होता. या बैठकीत पाकिस्तानच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळातील आगामी कार्यक्रम आणि २०२७ मधील शिखर परिषदेची तयारी यांवर चर्चा झाली.

पाकिस्तानकडे एस्क्चे अध्यक्षपद- १ सप्टेंबर २०२६ रोजी विश्वेक येथे झालेल्या SCO राष्ट्रप्रमुखांच्या २६व्या बैठकीनंतर किर्गिझस्तानने संघटनेचे फिरते अध्यक्षपद पाकिस्तानकडे सोपवले. पाकिस्तानच्या २०२६-२७ या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात इस्लामाबाद येथे ऑगस्ट २०२७ मध्ये राष्ट्रप्रमुखांची शिखर परिषद होणार आहे. भारताला या संघटनेचा महत्त्वाचा सदस्य म्हणून त्यात सहभागी व्हायचे असल्याने पाकिस्तानच्या अध्यक्षपदाच्या काळात होणाऱ्या बैठकांपासून दूर राहणे भारतासाठी व्यावहारिक ठरणार नाही.

दहशतवादाच्या मुद्द्यावर भारताकडून पाठपुरावा- एस्क्च्या व्यासपीठावर भारत सातत्याने सीमापार दहशतवादाचा मुद्दा उपस्थित करत आहे. जून २०२५ मध्ये चीनमधील किंगदाओ येथे झालेल्या संरक्षणमंत्र्यांच्या बैठकीत संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी दहशतवादाचे सूत्रधार, संघटक, वित्तपुरवठादार आणि आश्रयदात्यांना जबाबदार धरण्याची मागणी केली. पहलगाम हल्ल्याचा उल्लेख संयुक्त दस्तऐवजात करण्यावर सदस्यांमध्ये एकमत न झाल्याने त्या बैठकीत सहमतीचा अंतिम दस्तऐवज प्रसिद्ध होऊ शकला नाही. ऑक्टोबर २०२६ मध्ये दुशान्बे येथे झालेल्या SCO सरकारप्रमुखांच्या बैठकीतही राजनाथ सिंह यांनी दहशतवादाला आर्थिक मदत आणि सुरक्षित आश्रय देणाऱ्या घटकांविरोधात सामूहिक कारवाईची मागणी केली. त्या वेळी पाकिस्तानचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्रमंत्री इशाक दार उपस्थित होते. भारतासाठी एस्क हे केवळ पाकिस्तानशी संवादाचे व्यासपीठ नाही. तर मध्य आशियातील ऊर्जा स्रोत, व्यापारीमार्ग, दळणवळण, दहशतवादविरोधी सहकार्य आणि चीन-रशियासारख्या प्रभावशाली देशांशी संबंध यासाठी ही संघटना महत्त्वाची आहे. अफगाणिस्तानमधील परिस्थिती, इराणशी संपर्क आणि युरेशियातील आर्थिक संधी यांचाही भारताच्या धोरणाशी संबंध आहे.

अयोध्येनंतर आता श्रीकृष्ण

तयारी सुरू आहे. ज्यामुळे भविष्यात एखादा मोठा निष्कर्ष किंवा ठोस रणनीती समोर येऊ शकते. मथुरेच्या पंडित दीनदयाल उपाध्याय गो अनुसंधान केंद्रात भाजपाच्या या चिंतन बैठकीला पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन, राष्ट्रीय संघटन महामंत्री बीएल संतोष, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि राज्यातील वरिष्ठ नेत्यांसह ५० दिग्गज पदाधिकाऱ्यांचा समावेश होता.

भाजपाच्या अजेंड्यावर श्रीकृष्ण जन्मभूमी- मथुरा श्रीकृष्ण जन्मभूमीचा प्रश्न लवकरात लवकर सोडवून त्याचा निकाल लावावा यासाठी भाजपाच्या तळागाळातील कार्यकर्त्यांकडून वरिष्ठ नेतृत्वावर मोठा दबाव आहे. भाजपा कार्यकर्ते सातत्याने तशी मागणी करत आहेत की या मुद्द्यावर निर्णायक पाऊल उचलायला हवे. त्यामुळे मथुराच्या या बैठकीत श्रीकृष्ण जन्मभूमी अजेंडा केंद्रस्थानी आला आहे. या शिबिरात श्रीकृष्ण जन्मभूमीच्या मुद्द्यासंदर्भात सरकार आणि संघटना यांच्यात उत्तम समन्वय आणि सहकार्य प्रस्थापित करण्यावरही विशेष जोर देण्यात आला. या बैठकीला उपस्थित असलेले वरिष्ठ नेते जनभावनेनुसार ठोस परिणाम साधता यावेत यासाठी कायदेशीर, प्रशासकीय आणि राजकीय स्तरावर पुढे कसे जायचे याचा आढावा घेत आहेत.दरम्यान, या बैठकीवरून राजकीय हालचालींना वेग आला आहे. ज्याप्रकारे या चिंतन शिबिरात मुख्य अजेंडे मांडण्यात आले, त्यावरून मथुरातील श्रीकृष्ण जन्मभूमी प्रकरणावर लवकरच काही मोठे घडणार असे संकेत मिळत आहेत. श्रीकृष्ण जन्मभूमी मंदिर निर्माण हे भाजपाच्या मुख्य अजेंड्यात आहे, कारण पक्षातील कार्यकर्त्यांच्या भावनेचा हा विषय आहे. अयोध्येत राम मंदिर, वाराणसी येथे काशी विश्वनाथ कॉरिडोर बनल्यानंतर आता मथुरेवर भाजपाचा फोकस आहे.

हिंदुत्वाच्या मुद्द्याला धार देणार - मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ सातत्याने हिंदुत्वाच्या मुद्द्यावरून विरोधकांना टार्गेट करत आहेत. त्यांची विधाने धार्मिक ओळख, सनातनी संस्कृती आणि राष्ट्रवाद या प्रमुख मुद्द्याभोवती आहेत. हिंदुत्वाचा आपला मूळ अजेंडा निवडणुकीच्या आधी आणखी मजबूत करण्याचा भाजपाचा प्रयत्न आहे. २०२७ ची निवडणूक केवळ धार्मिक मुद्द्यांच्या आधारे जिंकता येणार नाही हे भाजपा आणि योगी सरकारला ठाऊक आहे. त्यामुळेच काशी, अयोध्या आणि मथुरेतील धार्मिक पर्यटनाचा आराखडा आणि विकास प्रकल्प यावरही जोर दिला जात आहे. अयोध्या, काशीनंतर मथुराचा मुद्दा भाजपाच्या हिंदुत्ववादी राजकारणाचा महत्त्वाचा भाग आहे.

एनसीएमसी स्मार्ट कार्ड व ई-बसमुळे

स्मार्ट कार्डची उपलब्धता आणि नोंदणी प्रक्रिया पूर्ण नसतानाही सक्ती लागू केल्याने महिला व ज्येष्ठ नागरिक प्रवाशांना अडचणी आल्या. त्यामुळे अनेक प्रवाशांनी एसटीकडे पाठ फिरवली आणि त्याचा थेट फटका विभागाच्या उत्पन्नाला बसला. त्याचप्रमाणे इलेक्ट्रिक बसचा चुकीचा करार करण्यात आल्याने तोटाही वाढत चालला आहे, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या आर्थिक अडचणीमुळे अमरावती विभागातील कर्मचाऱ्यांची सुमारे ४५ लाख रुपयांची वैद्यकीय बिलांची रक्कम थकित आहे. तसेच भविष्य निर्वाह निधीतून आगाऊ रक्कम मागणाऱ्या ७१ कर्मचाऱ्यांना ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबर या तीन महिन्यांची आगाऊ रक्कम मिळाली नाही. ती रक्कम १ कोटी ८५ लाख रुपये असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना सेवा देणाऱ्या एसटीला राज्य सरकारच्या अर्थ विभागाकडून तातडीने निधी मिळावा, यासाठी जिल्हाधिकारी श्री आशिष येरेकर यांनी हे निवेदन शासनाकडे पाठवावे, अशी विनंतीही बरगे यांनी केली आहे.

एसटीच्या चालक-वाहकाचे

व्यवस्थापक यांच्यामार्फत या प्रकरणाची माहिती घेण्यात आली. चौकशीत संबंधित बसचे चालक अनिल सावरे आणि वाहक उदेभान मेत्राम यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली. त्यानंतर १६ नोव्हेंबरपासून दोघांनाही एसटी सेवेतून निलंबित करण्याचा निर्णय घेण्यात आला. महामंडळाच्या शिस्त व आवेदन कार्यपद्धतीनुसार त्यांच्याविरुद्ध पुढील कारवाईही सुरू करण्यात आली आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी कोणते आदेश दिले?

माध्यमांतील वृत्तांची दखल घेत मंत्री प्रताप सरनाईक यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने चौकशी करून जबाबदार कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले. प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या बाबतीत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. विशेषतः शाळकरी विद्यार्थ्यांना त्यांच्या घरापर्यंत सुरक्षित पोहोचविण्याची जबाबदारी एसटीची आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांकडे स्वतःच्या मुलांप्रमाणे पाहावे आणि त्यांच्या सुरक्षिततेची काळजी घ्यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

पुन्हा असा प्रकार घडल्यास काय होणार?

सध्या संबंधित चालक आणि वाहकाला निलंबित करण्यात आले असले, तरी यापुढे अशा प्रकारांची पुनरावृत्ती झाल्यास केवळ निलंबनावर कारवाई थांबणार नाही. कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करण्याची कठोर भूमिका परिवहन मंत्र्यांनी घेतली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासासाठी आवश्यक त्या स्पष्ट सूचना आणि परिपत्रक तातडीने जारी करण्याचे निर्देशही एसटी प्रशासनाला देण्यात आले आहेत.एसटीमधून प्रवास करणाऱ्या प्रत्येक प्रवाशाची सुरक्षितता ही महामंडळाची सर्वोच्च प्राथमिकता असल्याचे मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले. विशेषतः महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिक यांच्या प्रवासादरम्यान कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही. कर्तव्य बजावताना निष्काळजीपणा करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट संदेश या प्रकरणातील निलंबनाच्या कारवाईतून देण्यात आला आहे. दोन विमुक्तया मुलींना गाडीच्या अंधारात बसमधून उतरविण्याच्या घटनेने एसटी प्रवासातील सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. आता या कारवाईनंतर विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासासाठी महामंडळाकडून कोणत्या उपाययोजना केल्या जातात, याकडे लक्ष लागले आहे.

चांदी-सोने स्वस्त

रुपयांनी आणि सोने ६,००० रुपयांनी स्वस्त झाले आहे. ३० ऑक्टोबर रोजी चांदी १.८६ लाख रुपये आणि सोने १.४० लाख रुपयांवर होते.एका शहरातून दुसऱ्या शहरात सोने नेण्यासाठी इंधन आणि सुरक्षा खर्च येतो. त्यामुळे अंतर वाढल्यावर दर वाढतात. दक्षिण भारतात जास्त वापर (सुमारे ४०%) असल्यामुळे ज्वेलर्स मोठ्या प्रमाणात खरेदी करतात, मात्र सवलतींचा लाभ मर्यादित राहतो. राज्य आणि शहरातील ज्वेलरी असोसिएशन स्थानिक मागणी-पुरवठ्याच्या आधारे दर ठरवतात. ज्वेलर्सनी खरेदी केलेला दर ते ग्राहकांना किती किमतीत विकतील हे ठरवतो. यावर्षी सोने-चांदीच्या किमतीत सातत्याने चढ-उतार पाहायला मिळाला आहे. ३१ डिसेंबर २०२५ रोजी चांदीची किंमत २.३० लाख रुपये होती, जी २९ जानेवारी रोजी ३.८६ लाख रुपयांच्या विक्रमी उच्चांकावर पोहोचली होती. तेव्हापासून आतापर्यंत चांदी २.१७ लाख रुपयांनी स्वस्त झाली आहे. दुसरीकडे, ३१ डिसेंबर २०२५ रोजी सोन्याचा दर १.३३ लाख रुपये होता, जो २९ जानेवारी रोजी वाढून १.७६ लाख रुपयांच्या सर्वोच्च स्तरावर पोहोचला होता. तेव्हापासून आतापर्यंत सोने ४२ हजार रुपयांनी स्वस्त झाले आहे.

अमरावतीच्या बहुप्रतीक्षित रेल्वे

पुलाच्या पुनर्निर्माणासाठी १२५ कोटींचा निधी मंजूर झाला आहे. आज, १६ नोव्हेंबर रोजी आमदार सुलभा खोडके यांनी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी भेट देऊन पाहणी व आढावा घेतला. पहिल्या टप्प्यात हमालपुरा परिसरातून जुन्या पुलाचे डिस्मेंटलिंग सुरू झाले आहे. डिझाईन, निविदा आणि तांत्रिक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर लवकरच पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत नवीन पुलाच्या कामाचे भूमिपूजन होणार आहे. येत्या एका वर्षात पुलाचे काम पूर्ण करून तो नागरिकांच्या सेवेत दाखल करण्याचे उद्दिष्ट आहे. तसेच कामादरम्यान स्थानिक नागरिक, व्यापारी आणि त्यांच्या मालमत्तेला कोणताही त्रास होऊ नये, यासाठी महारेल प्रशासनाला आवश्यक सूचना देण्यात आल्या.

यावेळी यश खोडके, महारेलचे अधिकारी, मनपा स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, माजी नगरसेवक प्रशांत डवरे, नगरसेवक चेतू खेडकर, गुड्डू धर्माळे, मंगेश मनोहरे, मनीष बजाज, प्रमोद महल्ले, कर्नल सिंग राहल, मनीष चौबे, दीपक मानका तसेच स्थानिक व्यापारी बांधव उपस्थित होते.

सरपंच पदासाठी २० नोव्हेंबरला

पवार, सागर ढवळे, वरूड तालुक्यासाठी प्रदिप पवार, रामदास शेळके, दर्यापूर तालुक्यासाठी राजेश्वर हांडे, डॉ. रविद्रकुमार कानडजे, अंजनगाव सुर्जी तालुक्यासाठी वैष्णवी बाविस्कर, पुष्पा दाभेराव, अचलपूर तालुक्यासाठी बळवंत अरखराव, सुदर्शन शहारे, चांदूर बाजार तालुक्यासाठी सुनिल टाकळे, योगेश गाडे, धामणगाव रेल्वे तालुक्यासाठी तेजश्री कोरे, अभय घोरपडे यांच्या उपस्थितीत आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. संबंधित तालुक्यातील नागरिक आणि ग्रामपंचायत सदस्यांनी या सोडतीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन ग्रामपंचायत निवडणूक प्रभारी अधिकारी ज्ञानेश्वर घ्यार यांनी केले आहे.

भरधाव दुचाकीची बसला धडक;

परिसरात हळहळ व्यक्त होत असून, अवघ्या २२ वर्षांच्या तरुणाचा असा दुर्दैवी अंत झाल्याने सर्वत्र शोककळा पसरली आहे. कृष्णा याच्या पश्चात आई, वडील व मोठा भाऊ असा आप्तपरिवार असून, त्याच्या अकाली निधनाने येरणे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्याच्यावर हिंदू स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

चार वर्षांपासून क्रीडा संकुलाचा मुख्य

देऊन पाहणी केली. पाहणीदरम्यान क्रीडा संकुलात प्रवेश करण्यासाठी असलेल्या मुख्य रस्त्याची अत्यंत गैरसोयीची अवस्था त्यांच्या निदर्शनास आली. रस्त्यावरून क्रीडांगणात उतरताना खेळाडूंना अडचणीचा सामना करावा लागत असून, अशा परिस्थितीत एखाद्या खेळाडूला दुखापत होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. शहराच्या मध्यवर्ती भागात जवळपास पाच एकर परिसरात एवढे मोठे क्रीडा संकुल असतानाही तेथे खेळाडूंसाठी पोषक वातावरण नसल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.

यावेळी क्रीडा प्रशिक्षक नंदू सोरगिवकर उपस्थित होते. त्यांनी क्रीडा संकुलातील विविध समस्या, अडचणींबाबत नगराध्यक्षांसोबत चर्चा केली. त्यानंतर नगराध्यक्षांनी संकुलातूनच जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवर संपर्क साधून क्रीडा संकुलाच्या दुरवस्थेची सविस्तर माहिती दिली. तसेच खेळाडूंसाठी आवश्यक असलेल्या सुविधा, ट्रॅकची दु

जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

एक प्रतिष्ठित सवय

■ मंगळवार, १७ नोव्हेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जवळा शेतशिवारात विहिरीची माती ढासळून दोन मजुरांचा मृत्यू

● हळदीचे पीक वाचविण्यासाठी सुरू होते विहिरीचे काम

● दुर्घटनेने अंबापूर व हिसई गावावर शोककळा



■ प्रतिनिधी | वाशिम ■

हळदीच्या पिकाला पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी नवीन विहिरीचे बांधकाम सुरू असताना विहिरीची माती अचानक ढासळून दोन मजुरांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना अनसिंगजवळील जवळा शेतशिवारात घडली. या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून मृत मजुरांच्या कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

प्राप्त माहितीनुसार, अनसिंग येथील शेतकरी हरिभाऊ सुभाष वाबळे (रा. एकांबा) यांच्या जवळा शेतशिवारातील शेतात हळदीचे पीक घेतले आहे. पिकाला पाण्याची आवश्यकता असल्याने शेतात नवीन विहिरीचे बांधकाम व खोदकाम सुरू होते. यावेळी कामाबर असलेले संतोष रामदास जामनिगके (रा. अंबापूर, ता. मंगरूळपीर) आणि वासुदेव श्रीरंग घोंगडे (रा. हिसई, ता. मंगरूळपीर) हे दोघे मजुर काम करीत होते. दरम्यान, सकाळी अचानक विहिरीचा मातीचा कडा ढासळल्याने दोघेही मातीखाली दबले गेले.

घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत दोन्ही मजुरांना मातीखालून बाहेर काढले. त्यानंतर त्यांना उपचारासाठी अनसिंग येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती दोघांनाही मृत घोषित केले. या दुर्दैवी घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासनाने घटनास्थळी तसेच ग्रामीण रुग्णालयात धाव घेतली. घटनेचा पुढील तपास सुरू असून या दुर्घटनेमुळे अंबापूर व हिसई या दोन्ही गावांवर शोककळा पसरली आहे.

खापरदरी – सावरगांव कान्होबा प्रलंबित रस्ता पूर्ण करण्याच्या मागणीची गोरसेनेच्या आंदोलनाची बांधकाम विभागाने घेतली दखल

■ प्रतिनिधी | मानोरा ■



सामाजिक कार्यकर्त्यांनी केली होती मागणी

तालुक्यातील खापरदरी ते सावरगांव कान्होबा हा रस्ता वन कायद्याच्या अडचणीमुळे खापरदरीपासून सावरगाव कान्होबापर्यंत सुमारे तीन किलोमीटर मागील अनेक वर्षांपासून अडगळीत पडला होता. हा प्रलंबित रस्ता दुरुस्ती, पुलाची निर्मिती व डांबरीकरण करावे यासाठी सावरगाव कान्होबा व खापरदरी या गावातील काही सामाजिक कार्यकर्ते मागील अनेक वर्षांपासून लेखी पाठपुरावा करीत होते.

त्याला गोरसेना या संघटनेने साथ दिल्याने व या महिन्याच्या प्रारंभी चक्काजाम आंदोलन केल्याची फलित दिसत असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी आज या रस्त्याची पाहणी केल्याने गोरसेनेचे आंदोलन व सामाजिक कार्यकर्त्याच्या पाठपुराव्याला यश मिळाल्याचे बोलल्या जात आहे.

खापरदरी ते सावरगांव कान्होबा हा रस्ता दोन्ही गावांना जोडणारा मुख्य रस्ता आहे. मात्र वन विभागाची परवानगी, वन कायद्याची अडचण यामुळे या रस्त्याचे काम अर्धवट राहिले होते. तीन किलोमीटरचा पट्टा पूर्णपणे खराब झाला होता. खड्डे, दगड-गोटे, चिखल यामुळे या रस्त्यावरून प्रवास करणे म्हणजे जीव धोक्यात घालण्यासारखे झाले होते. पावसाळ्यात तर या रस्त्यावरून वाहने जाणे पूर्णपणे बंद व्हायचे. शेतकरी, विद्यार्थी, गरोदर महिला, आजारी रुग्ण यांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. शेतीमाल बाजारात नेण्यासाठी शेतकऱ्यांना लांबचा वळसा घेऊन जावे लागत होते.

हा रस्ता व्हावा यासाठी सावरगांव कान्होबा येथील सामाजिक कार्यकर्ते जगदीश जाधव, खापरदरी येथील विजेश पवार, अजय चव्हाण, जगदीश शामराव राठोड सह इतरांनी अनेक वेळा निवेदने दिली, लोकप्रतिनिधींना भेटले. मात्र प्रत्येक वेळी आश्वासनाशिवाय काहीच हाती लागले नव्हते. अखेर गोरसेना संघटनेने या मागणीला बळ दिले. या महिन्याच्या प्रारंभी गोरसेनेचे जिल्हा तथा तालुका पदाधिकारी गोपाल चव्हाण व सुनील राठोड यांच्या नेतृत्वात चिखलगड फाटा येथे चक्काजाम आंदोलन केले. त्यानंतर प्रशासनाला जाग आली. आंदोलनाची दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्याच्या पाहणीसाठी पथक पाठवले. आज सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी खापरदरी ते सावरगांव कान्होबा या प्रलंबित रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी केली. फोटोत दिसत असलेल्या या पाहणीवेळी संबंधित अधिकारी खापरदरी व सावरगाव कान्होबाची व ग्रामस्थ उपस्थित होते. अधिकाऱ्यांनी रस्त्याची लांबी, रुंदी, पुलाची गरज असलेली ठिकाणे, डांबरीकरणासाठी लागणारा खर्च याची पाहणी केली. ग्रामस्थांनी अधिकाऱ्यांना रस्त्याच्या दुरवस्थेची माहिती दिली. यावेळी ग्रामस्थांनी सांगितले की, 'आम्हाला आश्वासन नको, रस्ता हवा आहे. हा रस्ता झाला तर दोन्ही गावांचा विकास होईल.'

संकल्प साहित्य संमेलनाच्या बोधचिन्हाचे प्रकाशन



■ प्रतिनिधी | वाशिम ■

रिसोड येथे होणाऱ्या चौथ्या संकल्प जिल्हा मराठी साहित्य संमेलनाच्या बोधचिन्हाचे प्रकाशन पद्मश्री नामदेव कांबळे, ज्येष्ठ साहित्यिक बाबाराव मुसळे, नियोजित संमेलनाध्यक्ष डॉ. विजय जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

या संमेलनाच्या अध्यक्षपदी याआधीच सुप्रसिद्ध कथालेखक प्रा. डॉ. विजय जाधव यांची निवड करण्यात आली आली आहे. संमेलनाध्यक्षांच्या निवडीनंतर बोधचिन्हाचे प्रकाशन करून संमेलनाच्या तयारीने आणखी वेग घेतला आहे. कार्यक्रमांची आखणीही जवळपास निश्चित झाली आहे, अशी माहिती संमेलनाचे मुख्य संयोजक चाफेश्वर गांगवे आणि डॉ. विजय काळे यांनी आज दिली. महाराष्ट्र शासनाचा मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई यांच्या अनुदानातून, संकल्प फाऊंडेशन रिसोड यांच्या वतीने हे आयोजन करण्यात येणार आहे. संमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून नव्यानेच प्रा. गजानन वाघ यांची निवड करण्यात आली आली आहे. वाशीम जिल्ह्याचे शिल्पकार स्व. पुंडलीकरावजी गवळी साहित्य नगरी, भोमावत मंगल कार्यालय, संत श्री अमरदास बाबा संस्थान परिसर, रिसोड येथे पाच आणि सहा डिसेंबर रोजी हे संमेलन होणार आहे.

कृषी विकास व ग्रामीण प्रशिक्षण संस्थेचा ३४ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■



तालुक्यातील वसंतवाडी गावामध्ये कृषी विकास व ग्रामीण प्रशिक्षण संस्था मलकापूर यांच्या माध्यमातून बी.सी.आय. प्रकल्प राबविला जात असून शेतकरी, शेतमजूर, वंचित घटक व महिला यांचे जीवनमान सुधारण्यासाठी प्रकल्पाच्या माध्यमातून आणि संस्थेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जात आहेत.

आज संस्थेचा ३४ वा वर्धापन दिन हा प्रकल्पाच्या गावांमध्ये उत्साहात साजरा करण्यात आला.

संस्थेच्या कार्याविषयी सांगितल्यास १९९१ मध्ये संस्थेची स्थापना ही छोट्याशा तळणी गावात झाली. आता साधारणतः दहा राज्यांमध्ये संस्था कार्यरत आहे.

शाश्वत हवामान अनुकूलन शेती, महिला सक्षमीकरण, जलसुरक्षा आणि पाणलोट व्यवस्थापन, उत्पादन कंपन्या, शेतकरी असे विविध उपक्रम राबविले जात आहेत.

कृषी विकास व ग्रामीण प्रशिक्षण संस्था ही स्थानिक पातळीवर बीसीआय प्रकल्पसुद्धा राबवत आहे.

संस्थेच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून आज रोजी विविध उपक्रम राबवून प्रकल्पाच्या माध्यमातून शेतकरी, शेतमजूर, महिला यांना संस्थेच्या कार्यशैलीविषयी माहिती दिली.

बॉटर बजेटिंगचा खेळ खेळण्यात आला. सापशिडीच्या खेळाच्या माध्यमातूनसुद्धा शेतकऱ्यांना माहिती देण्यात आली.

यावेळी गटव्यवस्थापक अरुण झामरे तसेच क्षेत्र प्रवर्तक विलास राठोड ,गोविंदा कोरडे, ओम बोधनकर ,वैजनाथ वाघमारे, अमोल कव्हर आदी उपस्थित होते.

'२० नोव्हेंबरला जिल्हा युवा महोत्सव'

शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांसाठी अर्ज करण्यास २५ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

■ प्रतिनिधी | वाशिम ■

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागामार्फत प्रदान करण्यात येणाऱ्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांसाठी सन २०२४-२५ व सन २०२५-२६ या वर्षाकरिता अर्ज सादर करण्यास २५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक, जिजामाता पुरस्कार, खेळाडू, दिव्यांग खेळाडू तसेच साहसी उपक्रमांत सहभागी खेळाडू व व्यक्तींना या पुरस्कारांसाठी ऑनलाइन अर्ज करता येणार आहेत.

इच्छुकांनी https://sports.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर अर्ज सादर करावेत.

अर्ज भरण्याबाबतच्या सूचना क्रीडा विभागाच्या संकेतस्थळावरील 'ताज्या घडामोडी' या विभागात 'शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार' या शीर्षकाखाली उपलब्ध आहे.

■ प्रतिनिधी | वाशिम ■

युवकांच्या कलागुणांना वाव देणे, नेतृत्वक्षमता विकसित करणे तसेच भारतीय संस्कृती व परंपरांचे जतन करण्याच्या उद्देशाने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, वाशिम यांच्या वतीने २० नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता वाटाणे लॉन, अकोला रोड, वाशिम येथे जिल्हा युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

'विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग' या संकल्पनेअंतर्गत आयोजित महोत्सवात सांस्कृतिक ट्रॅक, विकसित भारत चॅलेंज ट्रॅक, इनोव्हेशन ट्रॅक आणि युवा संसद या चार विभागांचा समावेश आहे. सांस्कृतिक विभागात समूह लोकनृत्य, समूह लोकगीत, चित्रकला, पथनाट्य व कविता लेखन या स्पर्धा होणार आहेत. तसेच 'डिझाईन फॉर भारत', सामाजिक समस्यांवरील उपाययोजना, युवा उद्योजकता आणि संसदीय लोकशाहीविषयक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. सर्व स्पर्धांचा विषय 'नशामुक्त युवा, विकसित भारत' हा आहे.

वाशिम जिल्ह्यात वास्तव्यास असलेले अथवा शिक्षण घेणारे युवक-युवती सहभागी होऊ शकतील. सांस्कृतिक स्पर्धांसाठी २७ ऑगस्ट २०२६ रोजी १५ ते २९ वर्षे वयोगटातील युवक-युवती पात्र राहतील. इच्छुकांनी १८ नोव्हेंबर २०२६ पर्यंत 'माय भारत पोर्टल'वर नोंदणी करणे आवश्यक आहे. एका युवकाला केवळ एका स्पर्धा प्रकारात सहभागी होता येईल. जिल्हास्तरीय सांस्कृतिक स्पर्धांतील पात्र विजेत्यांना राज्यस्तरावर सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. जिल्ह्यातील पात्र युवक-युवतींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी सचिन चव्हाण यांनी केले आहे.

नवीन सोनखास येथील भागवत सप्ताहात दररोज एका भाग्यवंताला मिळणार रुक्मिणीची पैठणी!

आजपासून भागवत कथेला प्रारंभ, महिला भाविकांमध्ये उत्साह

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

शहरालगत असलेल्या नवीन सोनखास येथे श्रीमद् भागवत ज्ञानयज्ञ व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून, यंदा सप्ताहात भाविकांसाठी विशेष आकर्षण ठेवण्यात आले आहे. सप्ताहाच्या प्रत्येक दिवशी लकी ड्रॉच्या माध्यमातून एका भाग्यवंत महिला भाविकाला रुक्मिणीची पैठणी भेट देण्यात येणार आहे. दानशूर व्यक्तीच्या हस्ते या पैठणीचे वितरण केले जाणार असल्याने महिला भाविकांमध्ये विशेष उत्सुकता निर्माण झाली आहे. नवीन सोनखास येथे गेल्या ३१ वर्षांपासून अखंडपणे सुरू असलेल्या या धार्मिक परंपरेनुसार यंदाही सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. १७ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या या सप्ताहात ह.भ.प. बबन महाराज देव यांच्या अमृततुल्य वाणीतून श्रीमद् भागवत कथेचे निरूपण होणार आहे. धार्मिक सोहळ्यासाठी हजारो भाविकांची उपस्थिती अपेक्षित आहे.

विनामूल्य आसन क्रमांकाद्वारे लकी ड्रॉ

या उपक्रमात सहभागी होणाऱ्या भाविकांना विनामूल्य आसन क्रमांक देण्यात येणार आहेत. आसन क्रमांकाचे वाटप दुपारी ४ वाजेपर्यंत करण्यात येईल. त्यानंतर सायंकाळी ५ वाजता आरतीच्या वेळी लकी ड्रॉ काढण्यात येणार असून, निवड झालेल्या भाग्यवंताला दानशूरांच्या हस्ते रुक्मिणीची पैठणी प्रदान करण्यात येईल.

भागवत श्रवण, हरिनामाचा गजरात दररोज पैठणी जिंकण्याची संधी मिळणार असल्याने यंदाच्या सप्ताहाचे आकर्षण अधिकच वाढले आहे. या धार्मिक सोहळ्याचा व लकी ड्रॉ उपक्रमाचा सर्व भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक समिती, नवीन सोनखास यांच्या वतीने करण्यात आले आहे.

'एमएच ३७ ए.क्यू.' मालिकेतील आकर्षक क्रमांकांसाठी अर्ज सुविधा उपलब्ध

■ प्रतिनिधी | वाशिम ■

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वाशिम येथे दुचाकी वाहनांसाठी 'एमएच ३७ ए.क्यू.' ही नवीन नोंदणी मालिका सुरू होत आहे. या मालिकेतील पसंतीचे आकर्षक क्रमांक चारचाकी वाहनांसाठी तिप्पट शुल्क भरून आरक्षित करता येणार आहेत.

चारचाकी वाहनांसाठी १८ नोव्हेंबर रोजी, तर दुचाकी वाहनांसाठी १९ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी २.३० वाजेपर्यंत अर्ज स्वीकारण्यात येतील. चारचाकींसाठी १९ नोव्हेंबर रोजी आणि दुचाकींसाठी २० नोव्हेंबर रोजी लिलाव होईल. लिलावासाठी अधिक रकमेचा डीडी सीलबंद पाकिटात सादर करावा. लिलावात सर्वाधिक रकमेचा डीडी सादर करणाऱ्यास पसंतीचा क्रमांक दिला जाईल.

अर्जासोबत आधारकार्ड, पत्त्याचा पुरावा, फोटो ओळखपत्र व पॅनकार्ड यांच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. डीडी 'DY. R.T.O. WASHIM' यांच्या नावे वाशिम येथील राष्ट्रीयीकृत किंवा अनुसूचित बँकेचा असावा. अर्जदाराचा पत्ता कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील असणे बंधनकारक आहे.समान रकमेचे डीडी प्राप्त झाल्यास चिठ्ठीद्वारे क्रमांक निश्चित केला जाईल. आरक्षित क्रमांकासाठी १८० दिवसांच्या आत वाहन नोंदणीसाठी सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा आरक्षण रद्द होईल. भरलेले शुल्क परत मिळणार नाही. आकर्षक क्रमांकांसाठी ३० ऑगस्ट २०२४ च्या शासन अधिसूचनेनुसार सुधारित शुल्क लागू राहील.

इंझोरीत क्रांतिवीर लहुजी साळवे यांना अभिवादन!

■ प्रतिनिधी | मानोरा ■



अन्यायाविरुद्ध बंड पुकारणारे, शौर्य, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेचा जाज्वल्य इतिहास निर्माण करणारे आद्य क्रांतिकारक क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या २३२ व्या जयंतीनिमित्त मानोरा तालुक्यातील इंझोरी येथे अभिवादनाचा भव्य कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. क्रांतिवीर लहुजींच्या प्रतिमेला अभिवादन करत उपस्थित समाजबांधवांनी त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प केला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धनराज दिघडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून इंझोरी अजय जयस्वाल उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून लहुजी शक्ती सेनेचे पश्चिम विदर्भ अध्यक्ष डॉ. रमेश चंदनशिव यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी गोपाल पाटील, राम पाटील, धाकुलकर यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. रमेश चंदनशिव यांनी क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या संघर्षमय जीवनावर आणि ऐतिहासिक योगदानावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, लहुजी वस्ताद हे केवळ कुस्तीचे वस्ताद नव्हते, तर ते स्वातंत्र्यलढ्याला प्रेरणा देणारे शौर्याचे प्रतीक होते. त्यांच्या तालमीत अनेक पैलवान आणि क्रांतिकारी विचारांचे तरुण घडले. अनेक क्रांतिकारकांसाठी लहुजींचे मार्गदर्शन प्रेरणादायी ठरले.वडील राघोजी साळवे यांच्या युद्धातील बलिदानाचा प्रसंग स्वतःच्या डोळ्यांनी पाहिल्यानंतर लहुजींच्या मनात इंग्रजांविरुद्ध प्रखर संघर्षाची ज्वाला पेटली. 'जगेल तर देशासाठी आणि मरेल तर देशासाठी' हा राष्ट्रनिष्ठेचा निर्धार त्यांनी आयुष्यभर जपला. महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक कार्याला संरक्षण देण्यातही लहुजींचे महत्त्वपूर्ण योगदान होते. त्यामुळे लहुजींचा इतिहास हा केवळ एका समाजाचा इतिहास नसून सामाजिक परिवर्तन, शौर्य आणि स्वातंत्र्याच्या संघर्षाचा प्रेरणादायी अध्याय आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

जिल्हा परिषद मागासवर्गीय कर्मचारी पतसंस्थेतर्फे सभासदांना भेटवस्तूंचे वाटप



■ प्रतिनिधी | वाशिम ■

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जिल्हा परिषद मागासवर्गीय कर्मचारी सहकारी पतसंस्थेतर्फे सभासदांना ट्रॅव्हलिंग बॅग भेटवस्तू म्हणून वितरित करण्यात आल्या. शनिवार, १४ नोव्हेंबर रोजी वाशिम शाखा कार्यालयात हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे राज्य अतिरिक्त सरचिटणीस तथा अकोला जिल्ह्याध्यक्ष शशिकांत गायकवाड होते. प्रमुख उपस्थितीत संस्थेचे अध्यक्ष प्रशांत शिरसाट, सचिव गणेश भगत, हेमंत तायडे, सतीश सांगळे, विनोद घुगे, विनोद राजगुरू यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी गणेश भगत यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या कार्याची माहिती दिली.


प्रशांत शिरसाट यांनी संस्थेच्या प्रगतीचा आलेखा मांडला. अध्यक्षीय भाषणात शशिकांत गायकवाड यांनी संस्थेने वंदा मिळविलेल्या विक्रमी नफ्याचे कौतुक करून सभासदांनी संस्थेच्या प्रगतीसाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले.

पाणीटंचाईचे संकट ओळखा, पाण्याचा प्रत्येक थेंब जपा ; अनावश्यक वापर टाळा!

■ प्रतिनिधी | रिसोड ■

■ दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुख्याधिकारी सतीश शेवदा यांचे रिसोडकरांना आवाहन

■ उन्हाळ्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी नगरपरिषदेचे नियोजन सुरू



यंदा पुरेसा पाऊस न झाल्यामुळे रिसोड शहरासह परिसरात आगामी काळात पाणीटंचाईचे गंभीर संकट निर्माण होण्याची शक्यता आहे. पावसाचे प्रमाण अपेक्षेप्रमाणे न झाल्याने उपलब्ध जलसाठ्यावर त्याचा परिणाम होण्याची चिन्हे दिसत असून, उन्हाळ्यात नागरिकांना पाण्याच्या समस्येला सामोरे जावे लागू नये, यासाठी आतापासूनच पाण्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक झाले आहे. या पार्श्वभूमीवर रिसोड नगरपरिषद प्रशासनाने पाणी बचतीबाबत नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

उपलब्ध पाणीसाठा उन्हाळ्यापर्यंत पुरविण्यासाठी प्रशासनाकडून काटेकोर नियोजन केले जात आहे. मात्र, केवळ प्रशासनाच्या प्रयत्नांवर अवलंबून न राहता नागरिकांनीही पाणी बचतीची जबाबदारी स्वीकारणे गरजेचे आहे. पाणी ही अत्यंत मौल्यवान नैसर्गिक संपत्ती असून त्याचा अपव्यय टाळणे ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे.

शहरातील अनेक ठिकाणी नळ सुरू ठेवल्यामुळे, पाण्याच्या टाक्या ओसंडून वाहिल्यामुळे तसेच दैनंदिन वापरात आवश्यकतेपेक्षा अधिक पाणी खर्च होत असल्याने मोठ्या प्रमाणात पाण्याची नासाडी होते. ही बाब लक्षात घेता नागरिकांनी पाण्याच्या नळांना तोट्या बसवाव्यात, पाण्याच्या टाक्या भरताना विशेष काळजी घ्यावी, नळातून पाणी गळत असल्यास तातडीने दुरुस्ती करावी आणि पाण्याचा वापर केवळ आवश्यक तेवढाच करावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

विशेषतः वाहन धुणे, अंगण व रस्ते धुणे, पाण्याचा अनावश्यक वापर करणे अशा बाबींना आळा घालण्याची गरज आहे. घरगुती वापरातील पाणी जपून वापरल्यास उपलब्ध पाणीसाठ्याचा अधिक काळ उपयोग होऊ शकतो. प्रत्येक कुटुंबाने पाणी बचतीचे नियोजन केल्यास संभाव्य पाणीटंचाईची तीव्रता कमी करण्यास निश्चितच मदत होईल.

यासंदर्भात रिसोड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सतीश शेवदा यांनी शहरातील नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, सध्याची दुष्काळजन्य परिस्थिती लक्षात घेता पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा आहे. आगामी काळात पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण होऊ नये आणि उपलब्ध पाणीसाठा उन्हाळ्यापर्यंत पुरावा, यासाठी प्रशासन आवश्यक नियोजन करीत आहे. मात्र, या प्रयत्नांना नागरिकांचे सहकार्य मिळणे तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा अपव्यय टाळून पाण्याचा काटकसरीने वापर करावा आणि पाणी बचतीच्या मोहिमेत प्रशासनाला सहकार्य करावे.

आज पाणी वाचविले तरच उद्याची तहान भागविता येईल. त्यामुळे पाणीटंचाईचे संकट येण्याची वाट न पाहता आतापासूनच प्रत्येकाने पाणी बचतीची सवय अंगीकारावी, असे आवाहन मुख्याधिकारी सतीश शेवदा यांनी केले आहे.

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्ष १४ ■ अंक ३४९ ■ मंगळवार १७ नोव्हेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु

प्रवाशांच्या डोक्यावर मृत्यूचा सापळा

जामगावचा प्रवासी निवारा कोसळण्याच्या मार्गावर; छताचा स्लॅब कोसळला, सुरेश खवशी थोडक्यात बचावले

जीवितहानीची वाट पाहणाऱ्या प्रशासनाला आणखी किती इशारे हवेत





आष्टी शहीद जनमाध्यम : प्रवाशांना ऊन-पावसापासून संरक्षण देण्यासाठी उभारलेला प्रवासी निवारा आता त्यांच्या जीवावर उठण्याची वेळ आली आहे. साहूर-माणिकवाडा मार्गावरील जामगाव येथील प्रवासी निवाऱ्याची अवस्था इतकी दयनीय झाली आहे की, छताचा स्लॅब थेट प्रवाशांच्या डोक्यावर कोसळत आहे. निवाऱ्यात बसलेले माणिकवाडा येथील सुरेश खवशी यांच्या अंगावर छताचा काही भाग कोसळला. सुदैवाने ते थोडक्यात बचावले. मात्र, या घटनेने सार्वजनिक बांधकाम आणि संबंधित प्रशासनाच्या देखभाल व्यवस्थेचे अक्षरशः पितळ उघडे पडले आहे.

साहूर ते माणिकवाडा हा मार्ग प्रवाशांच्या दृष्टीने महत्त्वाचा असून नागपूर आणि अमरावती जिल्ह्यांकडे जाणाऱ्या नागरिकांची या मार्गावर मोठी वर्दळ असते. त्यामुळे जामगाव येथील प्रवासी निवारा अनेक प्रवाशांसाठी आधार ठरतो. मात्र, हाच आधार आता धोक्याची घंटा बनला आहे. निवाऱ्याचे छत जीर्ण झाले असून स्लॅब कमकुवत झाल्याने तो कधीही कोसळण्याची शक्यता आहे.

सुरेश खवशी निवाऱ्यात बसले असताना अचानक छताचा काही भाग कोसळला. क्षणात घडलेल्या या प्रकारात ते थोडक्यात बचावले. मात्र, याच ठिकाणी एखादा लहान मुलगा, वृद्ध किंवा महिला असती तर मोठी जीवितहानी झाली असती. सुदैवाने दुर्घटना टळली; पण प्रशासनाला जाग येण्यासाठी आणखी कोणाचा बळी जाण्याची प्रतीक्षा आहे काय,

प्रवासी निवारा की मृत्यूचा सापळा -प्रवाशांच्या सुरक्षेची जबाबदारी असलेल्या यंत्रणांनी या धोकादायक निवाऱ्याकडे केलेले दुर्लक्ष संतापजनक आहे. सार्वजनिक सुविधांची उभारणी करून त्यांची देखभाल करण्याची जबाबदारीही संबंधित विभागाचीच असते. मात्र, छताचा स्लॅब कोसळेपर्यंत या निवाऱ्याची दुरवस्था कुणाच्याही लक्षात आली नाही, हे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे. आता केवळ पाहणी आणि आश्वासनांचा फार्स नको. धोकादायक निवाऱ्याचा तातडीने पंचनामा करून परिसर प्रतिबंधित करावा, जीर्ण भाग पाडून सुरक्षित दुरुस्ती करावी किंवा नव्याने प्रवासी निवारा उभारावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

रक्तबंबाळ बैलाला घेऊन बाळा जगताप बीडीओंच्या दालनात

निकृष्ट पांदन रस्त्याचा संतापजनक पंचनामा ; आठ दिवसांचा अल्टिमेटम, अन्यथा आमदारांच्या घरासमोर आमरण उपोषण!



आर्वी जनमाध्यम : शेतकऱ्यांच्या जनावरांच्या जिवाशी खेळणाऱ्या कंत्राटदारांना प्रशासनाचे अभय आहे काय असा प्रश्न उपस्थित करीत काँग्रेस नेते तथा प्रहार सोशल फोरमचे संस्थापक अध्यक्ष बाळा जगताप यांनी थेट जखमी बैलांसह गटविकास अधिकाऱ्यांचे दालन गाठले. नांदपूर येथील निकृष्ट पांदन रस्त्यामुळे बैलांची खुरे रक्तबंबाळ होत असताना प्रशासन मात्र गप्प असल्याचा आरोप करीत त्यांनी अनोखे आंदोलन छेडले. जखमी बैलांना दालनात आणून प्रशासनासमोरच निकृष्ट कामाचा जिवंत पुरावा उभा केला.

आर्वी तालुक्यातील मौजा नांदपूर येथील पांदन रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप आहे. रस्त्यावर टाकण्यात आलेल्या गिट्टीमुळे शेतीकामासाठी वापरण्यात येणाऱ्या बैलांच्या खुरांना जखमा होत आहेत. शेतकऱ्यांना या रस्त्यावरून ये-जा करताना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. यासंदर्भात बाळा जगताप यांनी वारंवार गटविकास अधिकाऱ्यांना निवेदने देऊनही कोणतीही ठोस कार्यवाही झाली नसल्याचा आरोप आहे.

अखेर प्रशासनाच्या निष्क्रियतेचा निषेध करण्यासाठी जखमी बैलांसह पंचायत समितीचे दालन गाठण्यात आले. आंदोलनाची तीव्रता लक्षात येताच गटविकास अधिकाऱ्यांनी तातडीने संबंधित पांदन रस्त्याची पाहणी केली. आठ दिवसांत समस्येवर तोडगा काढण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन तात्पुरते मागे घेण्यात आले.

विशेष म्हणजे, याच ठेकेदाराला तब्बल ५७ पांदन रस्त्यांची कामे देण्यात आल्याचा दावा बाळा जगताप यांनी केला. त्यामुळे या सर्व कामांची गुणवत्ता तपासून संबंधित ठेकेदाराची चौकशी करावी आणि दोषी आढळल्यास कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

आठ दिवसांत ठोस निर्णय झाला नाही, तर आर्वीच्या आमदारांच्या निवासस्थानासमोर आमरण उपोषण छेडण्यात येईल, असा निर्वाणीचा इशाराही जगताप यांनी दिला. आता प्रशासनाच्या आश्वासनाचे पुढे काय होते, की शेतकऱ्यांना पुन्हा आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागतो, हे आठ दिवसांत स्पष्ट होणार आहे.

जुन्या कचरा गाड्यांमुळे स्वच्छतेचा बोजवारा

शहरातील अनेक वाहने नादुरुस्त; नवीन कचरा संकलन वाहनांची तातडीने व्यवस्था करा



महिला व बालकल्याण सभापती स्नेहा आकरे यांची मुख्याधिकाऱ्यांकडे मागणी

वर्धा जनमाध्यम : शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याची जबाबदारी असलेल्या नगर परिषदेकडेच कचरा संकलनासाठी पुरेशी आणि सुस्थितीतील वाहने नसल्याचे चित्र समोर येत आहे. नगर परिषदेमार्फत शहरातील विविध प्रभागांमध्ये कचरा संकलनासाठी वापरण्यात येणारी अनेक वाहने जुनी झाली असून, त्यापैकी काही वाहने पूर्णपणे नादुरुस्त झाली आहेत. परिणामी, कचरा संकलनाच्या नियमित कामात अडथळे निर्माण होत असून शहराच्या स्वच्छतेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शहरातील प्रत्येक प्रभागातून दररोज कचरा उचलला जाणे अपेक्षित असताना वाहनांच्या दुरवस्थेमुळे या व्यवस्थेवर परिणाम होत आहे. कचरा संकलन वेळेवर न झाल्यास ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचण्याची शक्यता असून नागरिकांनाही दुर्गंधी आणि अस्वच्छतेचा त्रास सहन करावा लागतो. स्वच्छतेच्या कामात सातत्य राखण्यासाठी सक्षम यंत्रणा आणि पुरेशी वाहने असणे आवश्यक आहे. मात्र, जुन्या आणि वारंवार बंद पडणाऱ्या वाहनांमुळे नगर परिषदेच्या स्वच्छता मोहिमेवरच मर्यादा येत असल्याचे दिसून येत आहे.या पार्श्वभूमीवर नगर परिषदेला नवीन कचरा संकलन वाहने उपलब्ध करून देण्याची मागणी महिला व बालकल्याण सभापती सौ. स्नेहा आशिष आकरे यांनी मुख्याधिकारी, नगर परिषद वर्धा यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.जुन्या व पूर्णपणे नादुरुस्त झालेल्या वाहनांच्या जागी नवीन वाहने उपलब्ध करून दिल्यास शहरातील प्रत्येक प्रभागात नियमित आणि सुरळीत कचरा संकलन करणे शक्य होईल. यामुळे सार्वजनिक स्वच्छता राखण्यासोबतच नागरिकांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासही मदत होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.केवळ स्वच्छतेच्या घोषणा करून शहर स्वच्छ राहणार नाही, तर त्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, वाहने आणि सक्षम यंत्रणा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्यामुळे नगर प्रशासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन नवीन कचरा संकलन वाहनांच्या उपलब्धतेबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते आशिष गणेश आकरे यांनीही केली आहे.

रक्त आले नाही म्हणून FIR नाही?

दलित महिलेच्या तक्रारीला NCR चे कुंपण

हिंगणघाट जनमाध्यम : हिंगणघाट तालुक्यातील रोहनखेडा येथे कॅनलच्या पाण्याच्या वादातून दलित महिलेला मारहाण, जातीवाचक शिवीगाळ आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार समोर आला आहे. मात्र, अल्लीपूर पोलिसांनी FIR ऐवजी केवळ NCR नोंदविल्याचा आरोप पीडित रंजना किशोर वागदे यांनी केला आहे.

१४ ऑक्टोबर रोजी शेतात काम करीत असताना शेजारील शेतकरी मारोती शामराव हजारे याने कॅनलचे पाणी वळविल्याबाबत जाब विचारला असता जातीवाचक शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे वागदे यांनी निवेदनात म्हटले आहे. तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप केला आहे. पोलिसांनी रक्त आले नसल्याचे कारण देत इंदं दाखल करण्यास नकार दिल्याचा दावा त्यांनी केला. या प्रकरणी आरोपीवर ॲट्रॉसिटी कायद्यानुसार कारवाई, अटक आणि कुटुंबाला पोलीस संरक्षण मिळावे, यासाठी त्यांनी खासदार बळवंत वानखेडे यांच्याकडे न्यायाची मागणी केली आहे.

कॅनॉलवर पाणी देण्याच्या वादातून बापलेकाला मारहाण

दगडाने डोक्यावर प्रहार; वडिलांनाही लाथाबुक्क्यांनी मारहाण



दगड उचलून एका आरोपीने निलेश यांच्या डोक्यावर प्रहार केला. त्यामुळे त्यांच्या डोक्याला दुखापत झाली.

देवळी जनमाध्यम : शेतातील पिकांना पाणी देण्यासाठी कॅनॉलवर पाइप लावत असताना झालेल्या वादातून दोघांनी बापलेकाला मारहाण केल्याची घटना बहादरपूर शिवारात घडली. यावेळी एका आरोपीने दगड उचलून तरुणाच्या डोक्यावर मारल्याने तो जखमी झाला. वडिलांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असता त्यांनाही लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली.

निलेश डोनाजी चाफले (३१, रा. आंजी, ता. देवळी) असे जखमी फिर्यादीचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, निलेश यांचे वडील कॅनॉलमधून शेताला पाणी देण्यासाठी पाइप लावत होते. यावेळी तेथे आलेल्या कार्तिक देशमुख आणि अध्य देशमुख (दोघेही रा. आंजी, ता. देवळी) यांनी येथे येऊन पाणी देऊ नका, असे म्हणत वाद घालण्यास सुरुवात केली.

वादाचे रूपांतर शिवीगाळ आणि मारहाणीत झाले. दोन्ही आरोपींनी निलेश यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. याचवेळी कॅनॉलवर पडलेला दगड उचलून एका आरोपीने निलेश यांच्या डोक्यावर प्रहार केला. त्यामुळे त्यांच्या डोक्याला दुखापत झाली.

मुलाला मारहाण होत असल्याचे पाहून वडिलांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, आरोपींनी त्यांनाही सोडले नाही. दोघांनी वडिलांनाही लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या प्रकारामुळे परिसरात तणाव निर्माण झाला. जखमी निलेश यांनी उपचार घेतल्यानंतर पोलिसांत तक्रार दाखल केली. त्यांच्या तोंडी रिपोर्ट आणि वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे देवळी पोलिसांनी कार्तिक देशमुख आणि अन्य एका आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(१), ३५२ व ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

सेलूत गावठी दारूभट्टीवर एलसीबीचा छापा; ६.३६ लाखांचा मुद्देमाल जप्त



सेलू जनमाध्यम - तालुक्यात अवैध गावठी दारू निर्मितीचा अड्डा सुरू असल्याची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धाड टाकून दारूभट्टी उद्ध्वस्त केली. या कारवाईत तब्बल ६ लाख ३६ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. घटनास्थळावरून दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले. ही कारवाई १६ नोव्हेंबर रोजी बीबी शिवारात करण्यात आली.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सेलू पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना सेलू येथील अविनाश मडावी हा साथीदारासह बीबी शिवारात संजय गोमासे यांच्या शेतालगत नाल्याजवळ पडीत जागेत हातभट्टी लावून गावठी मोहा दारू तयार करीत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळी छापा टाकला. यावेळी अविनाश बंडुजी मडावी (२१, रा. वॉर्ड क्रमांक ३, सेलू) आणि निलेश राजू परिसे (२६, रा. वॉर्ड क्रमांक ४, सेलू) हे दोघेही घटनास्थळी आढळून आले.पंचांसमक्ष तपासणी केली असता दारू निर्मितीचा मोठा साठा आढळला. यात ११ लोखंडी ड्रममध्ये भरलेला २२०० लिटर कच्चा मोहा सडवा, सहा ड्रममधील ६०० लिटर उकळता मोहा सडवा आणि १२ प्लास्टिक डबक्यांमध्ये भरलेली ३३६ लिटर गावठी मोहा दारू आढळून आली. याशिवाय दारू वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी बजाज पल्सर २२० मोटारसायकल, जर्मन घमेली आणि दारूभट्टीचे साहित्यही पोलिसांनी जप्त केले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार मनोज धात्रक, महादेव सानप, हर्षल सोनटक्के आणि अभिषेक नाईक यांनी केली.

साखरपुड्याच्या कार्यक्रमावरून परतणाऱ्या नातेवाइकांच्या वाहनावर हल्ला

धपकी गावात टोळक्याचा धुडगूस; दगडफेक व काठ्यांनी वाहनाची तोडफोड, महिला-पुरुषांना मारहाणीचा आरोप

दहेगाव गोसावी जनमाध्यम : साखरपुड्याचा कार्यक्रम आटोपून परतणाऱ्या नातेवाइकांच्या वाहनाला रस्त्यात अडवून टोळक्याने दगडफेक आणि काठ्यांनी हल्ला केल्याची खळबळजनक घटना धपकी गावात घडली.

या हल्ल्यात चारचाकी वाहनाच्या काचा फुटून मोठे नुकसान झाले. तसेच दुचाकीवरून जाणाऱ्या दाम्पत्याला खाली पाडून मारहाण करण्यात आल्याचा आरोप महिलेने पोलिसांत दिलेल्या तक्रारीत केला आहे. पोलिसांच्या उपस्थितीतही हल्लेखोरांनी गोंधळ घातल्याचे तक्रारीत नमूद आहे.

जया तानाजी शिंदे (२६, रा. साईबाबा कॉलनी, दिघोरी, नागपूर) यांनी याप्रकरणी दहेगाव गोसावी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, सुरेश बामा चव्हाण याचा पूर्वी त्यांच्या नातेवाइकांसोबत वाद झाला होता. या वादात जया यांचे वडील प्यारेलाल जगताप यांनी नातेवाइकांना मदत केली होती. त्याचाच राग मनात धरून सुरेश चव्हाण हा वडिलांसोबत वारंवार वाद घालत असल्याचा आरोप आहे.

१५ नोव्हेंबर रोजी जया यांचे मावसभाऊ सौरभ सुरेश जगताप यांचा धपकी येथे साखरपुडा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला जाण्यासाठी जया, त्यांचे वडील प्यारेलाल जगताप आणि अन्य नातेवाईक एमएच ४० बीसी १५६४ क्रमांकाच्या चारचाकी वाहनाने निघाले होते. त्यांच्यासोबत आरती प्रभाकर जगताप आणि त्यांचे पती प्रभाकर किसन जगताप हे दुचाकीने जात होते.

दरम्यान, धपकी गावात पोहोचण्यापूर्वी मुकिंद्र हिरालाल शिंदे यांनी फोन करून सुरेश चव्हाण आणि त्याचे नातेवाईक हल्ला करण्याच्या तयारीत असल्याची माहिती दिली. त्यामुळे जया आणि त्यांच्या नातेवाइकांनी प्रथम दहेगाव गोसावी पोलीस ठाण्यात जाऊन पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी अडचण आल्यास संपर्क साधण्यास सांगितल्यानंतर ते धपकीकडे रवाना झाले.

गावातील पुलाजवळ सुरेश चव्हाण, राजेंद्र सावंत, लंकेश जगताप, भाऊराव सावंत आणि अन्य काही जण रस्त्यावर काठ्या घेऊन उभे असल्याचे त्यांना दिसले. त्यानंतर पोलिसांच्या उपस्थितीत साखरपुड्याचा कार्यक्रम पार पडला. दुपारी सुमारे ४ वाजता कार्यक्रम संपल्यानंतर सर्वजण परतीच्या प्रवासाला निघाले.

यावेळी राजेंद्र रंगराव सावंत यांच्या घराजवळ रस्त्यावर पुन्हा टोळक्याने त्यांचा मार्ग अडविला. सुरेश चव्हाण आणि राजेंद्र सावंत यांनी दुचाकीवरून जाणाऱ्या आरती जगताप आणि त्यांचे पती प्रभाकर यांना मारहाण करून खाली पाडल्याचा आरोप आहे.

सुरेश चव्हाण याने इतरांना मारहाण करण्यास चिथावणी दिली. त्यानंतर काही महिलांसह अन्य व्यक्तींनी दगड उचलून चारचाकीवर फेकले. तर काहींनी काठ्यांनी वाहनावर हल्ला केला. या हल्ल्यात वाहनाच्या काचा फुटल्या, तर वाहनाचेही नुकसान झाले.

टोळक्याने जया आणि त्यांच्या नातेवाइकांना शिवीगाळ करून पुन्हा गावात आल्यास सोडणार नाही, अशी धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांनी जमावाला शांत करण्याचा प्रयत्न केला. मात्र, हल्लेखोर पोलिसांचेही ऐकत नसल्याने परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना प्रयत्न करावे लागले. अखेर पोलिसांनी नातेवाइकांना सुरक्षितपणे गावाबाहेर काढले.

या हल्ल्यात वाहनाचे अंदाजे ३० ते ३५ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे फिर्यादीने नमूद केले आहे. जया शिंदे यांच्या तक्रारीवरून दहेगाव गोसावी पोलिसांनी सुरेश चव्हाण, राजेंद्र सावंत यांच्यासह एकूण १९ जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

नशेच्या विळख्यातून वर्धा मुक्त करण्यासाठी पोलीस मैदानात

जिल्ह्यात २० विशेष पथके सक्रिय; ड्रग्ज तस्करांवर कठोर कारवाईचे पोलीस अधीक्षकांचे निर्देश

वर्धा जनमाध्यम : वर्धा जिल्ह्यातून अंमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी जिल्हा पोलीस दलाने आता आक्रमक पवित्रा घेतला आहे. 'ड्रग्ज फ्री वर्धा' अभियानांतर्गत जिल्हाभरात २० विशेष पथके सक्रिय करण्यात आली असून, अंमली पदार्थांची विक्री, तस्करी आणि सेवन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे निर्देश पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी दिले आहेत.

या अभियानांतर्गत जिल्ह्यातील १९ पोलीस ठाण्यांमध्ये प्रत्येकी एक अधिकारी आणि चार पोलीस अंमलदारांचा समावेश असलेली १९ पथके तयार करण्यात आली आहेत. याशिवाय स्थानिक गुन्हे शाखेचे एक स्वतंत्र पथक कार्यरत आहे. २४ जुलै २०२६ पासून ही पथके अंमली पदार्थविरोधी मोहिमेत सक्रिय झाली आहेत.

१६ नोव्हेंबर रोजी पोलीस अधीक्षक अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील सर्व ठाणेदार तसेच अँटी नारकोटिक्स सेलचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत जिल्ह्यातील अंमली पदार्थविरोधी कारवाईचा आढावा घेण्यात आला. विशेष पथकांच्या कामगिरीचीही तपासणी करून आगामी काळात कारवाई अधिक तीव्र करण्याचे निर्देश देण्यात आले.

अंमली पदार्थांच्या गुन्ह्यांमध्ये एकापेक्षा अधिक वेळा सहभागी असलेल्या गुन्हेगारांची स्वतंत्र माहिती संकलित करून त्यांच्याविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्याच्या सूचना ठाणेदारांना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे अंमली पदार्थांच्या अवैध व्यवसायात सक्रिय असलेल्यांवर पोलिसांची करडी नजर राहणार आहे.

सामाजिक कार्यकर्ते नारायण खेकडे यांचे निधन



हिंगणघाट जनमाध्यम : येथील स्वामी विवेकानंद वॉर्डातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नारायण नथ्थुजी खेकडे (वय ७२) यांचे निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन मुली असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर हिंगणघाट येथील वणा नदीच्या तीरावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

नावात बदल

माझे पूर्वी JAYSHRI UTTAMRAO BOTKULE असे नाव होते. माझ्या आधार कार्ड वरील JAYSHREE RAVINDRA YELEKAR नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता:- वॉर्ड नं २ गजानन नगर वर्धा ४४२००१

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते पुणे जिल्हा परिषदेच्या प्रवेशद्वाराचे लोकनेते अजितदादा पवार नामकरण व पुतळ्याचे अनावरण

दिवंगत अजित पवार ग्रामीण विकास व सहकार क्षेत्रातील ज्ञानकोष आणि नव्या नेतृत्वासाठी विद्यापीठ- केंद्रीय गृहमंत्री



पुणे/प्रतिनिधी- दूध संघ, प्राथमिक कृषी पतसंस्था, साखर कारखाने, नागरी सहकारी बँका आणि जिल्हा सहकारी बँकांच्या कामकाजाची इत्थंभूत माहिती असलेले अजितदादा हे ग्रामीण विकास व सहकार क्षेत्राचे चालते-बोलते ज्ञानकोश होते आणि त्याची कार्यपद्धती ही नव्या पिढीतील राजकीय नेतृत्वासाठी एका विद्यापीठाप्रमाणे आहे, अशा शब्दांत केंद्रीय गृह व सहकारमंत्री अमित शाह यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्याचा गौरव केला. पुणे जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात उभारण्यात आलेल्या लोकनेते अजितदादा पवार यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. तसेच जिल्हा परिषदेच्या प्रवेशद्वाराला 'अजितदादा पवार प्रवेशद्वार' असे नामकरण करण्यात आले. त्यानंतर नेहरू मेमोरियल हॉल येथे आयोजित कार्यक्रमात शाह बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, गृह राज्यमंत्री योगेश कदम, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, खासदार सुप्रिया सुळे, पार्थ पवार, माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, रवींद्र चव्हाण, ग्रामविकास विभागाचे सचिव चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील आदी उपस्थित होते. अजितदादांच्या कार्याचे स्मरण करताना केंद्रीय गृहमंत्री शाह म्हणाले, अजितदादा अखेरपर्यंत पुणे जिल्हा, बारामती आणि पिंपरी-चिंचवडच्या प्रश्नांसाठी आग्रही होते. सर्वोच्च पदावर पोहोचल्यानंतरही जमिनीशी नाळ जोडून ठेवणारे आणि सामान्य माणसाच्या प्रश्नांशी बांधिलकी जपणारे त्यांच्यासारखे नेतृत्व दुर्मीळ असते. साखर कारखान्यांवरील प्राप्तिकराचा प्रश्न सोडविण्यासाठी अजितदादांनी सातत्याने पाठपुरावा केला. एखाद्या प्रश्नाचे महत्व ओळखून त्याचा सातत्याने पाठपुरावा करण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. कोविडच्या संकटकाळातील त्यांच्या कार्यतत्परता आणि नागरिकांना वैद्यकीय सुविधा मिळण्यासाठी त्यांनी केलेला पाठपुरावा्यातून लोकांच्या प्रश्नांप्रती असलेली त्यांची आस्था आणि जबाबदारीची जाणीव दिसून येते. बारामतीच्या विकासात अजितदादांचे मोठे योगदान होते. बारामतीला देशातील सर्वाधिक विकसित मतदारसंघांपैकी एक बनविण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. लोकदरबाराच्या माध्यमातूनच जनतेच्या अडचणी समजतात आणि सामान्य नागरिकाला कधीही भेटता आले पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. विकासासाठीचे नियोजन, सातत्य आणि चिकाटीने उद्दिष्ट साध्य करण्याची त्यांची कार्यपद्धती अनुकरणीय होती, असेही शाह म्हणाले.

अजितदादांची कार्यपद्धती ही नव्या पिढीतील राजकीय नेतृत्वासाठी एका विद्यापीठाप्रमाणे आहे. लोकांशी संवेदनशीलतेने वागणे, कामाचे नियोजन, शिस्त आणि निश्चित वेळेत काम पूर्ण करण्याची त्यांची हातोटी नव्या पिढीने आत्मसात करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

जिल्हा परिषदेच्या प्रवेशद्वाराला अजितदादांचे नाव देणे आणि यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळ्याशेजारी त्यांचा अर्धाकृती पुतळा उभारणे ही समाधानाची बाब आहे. या माध्यमातून पुढील पिढ्यांना त्यांच्या कार्याची ओळख होऊन प्रेरणा मिळेल, असेही शाह यांनी नमूद केले.

अजितदादांची शिस्त, निर्णयक्षमता आणि कामाचा ठसा प्रेरणादायी - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

अजितदादांच्या आठवणींना उजाळा देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ते कणखर, शिस्तप्रिय, प्रशासनावर पकड असलेले आणि दूरदृष्टीचे नेतृत्व होते. पुणे जिल्हा परिषदेच्या कामकाजाला दिशा देण्यात त्यांचे मोठे योगदान होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषदेचे नवे नेतृत्व उभे राहिले. ज्या जिल्हा परिषदेच्या माध्यमातून त्यांनी पुण्याच्या ग्रामीण भागाच्या विकासासाठी प्रयत्न केले त्या पुणे जिल्हा परिषदेने त्यांच्या स्मरणार्थ पुतळा उभारणे आणि प्रवेशद्वाराला त्यांचे नाव देणे हा त्यांच्या कार्याचा उचित गौरव आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

अजितदादांच्या स्पष्टवक्तेपणाचा उल्लेख करताना मुख्यमंत्री म्हणाले, एखादी गोष्ट पटली तर ते ठामपणे तिच्या पाठीशी उभे राहत आणि न पटलेली गोष्ट स्पष्टपणे नाकारत. वित्तमंत्री म्हणून अनेक अर्थसंकल्प सादर करताना त्यांनी कठीण परिस्थितीतही आर्थिक शिस्त कायम राखली. विकासकामांमध्ये निधीचा योग्य विनियोग, कामांची गुणवत्ता आणि अपेक्षित परिणाम यावर त्यांचा विशेष आग्रह असायचा.

सकाळी सहा वाजता कामासाठी तयार होऊन सात वाजल्यापासून कामकाजाला सुरुवात करण्याची त्यांची शिस्त सर्वांनी अनुभवली आहे. मंत्रालयातही लवकर उपस्थित राहून कामांचा निपटारा करण्याची त्यांची पद्धत होती. महाराष्ट्रातील अनेक विकास प्रकल्पांवर त्यांच्या कामाचा ठसा आहे. वरकरणी कणखर वाटणारे अजितदादा जवळच्या माणसांवर तितकेच उत्कट प्रेम करायचे. सहकारी म्हणून त्यांनी दिलेली साथ आणि मार्गदर्शन कायम स्मरणात राहील. सध्याच्या दुष्काळी परिस्थितीतही त्यांची पदोपदी आठवण येते, असे मुख्यमंत्री म्हणाले.अजितदादांच्या अपघाती निधनाच्या चौकशीचा चौकशीचा अहवाल लवकरात लवकर यावा यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे विनंती केल्याचे फडणवीस यांनी सांगितले.अजितदादांसारखे नेतृत्व संघर्षातून घडते. शेती-मातीशी आणि सामान्य माणसाशी नाळ जोडलेले असे नेतृत्व निर्माण होण्यासाठी अनेक वर्षे लागतात. त्यांनी अपूर्ण ठेवलेले कार्य पुढे नेण्यासाठी आणि त्यांच्या स्वप्नातील महाराष्ट्र घडविण्यासाठी एकत्रित प्रयत्न करावेत, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

अजितदादा पुणे जिल्ह्याचा विकासाचे शिल्पकार - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, दिवंगत अजितदादांचे पुणे आणि बारामतीशी राजकारणापलीकडचे जिव्हाळ्याचे नाते होते. आमदार, विरोधी पक्षनेते आणि उपमुख्यमंत्री अशा विविध पदांवर त्यांनी काम केले. सहकार क्षेत्राचाही त्यांना दांडगा अनुभव होता. साखर कारखाने अडचणीत असताना त्यांच्या प्रयत्नातून केंद्र सरकारने साखर कारखान्यांवरील प्राप्तिकर माफ करण्याचा निर्णय घेतला.शासकीय वास्तूच्या माध्यमातून नागरिकांना न्याय आणि सुविधा मिळाल्या पाहिजेत, अशी त्यांची भूमिका होती. वास्तूंचे बांधकाम करताना प्रत्येक बाबीवर ते बारकाईने लक्ष देत असत. परखडपणा, स्पष्टवक्तेपणा, निर्भीडपणा आणि प्रेमळपणा हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे वैशिष्ट्य होते. सामान्य नागरिकांचे कल्याण हा त्यांच्या प्रत्येक निर्णयाचा केंद्रबिंदू असायचा. विविध योजनांची आणि प्रकल्पांची सखोल माहिती घेऊन ते निर्णय घेत असत.

पुणे जिल्ह्यासह महाराष्ट्राच्या विकासात अजितदादांचे मोठे योगदान आहे. पुणे मेट्रो, रिंग रोड आणि वाहतूक कोंडी सोडविण्यासारख्या महत्वाच्या प्रकल्पांमध्ये त्यांची भूमिका मोलाची होती. पुण्याचा कायापालट करण्यात त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले. त्यामुळे त्यांना पुणे जिल्ह्याच्या विकासाचे शिल्पकार म्हटले तर वावगे ठरणार नाही. त्यांच्या दूरदृष्टीतून सुरू झालेले प्रकल्प पूर्ण करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे शिंदे म्हणाले.

अजितदादांच्या स्वप्नांचा प्रवास आपण सर्वजण पूर्ण करू - उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या, लोकनेते अजितदादांच्या पुतळ्याचे अनावरण होत असलेला आजचा क्षण अत्यंत भावनिक आहे. ज्या पुणे जिल्ह्याच्या विकासासाठी त्यांनी आयुष्य वेचले, त्याच जिल्हा परिषदेच्या प्रांगणात त्यांचा पुतळा उभारला जात आहे, ही अभिमानाची बाब आहे. महाराष्ट्रातील छोट्या गावांपर्यंत त्यांच्याविषयी असलेले प्रेम हेच त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे खरे प्रमाणपत्र आहे. जितदादांचे मातीशी असलेले नाते, ग्रामीण भागातील नागरिकांशी असलेला संवाद आणि विकासकामांचा सातत्याने पाठपुरावा करण्याची त्यांची कार्यपद्धती वैशिष्ट्यपूर्ण होती. शेती, सहकार आणि ग्रामीण विकासाच्या प्रश्नांवर त्यांनी केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला. जिल्हा परिषदेच्या विकासाला दिशा देताना अजितदादांनी केवळ इमारती उभारण्याचा विचार केला नाही, तर गावखेड्यातील माणसांचे भविष्य घडविण्याला प्राधान्य दिले. कार्यालयात येणाऱ्या सामान्य नागरिकांना सुविधा मिळाव्यात, परिसर स्वच्छ आणि सुंदर असावा, याबाबत त्यांचा आग्रह होता. पर्यावरणाबद्दलही त्यांना विशेष आस्था होती. त्यांच्या स्मृती जपण्यासाठी प्रत्येक गावात, शाळेत आणि आरोग्य केंद्राच्या परिसरात झाडे लावून ती जगविण्याचा संकल्प करूया, असे आवाहन त्यांनी केले. अजितदादांच्या निधनानंतर गावोगावी भेटी दिल्या असता नागरिकांच्या मनातील त्यांच्याविषयीचे प्रेम अनुभवायला मिळाले. त्यांचा पुतळा आणि प्रवेशद्वाराला दिलेले नाव हे केवळ स्मारक नसून लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना कर्तव्याची जाणीव करून देणारी प्रेरणा आहे. राज्यातील दुष्काळी परिस्थितीत सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील. अजितदादांचा विकासाचा वारसा पुढे नेण्यासाठी सर्वांनी एकत्र यावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केले. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष विरधवल जगदाळे यांनी पुणे जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण विकासातील दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या योगदाना बाबतची माहिती प्रास्ताविकात दिली. यावेळी जिल्हा परिषदेच्या वतीने अजितदादांच्या कार्यकाळातील ग्रामविकासकामांची माहिती देणारी चित्रफीत दाखविण्यात आली. तसेच 'कर्मयोगी दादा' या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन करण्यात आले.

केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांची भारतीय जैन संघटनेच्या मुख्यालयास भेट



पुणे/प्रतिनिधी- केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भारतीय जैन संघटना (बीजेएस) आणि शांतीलाल मुथ्था फाउंडेशन (एसएमएफ) यांच्या पुणे येथील मुख्यालयाला भेट दिली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा अजित पवार, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्यासह संस्थेचे संस्थापक शांतिलाल मुथ्था आदी उपस्थित होते. केंद्रिय गृहमंत्री शाह यांनी, बीजेएस आणि एसएमएफ यांच्या ४२ वर्षांच्या प्रवासाची, सामाजिक योगदानाची आणि विविध उपक्रमांची माहिती घेऊन या संस्थांच्या कार्याचे कौतुक केले. मुथ्था यांनी जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, मूल्यवर्धन कार्यक्रम, आपत्ती व्यवस्थापन व पुनर्वसन तसेच सामाजिक विकासाच्या क्षेत्रांत संस्थेने केलेल्या कार्याची माहिती सादर केली.कार्यक्रमास भारतीय जैन संघटनेचे विश्वस्त वल्लभ भन्साळी, अभय फिरोदिया, व्यवस्थापकीय संचालक कोमल जैन, राष्ट्रीय अध्यक्ष नंदकिशोर सांकला आदी उपस्थित होते.

सहकारी संस्थांचे केंद्रीय निबंधक कार्यालयास भेट-तत्पूर्वी शाह आणि अन्य मान्यवरांनी नव्याने स्थापन झालेल्या सहकारी संस्थांचे केंद्रीय निबंधक, पश्चिम विभागीय कार्यालयास भेट देऊन पाहणी केली.

शैक्षणिक वर्ष २०२७ मध्ये २१ सीईटी परीक्षा

११ अभ्यासक्रमांसाठी दोन संधी -उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पाटील

मुंबई/प्रतिनिधी- महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी सेल) शैक्षणिक वर्ष २०२७-२८ साठी पदवी आणि पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक जाहीर केले आहे. यंदा एकूण २१ सीईटी परीक्षा घेण्यात येणार असून, त्यापैकी ११ अभ्यासक्रमांसाठी दोन वेळा परीक्षा देण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे. अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, यंदापासून पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन मॅनेजमेंट (पीजीडीएम), पोस्ट ग्रॅज्युएट सर्टिफिकेट इन मॅनेजमेंट (पीजीसीएम) आणि जनरल नर्सिंग अँड मिडवायफरी (जीएनएम) या तीन अभ्यासक्रमांच्या सीईटी प्रथमच घेतल्या जाणार आहेत. जानेवारी महिन्यात परीक्षा सुरू होऊन १० जून २०२७ पर्यंत विविध सीईटी परीक्षा पार पडणार आहेत. २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या २० सीईटी परीक्षांसाठी १८ लाख १४ हजार ४५६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती, तर १६ लाख ३१ हजार ३३५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. विद्यार्थ्यांना परीक्षेच्या अधिक संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने यंदा दोन वेळा सीईटी घेण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांची संख्या तीनवरून ११ करण्यात आली आहे.

■ पीजीडीएम, पीजीसीएम आणि जीएनएम नर्सिंगची प्रथमच सीईटी
■ पीसीएमची पहिली परीक्षा १६ ते २६ एप्रिलदरम्यान

११ अभ्यासक्रमांसाठी दोन वेळा परीक्षा- राष्ट्रीय स्तरावर जेईई मेनच्या दोन परीक्षा घेतल्या जात असल्याने विद्यार्थ्यांना अधिक संधी मिळतात. याच धर्तीवर महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनाही दोन संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने मागील वर्षापासून पीसीएम, पीसीबी आणि एमबीए/एमएमएस या तीन अभ्यासक्रमांच्या सीईटी दोन वेळा घेण्यात येत आहेत. या प्रयोगाला मिळालेला प्रतिसाद लक्षात घेऊन यंदा आणखी आठ अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार पीसीएम, पीसीबी, एमबीए/एमएमएस, पीजीडीएम, पीजीसीएम, पाच वर्षीय एलएलबी, बीएचएमसीटी, बीसीए, बीबीए, बीएमएस आणि बीबीएम अशा एकूण ११ अभ्यासक्रमांसाठी दोन वेळा सीईटी घेतली जाणार आहे. विद्यार्थ्यांना पहिली सीईटी देणे बंधनकारक असून दुसरी सीईटी ऐच्छिक राहणार आहे. दोन्ही परीक्षा दिल्यास प्रवेशासाठी विद्यार्थ्यांच्या ज्या परीक्षेत अधिक पर्सेंटाइल गुण असतील, तेच गुण ग्राह्य धरले जाणार आहेत.

पीजीडीएम, पीजीसीएम आणि जीएनएमची प्रथमच सीईटी

शासनाच्या निर्देशानुसार यंदा पीजीडीएम, पीजीसीएम आणि जीएनएम नर्सिंग या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रथमच सीईटी घेण्यात येणार आहे. यामध्ये पीजीडीएम आणि पीजीसीएम या अभ्यासक्रमांसाठी दोन वेळा परीक्षा होणार आहेत. पीजीडीएम व पीजीसीएम यांची सीईटी एमबीए सीईटी बरोबरच घेतली जाणार आहे.

दोन सीईटींच्या संभाव्य तारखा

एमबीए/एमएमएस, पीजीडीएम, पीजीसीएम : पहिली परीक्षा २८ ते ३० जानेवारी २०२७; दुसरी परीक्षा १ ते ३ एप्रिल २०२७.

पाच वर्षीय एलएलबी : पहिली परीक्षा २८ ते २९ मार्च; दुसरी परीक्षा २४ मे २०२७.

पीसीबी समूह : पहिली परीक्षा ८ ते १३ एप्रिल; दुसरी परीक्षा ६ ते ८ मे २०२७.

पर्यावरण रक्षणासह आर्थिक प्रगती शक्य; भारताने जगाला दिशा दाखविली-प्रिन्स विल्यम

मुंबई/प्रतिनिधी- पर्यावरणाचे रक्षण आणि आर्थिक विकास या परस्परविरोधी गोष्टी नसून, दोन्हींचा समतोल साधणे शक्य आहे, हे भारताने आपल्या कृतीतून जगाला दाखवून दिले आहे. पर्यावरणपूरक तंत्रज्ञान, नवनवीन संकल्पना आणि लोकसहभागाच्या माध्यमातून शाश्वत विकासाचा मार्ग अधिक सक्षम करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन ब्रिटनचे राजपुत्र आणि अर्थशॉट प्राईझचे संस्थापक अध्यक्ष प्रिन्स विल्यम यांनी केले. मुंबईतील जिओ कन्व्हेशन सेंटर येथे आयोजित अर्थशॉट प्राईझ इम्पॅक्ट असेम्ब्ली कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी अर्थशॉट प्राईझचे मुख्य कार्यकारी अधिकारी जेसन कनौफ आणि चेअरमन जेस्पर ब्रॉडीन यांच्यासह अर्थशॉट प्राईझचे अंतिम फेरीतील स्पर्धक तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. भारताच्या पर्यावरणपूरक विकासाचा उल्लेख करताना प्रिन्स विल्यम यांनी भारताच्या अक्षय ऊर्जा क्षेत्रातील प्रगतीचे विशेष कौतुक केले. भारताने स्थापित वीज निर्मिती क्षमतेपैकी ५० टक्के क्षमता बिगरजीवाश्म ऊर्जा स्रोतांमधून निर्माण करण्याचे उद्दिष्ट निर्धारित मुदतीच्या पाच वर्षे आधीच साध्य केले आहे. तसेच, गेल्या दशकभरात देशाची सौरऊर्जा क्षमता ५० पटींहून अधिक वाढली आहे, असे त्यांनी नमूद केले.

भारतीय नवकल्पनांची जागतिक दखल- अर्थशॉट प्राईझमध्ये भारताचे योगदान महत्वपूर्ण असल्याचे सांगताना, या पुरस्काराच्या इतिहासात सर्वाधिक विजेते आणि अंतिम फेरीतील स्पर्धक भारतातून असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. २०२१ मध्ये 'क्लीन अवर एअर' या विभागात पुरस्कार मिळविणाऱ्या 'टकाचार' या भारतीय संस्थेचे त्यांनी विशेष उदाहरण दिले. शेतीतील पिकांचे अवशेष आणि जंगलातील कचरा जाळण्याऐवजी त्यापासून इंधन व खतासारखी विक्रीयोग्य उत्पादने तयार करणारे पोर्टेबल तंत्रज्ञान टकाचार संस्थेने विकसित केले आहे.

ब्रिटनचे राजकुमार आणि राजकुमारी यांचा मुंबई मेट्रोतून प्रवास

मुंबई, दि. १६ : ब्रिटनचे राजकुमार प्रिन्स विल्यम आणि राजकुमारी कॅथरीन (केट) यांनी मुंबईच्या आधुनिक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची ओळख करून घेण्यासाठी मुंबई मेट्रोला भेट दिली. यावेळी त्यांनी विधान भवन मेट्रो स्थानक ते वांद्रे-कुर्ला संकुल (बीकेसी) असा मेट्रोतून प्रवास केला.या भेटीदरम्यान त्यांनी मुंबईतील मेट्रो सुविधांचा तसेच आधुनिक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अनुभव घेतला. मुंबईच्या शहरी वाहतूक व्यवस्थेतील मेट्रोचे महत्व या भेटीच्या माध्यमातून अधोरेखित झाले.

अग्निवीरांसाठी गूड न्यूज! ६ वर्षांची सेवा पूर्ण केल्यानंतर मिळणार पर्मनंट नोकरी; सीडीएस एनएस राजा सुब्रमणी यांची घोषणा

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- अग्निपथ योजनेअंतर्गत भरती झालेल्या अग्निवीरांच्या भविष्याबाबत चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल एन. एस. राजा सुब्रमणी यांनी एक अत्यंत महत्त्वाची घोषणा केली. ज्या अग्निवीरांना ६ वर्षांचा कार्यकाळ दिला जात आहे, त्यांना सेवा पूर्ण झाल्यानंतर सैन्यात पर्मनंट नोकरी दिली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. वृत्तसंस्था एएनआयच्या 'नॅशनल सिक्युरिटी समिट ३.०' या कार्यक्रमात बोलताना जनरल सुब्रमणी यांनी अग्निपथ योजनेत करण्यात आलेल्या बदलांची सविस्तर माहिती दिली. अग्निवीरांचा ४ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या कामगिरीचा आढावा घेतला जाईल आणि ज्यांना २ वर्षांची मुदतवाढ दिली जाईल, त्यांना सैन्यात कायम होण्याची संधी मिळेल, हे आधीच ठरले होते, असे त्यांनी सांगितले.योजनेतील बदलांवर भाष्य करताना सीडीएस म्हणाले की, 'हा कोणताही यू-टर्न किंवा रोलबॅक नाही. चार वर्षांपूर्वी जेव्हा आम्ही अग्निपथ योजना सुरू केली होती, तेव्हाच वेळोवेळी तिचा आढावा घेतला जाईल असे स्पष्ट करण्यात आले होते. तसेच या योजनेत गरजेनुसार बदल करण्यात येईल, असेही सांगण्यात आले होते.' या योजनेवरून सुरू असलेल्या राजकीय आणि सार्वजनिक वादावर निशाणा साधताना जनरल सुब्रमणी पुढे म्हणाले की, 'जे लोक आज या योजनेबद्दल संभ्रम पसरवत आहेत, तेच लोक सुरुवातीला या योजनेला विरोध करत होते. आता ते यामध्ये करण्यात आलेल्या बदलांनाही विरोध करत आहेत.' हे सर्व निर्णय अत्यंत विचारपूर्वक घेण्यात आल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. दरम्यान, चार वर्षांची सेवा पूर्ण केल्यानंतर २५ टक्के अग्निवीरांची नियमित सैनिक म्हणून कायमस्वरूपी भरतीसाठी निवड सुरूच राहील. उरलेले ७५ टक्के अग्निवीर दोन वर्षांची 'टूर ऑफ ड्यूटी' करतील. या दोन वर्षांच्या 'टूर ऑफ ड्यूटी'नंतर या सर्वांना पर्मनंट केले जाईल, याबाबत कोणताही संभ्रम नाही. अग्निवीरांना त्यांची ४ किंवा ६ वर्षांची सेवा पूर्ण झाल्यानंतर जर स्वतःहून निवृत्ती घ्यायची असेल, तर तो पर्यायही त्यांच्यासाठी खुला असेल, असेही सीडीएस यांनी स्पष्ट केले.



वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अडचणी प्राधान्याने सोडविणार-सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर

मुंबई/प्रतिनिधी- वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा कारभार महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या ताब्यात आहे. या बँकेला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी आणि प्रशासकीय स्थैर्य देण्यासाठी डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत प्रशासक पदभार स्वीकारणार असल्याचे पालकमंत्री तथा सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत स्पष्ट करण्यात आले. या बँकेच्या प्रशासकीय, आर्थिक आणि कर्मचारीविषयक विविध अडचणी सोडविण्यास शासनाचे प्राधान्य आहे. बँकेच्या प्रश्नांचा सविस्तर आढावा घेऊन सर्व मुद्दे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापुढे मांडण्यात येतील, अशी ग्वाही यावेळी मंत्री डॉ. भोयर यांनी दिली. वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अडीअडचणींबाबत सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, सहकार आयुक्त दीपक तावरे, वर्धा जिल्हाधिकारी वान्मथी सी., महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर, तसेच सहकार विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत बँकेच्या आर्थिक स्थितीचा, थकीत कर्जाचा, ठेवींचा, कर्जवसुलीचा, शेतकऱ्यांना कर्जपुरवठा, कर्मचारीविषयक प्रश्न आणि प्रशासकीय अडचणींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. बँकेच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे आणि आवश्यक उपाययोजना प्राधान्याने कराव्यात, असे निर्देश डॉ. भोयर यांनी दिले.३१ ऑक्टोबर २०२६ अखेरच्या आर्थिक आकडेवारीनुसार, बँकेच्या राज्यात एकूण नऊ शाखा असून, ६७ कर्मचारी कार्यरत आहेत. बँकेच्या ठेवी ३२६.६४ कोटी रुपये, गुंतवणूक ३३१.२६ कोटी रुपये, तर एकूण निधी १६४.४५ कोटी रुपये आहे. बँकेच्या कर्जविषयक व्यवहारांसह अनुत्पादित कर्जाचे प्रमाण, कर्जवसुली आणि आर्थिक स्थैर्य यासंदर्भातील बाबींवर बैठकीत चर्चा करण्यात आली. बँकेच्या एकूण अनुत्पादित कर्जाचे प्रमाण ९०.४४ टक्के असून, थकीत कर्जाची वसुली प्रभावीपणे करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश मंत्री भोयर यांनी दिले.शेतकऱ्यांना पीककर्ज उपलब्ध करून देणे, कर्जवसुलीला गती देणे, बँकेच्या आर्थिक व्यवहारांमध्ये सुधारणा करणे तसेच कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांचे निराकरण करणे या विषयांवरही बैठकीत चर्चा करण्यात आली. बँकेच्या आर्थिक अडचणींवर मात करण्यासाठी शासनस्तरावर आवश्यक पाठपुरावा करण्यात येईल. संबंधित विभागांनी बँकेच्या प्रश्नांचा गांभीर्याने विचार करून त्यावर सकारात्मक कार्यवाही करावी.

सहायक अधीक्षक सुमित राठोड यांना माहिती व जनसंपर्क विभागातर्फे मंत्रालयात श्रद्धांजली

मुंबई/प्रतिनिधी- माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय येथे कार्यरत सहायक अधीक्षक सुमित हरिदास राठोड (वय ४५) यांचे शनिवार, १४ नोव्हेंबर रोजी विरार येथील राहत्या घरी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने आकस्मिक निधन झाले.दिवंगत सुमित राठोड यांच्या पार्थिवावर यवतमाळ येथील मोक्षधाम येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. मंत्रालयातील माहिती व जनसंपर्क विभागात त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दिवंगत राठोड यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. सुमित राठोड हे मूळचे यवतमाळ जिल्ह्यातील रहिवासी होते. २००८ मध्ये त्यांची माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई येथे लिपिक पदावर नियुक्ती झाली होती. गेल्या १८ वर्षांपासून ते महासंचालनालयात कार्यरत होते. या कालावधीत त्यांनी विविध शाखांमध्ये जबाबदारीने व कुशलतेने कामकाज सांभाळले. यावेळी संचालक (माहिती) (प्रशासन) डॉ. किशोर गांगुर्डे, संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क) गोविंद अहंकारी, उपसंचालक (वृत्त) वर्षा आंधळे, उपसंचालक (प्रकाशने) सीमा रनाळकर, उपसंचालक (प्रशासन) डॉ. जगदीश मोरे यांच्यासह विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांना श्रध्दांजली अर्पण केली. दिवंगत राठोड यांच्या आकस्मिक निधनाने विभागाने एक कर्तव्यदक्ष सहकारी गमावला असून, त्यांच्या निधनाबद्दल माहिती व जनसंपर्क विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

गुंतवणूकदारांच्या दृष्टीने...

सोने आणि चांदी हे अलंकार किंवा पारंपरिक बचतीचे माध्यम असण्याबरोबरच जागतिक बाजारपेठेतील अत्यंत संवेदनशील पण प्रमाणित असे जिन्नस अर्थात कमोडिटी मानले जातात. ज्या वस्तूंची गुणवत्ता सर्वत्र एकसमान असते आणि ज्यांचा व्यापार जागतिक स्तरावर मागणी व पुरवठ्याच्या मूलभूत नियमांवर चालतो, त्यांना अर्थशास्त्रात कमोडिटी असे संबोधले जाते. खनिज तेल, नैसर्गिक वायू, तांबे किंवा गहू, तांदूळ यांसारख्या कच्च्या मालाच्या श्रेणीतच सोने आणि चांदीचा समावेश होतो; मात्र इतर कमोडीटींच्या तुलनेत मौल्यवान धातूंना दुहेरी आर्थिक व्यक्तिमत्त्व प्राप्त झाले आहे. एकीकडे ते प्रत्यक्ष वापराचे आणि औद्योगिक उत्पादनाचे घटक आहेत, तर दुसरीकडे ते कागदी चलनाला पर्याय ठरणारी सार्वत्रिक आणि कालातीत वित्तीय मालमत्ता म्हणून कार्य करतात. नाशवंत नसणे, मर्यादित नैसर्गिक साठा, सहज विभाज्यता आणि जागतिक पातळीवरील सर्वमान्य स्वीकारार्हता या वैशिष्ट्यांमुळे सोने आणि चांदीला चलनविषयक सुरक्षिततेचे कवच मानले जाते. या धातूंचा व्यवहार आंतरराष्ट्रीय कमोडिटी बाजारपेठांमध्ये वायदे, रोखे आणि विनिमय निधींच्या माध्यमातून होत असल्याने त्यांच्या किमती जागतिक व्याजदर, डॉलरचे मूल्य, महागाईचा दर आणि भूराजकीय घडामोडींनुसार सतत हेलकावे खात असतात.यामध्ये एक सरळसाधे अर्थकारण नेहमीच दिसून आले आहे, ते म्हणजे असुरक्षित, अस्थिर जागतिक वातावरणात सोने-चांदी या कमोडिटींचे भाव वधारतात. कोरोना महामारी काळात हे प्रकर्षाने पाहायला मिळाले. किंबहुना मार्च २०२० पासून चालू वर्षाच्या सुरुवातीपर्यंत सोन्याच्या दराचा आलेख सातत्याने चढाच राहिला. २०२० मध्ये भारतात २४ कॅरेट सोन्याचा सरासरी दर प्रति १० ग्रॅम सुमारे ४८,६५० रुपये आणि चांदीचा दर प्रतिकिलो ५९,२८० रुपयांच्या आसपास होता. त्यानंतर २०२२ मध्ये रशिया-युक्रेन युद्धाच्या ठिणगीने आणि जागतिक महागाईने सोने ५१,९८० रुपये आणि चांदी ६५,४०० रुपयांपर्यंत पोहोचली. पुढील दोन वर्षांमध्ये जागतिक मध्यवर्ती बँकांनी डॉलरवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सोने खरेदी सुरू ठेवल्याने दर अनुक्रमे ६०,६०० रुपये आणि ७५,८४० रुपये प्रति १० ग्रॅमपर्यंत चढले, तर चांदीनेही ८९,१३० रुपयांचा टप्पा ओलांडला. गतवर्षी या दरांनी ऐतिहासिक भरारी घेतली. विशेषतः आखातातील संघर्ष भडकण्याची चिन्हे दिसू लागताच सोन्याने जोरदार उसळी घेतली. इतिहासात प्रथमच सोन्याचे भाव दीड लाख रुपये प्रतिदहा ग्रॅम इतके झाले. याच कालावधीत चांदीने तर सोन्यालाही मागे टाकत २०२५ मध्ये १,६२,६७० रुपयांचा टप्पा पार केला आणि जानेवारी २०२६ मध्ये तर प्रतिकिलो ३,७९,९८० ते ४,२०,००० रुपयांच्या शिखराला स्पर्श केला.अवघ्या सहा वर्षांत सोन्याच्या किमतीत जवळपास तिप्पट, तर चांदीच्या किमतीत शिखरावर असताना तब्बल सात ते आठ पटींनी वाढ झाली. गुंतवणूकदारांच्या दृष्टीने ही वाढ आनंदी आनंद गडे ठरली. कारण, या मौल्यवान धातूंनी महागाईवर मात करणारा घसघशीत परतावा दिला; मात्र गेल्या दोन महिन्यांमध्ये सोन्या-चांदीच्या किमतीत लक्षणीय घसरण होत आहे. भारतात चांदीचे दर प्रतिकिलो दोन लाख रुपयांखाली घसरून ११ महिन्यांच्या नीचांकी पातळीवर पोहोचले, तर २४ कॅरेट सोन्याचे दरही प्रति १० ग्रॅम सुमारे १,४२,००० रुपयांच्या आसपास खाली आलेत. चालू वर्षाच्या सुरुवातीला २९ जानेवारी २०२६ रोजी मल्टिकमोडिटी एक्स्चेंज (एमसीएक्स) स्पॉट बाजारात सोन्याने प्रति १० ग्रॅम सुमारे १,७६,३०६ रुपयांचा ऐतिहासिक टप्पा गाठला होता, तर देशभरातील विविध प्रमुख शहरांमध्ये जीएसटी तसेच स्थानिक करांसह हे भाव १,८३,००० रुपयांपर्यंत पोहोचले होते. म्हणजेच आजचे भाव हे याच वर्षातील उच्चांकी पातळीपेक्षा २० ते २२ टक्क्यांनी कमी आहेत. चांदीचे दर तर ५० टक्क्यांनी घसरलेत. या घसरणीमागे जागतिक व्याजदर, चलनवाढ, वित्तीय संस्थांचा खर्च आणि आशियाई देशांची दीर्घकालीन रणनीती असे अनेक घटक कारणीभूत आहेत. या विक्रमी घसरणीमुळे यंदा दिवाळीमध्ये भारतात सोन्या-चांदीची तुफानी खरेदी पाहायला मिळाली.भारतीयांच्या सोने प्रेमाला महागाईची झळ सहसा दिसून येत नाही; मात्र सोने पावणे दोन लाखांच्या पुढे गेल्यानंतर सर्वसामान्य ग्राहकांनी खरेदीला आवर घातला होता. विशेषतः गेल्या चार-सहा महिन्यांत म्हणजेच पंतप्रधान मोदींच्या आवाहनानंतर सोने खरेदी जाणीवपूर्वक टाळण्याचा विचार सुरू झाला होता. कारण, सोने हे देशांतर्गत उत्पादन नसून ते आयात करावे लागते. साहजिकच, जितकी त्याची खरेदी अधिक तितका आयातीचा खर्च जास्त. तो वाढला की, रुपयावर दबाव येतो. विदेशी गंगाजळीला फटका बसतो. त्यामुळेच पंतप्रधान मोदींनी केलेल्या काटकसरीच्या आवाहनात सोने खरेदीचा मुद्दा प्राधान्याने होता; पण यंदाच्या दिवाळीआधी आखातातील युद्धसंघर्ष निवळण्याचे संकेत दिसू लागले होते. अमेरिकेतील मध्यावधी निवडणुकांमध्ये डोनाल्ड ट्रम्प यांच्या पक्षाचा 'दारुण' शब्दालाही लाजवेल असा पराभव झाल्याने युद्धबंदीच्या शक्यतांना अधिक बळकटी दिली. कच्च्या तेलातील घसरणीने आगामी काळातील जोखीम कमी झाल्याचे स्पष्ट केले. भारतीय शेअर बाजाराने पुन्हा उच्चांकासमीप झेप घेऊन जागतिक प्रवाहांची दिशा अनुकूल असल्याची दुंदुभी दिली. याच शृंखलेतील एक भाग म्हणून सोन्या-चांदीच्या भावांत झालेल्या घसरणीकडे पाहायला हवे.कच्चे तेल, सोने-चांदीच्या भावांची उतरणीला लागलेली गाडी आणि भांडवली बाजारांमधील तेजी या दोन्हींचा सामायिक अर्थ एकच, तो म्हणजे संघर्षकाळ संपतो आहे आणि शांतता येणार आहे. दिवाळीत सोन्या-चांदीची जोरदार खरेदी करून भारतीय ग्राहकांनीही या प्रवाहाचे पाईक बनणे पसंत केले. यंदाच्या धनत्रयोदशी आणि दिवाळीच्या काळात देशभरात सुमारे ५२ टन सोन्याची आणि ३०० टन चांदीची विक्री झाल्याचा सराफा उद्योग संघटनेचा अंदाज आहे. सोने खरेदीत गेल्या वर्षीच्या तुलनेत ३० टक्के, तर चांदीच्या खरेदीत १० टक्के वाढ झाली. सोन्याच्या विक्रीचे मूल्य तब्बल ७२ हजार कोटी रुपये असल्याचे सांगितले जाते. आगामी काळात सोन्याच्या दरातील सध्याची घसरण कायम राहील की नाही, हे जागतिक घडामोडींवर अवलंबून असेल. मध्यवर्ती बँकांकडून सुरू असलेली सोने खरेदी, जागतिक कर्जाचे वाढते प्रमाण आणि आंतरराष्ट्रीय राजकारणातील अनिश्चितता हे घटक दीर्घकालीन मागणीला आधार देऊ शकतात. दुसरीकडे अमेरिकी व्याजदर आणि डॉलरमधील चढउतार अल्पकालीन किमतींवर दबाव निर्माण करू शकतात. सोन्याला सुरक्षित मालमत्ता मानणे योग्य असले, तरी त्याच्या बाजारभावाला सुरक्षिततेची हमी समजणे चुकीचे आहे. सध्याच्या घसरणीने गुंतवणूकदारांना दिलेला सर्वांत महत्त्वाचा इशारा हाच आहे.

अमेरिकेचा कौल, भारताचा हिशेब

अमेरिकेच्या मध्यावधी निवडणुकीत ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाला बसलेला धक्का हा महागाई, युद्धखर्च आणि जनतेच्या नाराजीचा परिणाम आहे. या सत्ताबदलातून भारतासाठी ऊर्जा सुरक्षा, व्यापारसंधी आणि मुत्सद्देगिरीच्या नव्या शक्यता निर्माण होऊ शकतात. मात्र, अमेरिकेतील राजकीय बदलांवर अवलंबून न राहता भारताने स्वतःचे आर्थिक हितसंबंध, परराष्ट्र धोरण आणि लोकशाहीतील उत्तरदायित्व अधिक सक्षम करणे आवश्यक आहे.



देश महान होत असल्याचे रोज सांगितले जात असताना नागरिकाचे जगणे मात्र महाग होत असेल, तर त्याने महानतेचा जयघोष करायचा की महिन्याच्या खर्चाचा हिशेब मागायचा? अमेरिकेच्या मध्यावधी निवडणुकीत मतदारांनी दुसरा पर्याय निवडला. डोनाल्ड ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाला बसलेला फटका समजून घेण्यासाठी प्रचारसभांतील गर्जनांपेक्षा किराणा दुकानातील पावती अधिक उपयोगाची आहे. अमेरिकेला पुन्हा महान बनविण्याची घोषणा देणाऱ्या 'मागा' राजकारणाला मतदारांनी आपल्या जगण्यात काय सुधारले, असा प्रश्न विचारला. तीन नोव्हेंबरच्या निवडणुकीत प्रतिनिधिगृह आणि सिनेट या दोन्ही सभागृहांवरील नियंत्रण डेमोक्रॅटिक पक्षाकडे गेले. अर्थात, संपूर्ण अमेरिका ट्रम्पविरोधी झाली किंवा त्यांचा समर्थकवर्ग संपला, असा त्याचा अर्थ नाही. मात्र, दोन वर्षांपूर्वी मिळालेला विजय म्हणजे पुढील प्रत्येक निर्णयाला मिळालेली जनमान्यता नव्हे, हे स्पष्ट झाले. सत्ताधाऱ्यांना निवडून देताना नागरिक स्वतःच्या प्रश्नांची मालकी त्यांच्याकडे सोपवीत नसतो. भारतासाठीही या निकालाचे महत्त्व ट्रम्प यांच्या पराभवाच्या चर्चेपेक्षा या प्रश्नात आणि बदललेल्या सत्तासंतुलनात अधिक आहे.

ट्रम्प यांच्या राजकारणातील विरोधाभास असा की, प्रस्थापित व्यवस्थेविरोधातील रागावर स्वार झालेल्या नेतृत्वालाच आता आपल्या व्यवस्थेचा हिशेब द्यावा लागत आहे. स्थलांतरितांना दोष देणे, विरोधकांच्या राष्ट्रनिष्ठेवर संशय घेणे किंवा माध्यमांवर आगपाखड करणे यातून समर्थकांना चिथावता येते; घरभाडे कमी करता येत नाही. आरोग्यविमा, शिक्षण, किराणा आणि कर्जाचे हप्ते यांसमोर सांस्कृतिक संघर्षाच्या घोषणा अपुऱ्या पडतात. अर्थव्यवस्थेची वाढ आणि सामान्य घरातील सुबत्ता यांतील अंतरही येथे महत्त्वाचे आहे. महागाईचा दर कमी झाला, तरी आधी वाढलेल्या किमती आपोआप खाली येत नाहीत. सरकारी आकडे दिलासा देत असताना नागरिकाचा खिसा ताणलेलाच असू शकतो. परदेशी मालावर आयातशुल्क लावून दुसऱ्या देशाला धडा शिकविल्याचे सांगितले, तरी त्याचा भार आपल्याच ग्राहकावर पडत असेल, तर शिक्षा कोणाला झाली? स्वस्ताईचे आश्वासन देऊन सत्तेत आलेल्या नेतृत्वावरील विश्वास अशाच ठिकाणी तुटतो. धनदांडग्यांचे हित साधले जाते आणि आपल्याला केवळ अभिमान बाळगण्यास सांगितले जाते, ही भावना राजकीयदृष्ट्या अधिक घातक ठरते.

इराणविरुद्धच्या युद्धाने या अविश्वासाला आणखी धार दिली. नवी युद्धे टाळण्याचे आश्वासन देणाऱ्या नेतृत्वाने अमेरिकेला दीर्घ संघर्षात गुंतविल्यावर त्याची किंमत विचारली जाणारच होती. युद्ध नकाशावर दूर लढले जाते; त्याचे बिल पेट्रोलपंपावर जवळ येते. इंधनाचा खर्च, वाहतुकीतील अडथळे, संरक्षणावरील खर्च आणि सैनिकांची सुरक्षितता हे प्रश्न अमेरिकन घरांपर्यंत पोहोचले. 'अमेरिका प्रथम'मध्ये सामान्य अमेरिकन कितव्या क्रमांकावर आहे, असा प्रश्न विचारणाऱ्यांना राष्ट्रद्रोही ठरवून भागणार नव्हते. निवडणुकीनंतर ट्रम्प यांनीही पराभवामध्ये इराणचा वाटा असल्याचे मान्य केले. अर्थात, सर्व महागाई युद्धामुळेच झाली, असा निष्कर्ष चुकीचा ठरेल. व्यापारधोरण, आरोग्यखर्च आणि आधीपासूनचे आर्थिक ताणही त्याला कारणीभूत होते. युद्ध आणि महागाई यांचा स्वतंत्र मतवाटा मोजता येत नाही; त्यांनी एकमेकांना बळ दिले. आंतरराष्ट्रीय सामर्थ्याचे प्रदर्शन आणि नागरिकाची आर्थिक सुरक्षितता यांचा मेळ घालता आला नाही, तर महासत्तेच्या नागरिकालाही आपल्या सरकारच्या प्राधान्यक्रमांचा संशय येतो. अमेरिकेतील निवडणुकीने परराष्ट्र धोरणाचा हिशेब स्वयंपाकघरातही विचारला जातो, एवढे निश्चित दाखविले.

रिपब्लिकन बालेकिल्ल्यांतील पडझड समजून घेताना हा आर्थिक असंतोष आणि स्थानिक वास्तव एकत्र पाहावे लागते. टेक्सासमध्ये जेम्स टॅलेरिको यांनी केन पॅक्स्टन यांच्याविरोधात जगण्याचा खर्च आणि भ्रष्टाचाराचे प्रश्न पुढे केले. ट्रम्प यांच्या पाठिंब्यामुळे पॅक्स्टन यांच्याभोवतीच्या वादांचे ओझे हलके झाले नाही. कॅन्ससमध्ये ?डम हॅमिल्टन यांनी परवडणारी आरोग्यसेवा, ग्रामीण रुग्णालये आणि घरांच्या किमतींवर भर दिला. शेतमालाला बाजार, मुलांना सक्षम शाळा, महिलांचे अधिकार आणि स्थानिक रोजगार या प्रश्नांना राष्ट्रीय शत्रू दाखवून उत्तरे मिळत नाहीत. पक्षाचे नेतृत्व एका व्यक्तीत सामावले की स्थानिक उमेदवाराची स्वतंत्र विश्वासार्हताही दुय्यम होते. मग नेत्याच्या लोकप्रियतेचा लाभ घेणाऱ्यांना त्याच्यावरील नाराजीची किंमतही मोजावी लागते. तरुण, महिला, लॅटिनो आणि पक्षनिष्ठेबाहेरील मतदारांना कायम गृहीत धरता येत नाही. पक्षाची पाटी परिचित असणे आणि उमेदवार आपले जगणे समजून घेणे, या वेगळ्या गोष्टी आहेत. दिल्लीतील लोकप्रिय नेत्याचे छायाचित्र गावातील बंद पडलेल्या दवाखान्याचे समर्थन किती दिवस करणार, हा प्रश्न भारतीय पक्षांनाही पडायला हवा.

आता पुढील दोन वर्षे ट्रम्प यांना किती लगाम बसेल? तीन जानेवारी २०२७ पासून नवी काँग्रेस कार्यरत झाल्यावर डेमोक्रॅटिक पक्षाला सरकारी खर्चाच्या मंजुरीत अटी घालता येतील, विधेयके रोखता येतील आणि प्रशासकीय निर्णयांच्या चौकशा करता येतील. सिनेटच्या बहुमतामुळे वरिष्ठ अधिकारी आणि न्यायाधीशांच्या नियुक्त्यांची छाननी अधिक कठोर होऊ शकते. युद्धासाठी पैसा मागताना त्याच्या उद्दिष्टांचा हिशेब द्यावा लागेल. पण ट्रम्प यांचे अध्यक्षपद संपलेले नाही. त्यांचा नकाराधिकार उलथविण्यासाठी दोन्ही सभागृहांत मतदान करणाऱ्यांचे दोनतृतीयांश समर्थन लागते; अनेक विधेयकांवरील सिनेटमधील अडवणूक संपविण्यासाठी साधारणतः साठ मते आवश्यक असतात. कार्यकारी आणि परराष्ट्र व्यवहारांतील अधिकारही त्यांच्या हाती राहतील. त्यामुळे नियंत्रण वाढेल; प्रत्येक निर्णयावर बंदी येणार नाही. डेमोक्रॅटिक पक्षाची कसोटीही केवळ चौकशीच्या मथळ्यांत नसेल. महागाई, रोजगार आणि आरोग्यसेवेवर विश्वासार्ह पर्याय द्यावा लागेल. अन्यथा आजचा विजय उद्याच्या नाराजीची प्रस्तावना ठरेल. आगामी अध्यक्षीय निवडणुकीकडे पाहताना विरोधकांनी हे विसरू नये की त्यांनाही जनतेने संधी दिली आहे, मनमानीचा परवाना नव्हे.

भारतासाठी पहिली शक्यता ऊर्जा सुरक्षा आणि पश्चिम आशियातील स्थैर्याची आहे. युद्ध आटोक्यात आणण्यासाठी दबाव वाढला, सागरी वाहतूक सुरक्षित झाली आणि तेलपुरवठ्यावरील जोखीम कमी झाली, तर आपल्या आयातखर्चाला दिलासा मिळू शकतो. त्याचा परिणाम वाहतूक, उद्योग आणि महागाईच्या व्यवस्थापनावर होईल. आखाती देशांतील भारतीयांचे रोजगार, सुरक्षितता आणि भारतात येणारे त्यांचे उत्पन्न यांचाही विचार करावा लागतो. इराणशी संवाद आणि मध्य आशियाशी संपर्काच्या आपल्या गरजांसाठीही तणाव कमी होणे उपयुक्त ठरेल. मात्र, अमेरिकेतील मतपेटी उघडली म्हणजे दुसऱ्या दिवशी भारतातील पेट्रोल स्वस्त होईल, असे समीकरण नाही. इराण, इस्रायल आणि इतर प्रादेशिक शक्तींची गणिते स्वतंत्र आहेत. देशांतर्गत अडथळ्यांना उत्तर म्हणून ट्रम्प बाहेर अधिक आक्रमक होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. भारताने शांततेसाठी प्रयत्न वाढवितानाच ऊर्जा पुरवठ्याचे पर्याय, सागरी मार्गांची सुरक्षितता आणि आपत्कालीन तयारी मजबूत ठेवली पाहिजे. दुसऱ्याच्या राजकीय संयमावर आपली ऊर्जा सुरक्षा सोपविणे म्हणजे मुत्सद्देगिरी नव्हे; ती आपल्या जबाबदारीतून सुटका करून घेण्याची सोय आहे.

व्यापाराच्या आघाडीवरही संधी आहे; हमी नाही. अमेरिकन ग्राहकाला महाग पडणाऱ्या आयातशुल्कांविरोधात तेथील उद्योग आणि लोकप्रतिनिधींमध्ये सहमती उभी करता आली, तर भारतीय निर्यातदारांना अधिक स्थिर अटी मिळविता येतील. वस्त्रोद्योग, औषधे, अभियांत्रिकी उत्पादने आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रासाठी हा संवाद महत्त्वाचा ठरेल. भारतीय उत्पादनांमुळे अमेरिकन ग्राहकाचा खर्च कसा कमी होतो, भारतीय कंपन्यांमुळे तेथे रोजगार कसे निर्माण होतात, हे पटवून द्यावे लागेल. मात्र, डेमोक्रॅटिक पक्षाचा विजय म्हणजे भारतीय व्यावसायिकांच्या प्रवेशपरवान्यांचे प्रश्न संपले किंवा अमेरिकन बाजाराचे दरवाजे सताड उघडले, असा नाही. रोजगाराचे संरक्षण, तंत्रज्ञानावरील निर्बंध, बाजारपेठेतील प्रवेश आणि मानवी हक्कांच्या प्रश्नांवर त्यांच्याशीही मतभेद संभवतात. आपल्या हितासाठी अमेरिकेतील सत्ताबदलाचे स्वागत करताना त्यांचे राष्ट्रहित बदललेले नसते, हे लक्षात ठेवावे लागेल. भारताला हवी असलेली स्थिरता केवळ विरोधी पक्षाच्या बहुमतातून येणार नाही; स्पष्ट करार, परस्परांचे आर्थिक हितसंबंध आणि सातत्यपूर्ण वाटाघाटींतून ती निर्माण करावी लागेल. दुसऱ्याची राजकीय अडचण आपल्यासाठी संधी असू शकते; तयार लाभ नसतो.

आंतरराष्ट्रीय पातळीवर मित्रदेशांशी सल्लामसलत, बहुपक्षीय करार आणि निर्णयांतील सातत्यासाठी अमेरिकन सरकारवर दबाव वाढू शकतो. युरोपची सुरक्षा, युक्रेनमधील संघर्ष, पश्चिम आशियातील तणाव किंवा हवामानविषयक सहकार्य या प्रश्नांवर संसदेतील बदलाचा प्रभाव पडू शकतो. पण विभागलेली सत्ता म्हणजे नेहमीच शहाणे धोरण, असे नाही. राजकीय कोंडीमुळे निर्णय रखडू शकतात आणि अमेरिकन आश्वासनांच्या विश्वासार्हतेवरही प्रश्न येऊ शकतात. चीनशी स्पर्धेचे अमेरिकन हित मात्र एका निवडणुकीने बदलणार नाही. हिंदप्रशांत क्षेत्रातील सहकार्य, संरक्षण तंत्रज्ञान आणि पुरवठा साखळ्यांमध्ये भारताचे महत्त्व टिकविण्यासाठी त्यामुळे वाव राहील. त्याचा उपयोग करताना स्वतःचे निर्णयस्वातंत्र्य जपावे लागेल. अमेरिका आणि चीन यांच्यातील प्रत्येक संघर्षात भारताने आपोआप बाजू घ्यावी, ही अपेक्षा स्वीकारता येणार नाही. रशियाशी संबंध आणि इराणशी संवाद आपल्या गरजांनुसार ठरवावा लागेल. अमेरिकेतील एका पक्षाच्या विजयात भारताच्या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधणे म्हणजे परराष्ट्र धोरणाला पक्षीय चाहत्यांच्या उत्साहाची जोड देणे होय. देशाचे हित इतक्या सुलभ पद्धतीने ठरत नसते.

म्हणून भारताने व्हाइट हाउसपुरता संवाद मर्यादित न ठेवता दोन्ही पक्षांचे खासदार, राज्य सरकारे, उद्योग, विद्यापीठे आणि भारतीय वंशाच्या प्रतिनिधींशी संबंध वाढविले पाहिजेत. भारतीय वंशाचा लोकप्रतिनिधी म्हणजे भारताचा प्रतिनिधी नव्हे; त्याचे उत्तरदायित्व अमेरिकन मतदारांशी असते. वैयक्तिक मैत्रीच्या छायाचित्रापेक्षा संस्थात्मक संबंधांची रुंदी अधिक उपयोगाची ठरते. या निकालाचा भारतासाठी आणखी एक अर्थ आहे. देश महान असल्याचा अभिमान आणि सरकारला हिशेब विचारण्याचा अधिकार एकत्र नांदू शकतात. महागाईबद्दल बोलणारा नागरिक देशाची प्रतिष्ठा कमी करीत नसतो; तो त्या प्रतिष्ठेला स्वतःच्या जगण्याशी जोडत असतो. सत्ताधाऱ्याला आवर घालणारी संसद देशाला दुबळे कशी करील? उलट, चुकीच्या निर्णयांची किंमत वाढवून ती नागरिकाचे संरक्षण करते. अमेरिकन मतदारांनी आपल्या सरकारला आरसा दाखविला. आपण त्या आरशातील ट्रम्प यांचा चेहरा पाहूनच समाधानी होणार, की नागरिकाच्या प्रश्नाला सत्तेपेक्षा मोठे मानण्याची तयारी दाखविणार? महासत्तेच्या निकालातून भारताला मिळणारी सर्वांत मोठी संधी कदाचित आपल्या लोकशाहीकडे नव्याने पाहण्याचीही आहे. त्या संधीचा उपयोग करण्यासाठी कोणाच्याही परवानगीची आवश्यकता नाही.

(साभार म.टा.संवाद)

-पराग करंदीकर

शेतामधील अपघात होतील कमी

शेतकऱ्याचा मृत्यू हा केवळ एका व्यक्तीचा मृत्यू नसतो. तो एका कुटुंबाच्या उत्पन्नाचा आधार नष्ट करतो. त्यामुळे कृषी धोरणात 'उत्पादन किती वाढले?' या प्रश्नाबरोबर 'शेती करताना किती जीव सुरक्षित राहिले?' हा प्रश्नही विचारला पाहिजे.

भारतातील शेती ही केवळ उपजीविकेचे साधन नाही, तर कोट्यवधी कुटुंबाच्या जीवनाचा आधार आहे. मात्र शेतात काम करणाऱ्या शेतकरी, शेतमजूर आणि त्यांच्या कुटुंबीयांसमोर पिकांचे नुकसान, बाजारभाव, कर्जबाजारीपणा आणि हवामानातील बदल यांच्याबरोबरच आणखी एक गंभीर संकट उभे आहे ते म्हणजे शेतीतील अपघात. ट्रॅक्टर आणि इतर यंत्रांमधील अपघात, विहिरीत किंवा पाण्यात बुडणे, विजेचा धक्का, सर्पदंश, विजेचा कडकडाट, कीटकनाशकांची विषबाधा, जनावरांचे हल्ले, झाडावरून किंवा उंचावरून पडणे, रस्ते व रेल्वे अपघात अशा अनेक कारणांमुळे दरवर्षी हजारो कुटुंबांवर अचानक दुःखाचा डोंगर कोसळतो. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी ब्युरोच्या आकडेवारीनुसार, २०२४ मध्ये देशात एकूण ४ लाख ६७ हजार ८५७ अपघाती मृत्यू नोंदवले गेले, त्यामध्ये १५ हजार ८६१ मृत्यू विजेच्या धक्क्यामुळे, ९ हजार ८०३ सर्पदंशामुळे, २६ हजार ४३७ पडल्यामुळे आणि सात हजार ९०३ नैसर्गिक शक्तीमुळे झाल्याची नोंद आहे. नैसर्गिक शक्तींमधील विजेच्या कडकडाटामुळे २ हजार ८२५ आणि उष्माघात व सूर्याघातामुळे १ हजार ८३२ मृत्यू झाले. याशिवाय कारखाना व यंत्रसामग्रीशी संबंधित अपघातांत ६६० मृत्यू नोंदवले गेले. ही सर्व संख्या केवळ शेतकऱ्यांची नाही, हे स्पष्टपणे लक्षात घेतले पाहिजे.

सर्पदंश हा ग्रामीण आणि विशेषतः शेतीप्रधान भागातील अत्यंत गंभीर धोका आहे. भारत सरकारच्या कृती कार्यक्रमानुसार भारतात दरवर्षी सुमारे ३ ते ४ दशलक्ष सर्पदंश होतात आणि उपलब्ध संशोधनानुसार सुमारे ५८ हजार मृत्यू होऊ शकतात. त्यामुळे शेतात, बांधावर, गवताच्या गंजीत, विहिरीजवळ किंवा पिकांमध्ये काम करणाऱ्या व्यक्तीसाठी सर्पदंश हा केवळ वन्यजीवांचा प्रश्न नसून कृषी सुरक्षेचा प्रश्न आहे. वीज अपघात ही महाराष्ट्रासमोरील आणखी एक मोठी समस्या आहे. महाराष्ट्राच्या मुख्य विद्युत निरीक्षक कार्यालयाच्या आकडेवारीनुसार २०१९-२० ते २०२३-२४ या पाच वर्षांत राज्यात ६,७१७ व्यक्तींचा विद्युत अपघातात मृत्यू झाला, तर २,९६५ व्यक्ती जखमी किंवा कायमस्वरूपी अपंग झाल्या. २०२३-२४ मध्येच १,३८४ मानवी मृत्यू विद्युत अपघातांमुळे झाले. या संख्येत शेतकऱ्यांचे स्वतंत्र वर्गीकरण नसले तरी ग्रामीण भागातील शेतीपंप, लोंबकळणाऱ्या विद्युत तारा, अनधिकृत जोडण्या, खराब वायरिंग, ट्रान्सफॉर्मर आणि पावसाळ्यातील ओलसर परिस्थिती यामुळे शेतकरी मोठ्या जोखमीला सामोरे जातात.

शेतीतील दुर्घटना

शेती यांत्रिकीकरणामुळे उत्पादनक्षमता आणि मजुरीची समस्या कमी करण्यास मदत झाली असली, तरी त्याचबरोबर नव्या प्रकारच्या जोखमी निर्माण झाल्या आहेत. ट्रॅक्टर उलटणे, ट्रॅक्टरखाली अडकणे, रोटाव्हेटरमध्ये कपडे किंवा शरीराचा भाग अडकणे, थ्रेशरमध्ये हात अडकणे, कापणी यंत्रातील फिरते भाग, हार्वेस्टर, पंपसेट आणि इतर यंत्रांच्या दुरुस्तीवेळी होणारे अपघात गंभीर स्वरूपाचे असतात. त्याचबरोबर सर्व आधुनिक मशीनरीमध्ये अपघात होणार नाही यासाठी योग्य ते बदल केले जात आहेत. शेतातील विहिरी, तलाव, कालवे आणि पाण्याच्या साठ्यांमुळे बुडण्याचे अपघातही गंभीर आहेत. महाराष्ट्रात २०२४ मध्ये ५ हजार १५१ बुडण्यामुळे मृत्यू नोंदले गेले. विहिरींना संरक्षक कठडे नसणे, पाण्यात उतरण्यासाठी सुरक्षित व्यवस्था नसणे, रात्रीच्या वेळी प्रकाश नसणे आणि मोटार सुरू किंवा बंद करताना घडणाऱ्या दुर्घटना याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. ऑटोमॅटिक स्टार्टर व आधुनिक साधनांमुळे यामधील जोखीम कमी होत आहे. कीटकनाशकांची विषबाधा हो शेतीतील आणखी एक दुर्घटना आहे. फवारणी करताना मास्क, हातमोजे, संरक्षणात्मक कपडे आणि डोळ्यांचे संरक्षण न वापरणे, वाऱ्याच्या दिशेचा विचार न करणे, रसायनांची चुकीची मात्रा वापरणे किंवा फवारणीनंतर लगेच पिकात प्रवेश करणे यामुळे विषबाधा होऊ शकते.

शिक्षणाचे प्रमाण वाढल्यामुळे शेतकऱ्यांची नवी पिढी अपघाताबाबत अधिक दक्षता घेताना आपल्याला दिसत आहे.

आर्थिक मदत ही अपघातानंतरची उपाययोजना आहे; खरी गरज अपघात टाळण्याची आहे. प्रत्येक गावात 'कृषी सुरक्षा' ही स्वतंत्र ग्रामस्तरीय संकल्पना विकसित झाली पाहिजे. शेतकऱ्यांना ट्रॅक्टर चालविण्याचे प्रशिक्षण, यंत्रांच्या सुरक्षित वापराचे प्रात्यक्षिक, विद्युत सुरक्षेचे प्रशिक्षण, सर्पदंशावरील प्रथमोपचार आणि त्वरित रुग्णालयीन उपचार, कीटकनाशक वापरातील सुरक्षितता आणि विजेच्या कडकडाटाच्या वेळी घ्यावयाची काळजी याबाबत नियमित प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

शेतीतील प्रत्येक मृत्यूची स्वतंत्र कारणमीमांसा होणेही आवश्यक आहे. सध्या अपघाती मृत्यूची राष्ट्रीय आकडेवारी उपलब्ध असली तरी 'शेतीशी संबंधित अपघात' हा स्वतंत्र आणि सर्वसमावेशक सांख्यिकीय वर्ग पुरेशा तपशिलात उपलब्ध नाही. शेतकरी आत्महत्यांप्रमाणेच अपघाती मृत्यूंचाही ग्रामीण कुटुंबांवर मोठा आर्थिक आणि सामाजिक परिणाम होतो. २०२४ मध्ये भारतातील शेती क्षेत्राशी संबंधित आत्महत्यांची संख्या १० हजार ५४६ होती. भविष्यात 'शेतीमधील सुरक्षितता' ही कृषी विकासाची स्वतंत्र शाखा बनली पाहिजे. कृषी धोरणात 'उत्पादन किती वाढले?' या प्रश्नाबरोबर 'शेती करताना किती जीव सुरक्षित राहिले?' हा प्रश्नही विचारला पाहिजे.

शेखर गायकवाड

|मंगळवार १७ नोव्हेंबर २०२६|
E-mail :-ytljanmadhyam@gmail.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवब

सहा पांदण रस्त्यांचे भूमिपूजन शेतकऱ्यांचा रस्त्यांचा प्रश्न मार्गी लागणार?

बाभुळगाव तालुक्यातील वर्षानुवर्षांच्या मागणीला चालना सहा मार्गांच्या कामांचा शुभारंभ

जनमाध्यम । प्रतिनिधी



बाभुळगाव : शेतापर्यंत पोहोचण्यासाठी रस्ताच नसेल, तर शेतीचा विकास कसा होणार? या प्रश्नाला उत्तर देण्याच्या दृष्टीने बाभुळगाव तालुक्यातील सहा पांदण रस्त्यांच्या कामांचे भूमिपूजन करण्यात आले. मात्र, भूमिपूजनापुरतेच हे काम मर्यादित न राहता प्रत्यक्ष दर्जेदार आणि बारमाही रस्ते तयार होणे, हीच शेतकऱ्यांची अपेक्षा आहे.

भाजपचे जिल्हाध्यक्ष तथा राळेगाव विधानसभा पांदण रस्ता शासकीय समितीचे सहअध्यक्ष ॲड. प्रफुल्ल चव्हाण आणि समितीचे सहअध्यक्ष सतीश मानलवार यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. यामध्ये राणी अमरावती-पानस, गळव्हा-भिसनी, सावर-गळव्हा, अंतरगाव-राणी अमरावती, नांदुरा बुद्रुक-खडक सावंगा आणि माहुली गावठाण-डेहनी या सहा पांदण रस्त्यांचा समावेश आहे. या रस्त्यांची दुरवस्था असल्याने पावसाळ्यात शेतात जाणे, ट्रॅक्टर व शेतीची अवजारे नेणे तसेच शेतमाल बाजारपेठेत पोहोचविणे शेतकऱ्यांसाठी जिकिरीचे ठरत होते. त्यामुळे या कामांमुळे ग्रामीण दळणवळणाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. यावेळी उपविभागीय अधिकारी गोपाल देशपांडे, निवासी तहसीलदार बदकी, जिल्हा परिषद उपअभियंता निश्चल, अभियंते, भाजपा तालुकाध्यक्ष नितीन परडखे यांच्यासह पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

अतिक्रमणमुक्त पांदण रस्त्यांचा संकल्प

तालुक्यातील सर्व पांदण रस्ते अतिक्रमणमुक्त करून शेतकऱ्यांसाठी खुले करण्याचा संकल्प असल्याचे सतीश मानलवार यांनी सांगितले. आता भूमिपूजनानंतर कामे वेळेत पूर्ण होऊन शेतकऱ्यांना प्रत्यक्ष दिलासा मिळतो का, याकडे लक्ष लागले आहे.

कापूस खरेदीचा शुभारंभ पहिल्याच दिवशी ९,२८० रुपयांचा भाव!

शेतक-यांच्या कापसाची 250 हून अधिक वाहनांतून आवक, 4 ते 5 हजार क्विंटल खरेदी

जनमाध्यम । प्रतिनिधी



घाटंजी : कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी यंदाच्या हंगामाची सुरुवात दिलासादायक ठरली आहे. घाटंजी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या स्व. सुरेशबाबू लोणकर कापूस यार्डात सोमवार, १६ नोव्हेंबर रोजी जाहीर लिलावाद्वारे खाजगी कापूस खरेदीचा शुभारंभ झाला. पहिल्याच दिवशी कापसाला प्रतिक्विंटल ९,२८० रुपयांचा उच्चांकी भाव मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले.

बाजार समितीचे उपसभापती सचिन पारवेकर यांच्या हस्ते लिलाव प्रक्रियेला प्रारंभ करण्यात आला. यावेळी शेतकरी अजाबराव मार्खंड यांच्या बैलबंडीचे पूजन करून मुहूर्ताचा कापूस ९,१११ रुपये प्रतिक्विंटल दराने खरेदी करण्यात आला. प्रथम कापूस विक्रीसाठी आणणाऱ्या पाच शेतकऱ्यांचा शेला व नारळ देऊन सन्मान करण्यात आला. मुहूर्ताच्या दिवशी २५० हून अधिक वाहनांतून कापसाची आवक झाली. दिवसभरात अंदाजे ४ ते ५ हजार क्विंटल कापसाची खरेदी करण्यात आली. जाहीर लिलावामुळे व्यापाऱ्यांमध्ये स्पर्धा निर्माण होऊन शेतकऱ्यांना चांगला दर मिळण्याची आशा पल्लवित झाली आहे. दरम्यान, शेतकऱ्यांनी खेडा खरेदीला कापूस न विकता बाजार समितीच्या आवारात आणावा, असे आवाहन सचिव कपिल चन्नावार यांनी केले. मात्र, पहिल्या दिवसाचा उच्चांकी भाव टिकून राहतो का आणि पुढील काळातही शेतकऱ्यांना योग्य दर मिळतो का, याकडे आता कापूस उत्पादकांचे लक्ष लागले आहे.

बीएएमएस करिता अंजली अंभोरे ची निवड..!

जनमाध्यम । प्रतिनिधी



आर्थिक परिस्थितीवर मात करत वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश!

पुसद : येथील भीमशक्ती सामाजिक संघटनेचे अध्यक्ष संतोष अंभोरे यांची कन्या अंजली संतोष अंभोरे हिची बीएएमएस या वैद्यकीय पदवीच्या शिक्षणाकरिता नंदुरबार येथे निवड झाल्याने सर्वत्र आनंद उत्सवाचे वातावरण निर्माण झाले आहे. अंभोरे परिवार यांचे नेहमी सामाजिक चळवळीमध्ये निस्वार्थपणे योगदान असते भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या माध्यमातून हा परिवार गोरगरिबांच्या न्याय हक्कासाठी निस्वार्थ भावनेने पुढाकार घेत असतो तीच परंपरा जपत अंजली अंभोरे या विद्यार्थिनी आर्थिक परिस्थितीवर मात करत जिद्द व चिकाटीच्या जोरावर वैद्यकीय क्षेत्रात नाविन्यपूर्ण यश संपादन करून आंबेडकरी समाज तसेच सर्वसामान्य मध्ये एक आदर्श निर्माण केला आहे दिनांक १३ नोव्हेंबर २०२६ रोजी झालेल्या बीएएमएस या वैद्यकीय शिक्षणासाठी तिची निवड नंदुरबार येथील वैद्यकीय महाविद्यालयात वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी झाली आहे ती आपल्या निवडीचे श्रेय आपल्या गुरुजनांना आई-वडिलांना आजी व मामा यांना देते. अंजली अंभोरे ही सर्वसामान्य परिवारातून असून तिची आर्थिक परिस्थिती कमकुवत असतांना त्यावर मात करून तिने वैद्यकीय क्षेत्रात नवक्रांती घडवत आदर्श निर्माण केल्याने तिचे सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

- वेचक-



बिरसा मुंडा यांना पालकमंत्री यांचे अभिवादना सह जयंती साजरी!

जनमाध्यम । प्रतिनिधी

यवतमाळ : आदिवासी अस्मितेचे प्रतीक आणि ब्रिटिश सत्तेविरुद्ध संघर्षाचा इतिहास घडविणारे क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी यवतमाळात त्यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. आर्णी मार्गावरील भगवान बिरसा मुंडा यांच्या पुतळ्याजवळ आयोजित अभिवादन कार्यक्रमात नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके, निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, उपविभागीय अधिकारी गोपाळ देशपांडे, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शुभम क्यातमवार यांच्यासह विविध पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते. यावेळी पारंपरिक ढोल-ताशा पथकाने सादरीकरणातून बिरसा मुंडा यांना आदरांजली वाहिली. पालकमंत्री संजय राठोड यांनीही ढोल पथकात सहभागी होत पारंपरिक वाद्यांच्या तालावर जयंती उत्सवात सहभाग नोंदविला. बिरसा मुंडा यांच्या संघर्षाचा इतिहास, आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी दिलेला लढा आणि स्वाभिमानाचा विचार या जयंतीनिमित्त पुन्हा अधोरेखित झाला.

आर्णीत मोकाट कुत्र्यांची दहशत; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

जनमाध्यम । प्रतिनिधी

आर्णी : संपूर्ण आर्णी शहरात व विशेष करून मुबारक नगर परिसरात मोकाट कुत्र्यांनी अक्षरशः दहशत माजवली असून काल रात्री पर्यंत मुबारक नगर, हाफिज बेग नगर, पोलिस स्टेशन चौक परिसरात अनेक नागरिकांना चावा घेतल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या गंभीर प्रकाराबाबत मुबारक नगर मधील सुशिक्षित व सुजान नवयुवक परवेज बैलीम यांनी मुख्याधिकाऱ्यांची भेट घेऊन घटनेचे गांभीर्य लक्षात आणून दिले आहे. मोकाट कुत्र्यांच्या या गंभीर घटनामुळे संपूर्ण आर्णी त भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अद्याप ही नगरपरिषद कारवाई करण्यास तयार नसल्याने नागरिकांनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. मुबारक नगर, आदर्श नगर, हाफिज बेग नगर भागात आधीपासूनच भटक्या कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणात वावर असून, आता पिसाळलेल्या कुत्र्यामुळे परिस्थिती आणखी गंभीर झाली आहे. नगर परिषद प्रशासनाने हात वर केल्याने नागरिकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे. दरम्यान, नागरिकांना कुत्र्याने चावा घेतला, मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने नागरिक हतबल झाले आहेत. शहरातील चौका चौकात कुत्र्यांची टोळकी रस्त्यावरच बसून वाहने पाहताच त्यांच्या अंगावर धावून जात असल्याने अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. अनेक वाहनचालक जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. जामा मजीद चौक, शिवाजीनगर,मुबारक नगर, आदर्श नगर यासह शहरातील विविध भागात मोठ्या प्रमाणात कुत्र्यांचा त्रास वाढला असून याविरोधात लवकरच तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

टिपेश्वरच्या पर्यटन प्रकल्पांना अभय कुणाचे? वन विभागाच्या अहवालानंतरही कारवाई थंडबस्त्यात!

जनमाध्यम । प्रतिनिधी



१० कॉटेजच्या परवानगीवर प्रत्यक्ष १५ कॉटेज,पक्की बांधकामेही उघड,उच्च न्यायालयात शासनाचे प्रतिज्ञापत्र

पांढरकवडा : टिपेश्वर वन्यजीव अभयारण्याच्या इको-सेन्सिटिव्ह झोनमध्ये पर्यटन विकासाच्या नावाखाली नियमांचे उल्लंघन होत असल्याचे वन विभागाच्याच तपासणी अहवालातून समोर आले आहे. तब्बल १७ रिसॉर्ट आणि कृषी पर्यटन आस्थापनांची तपासणी केली असता बहुतांश ठिकाणी जिल्हास्तरीय देखरेख समितीची पूर्वपरवानगी न घेताच बांधकामे करून व्यवसाय सुरू केल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे. एका प्रकल्पाला १० कॉटेजची मंजुरी असताना प्रत्यक्ष १५ कॉटेज आढळले, तर काही ठिकाणी पक्की बांधकामेही करण्यात आली आहेत. मात्र, या गंभीर प्रकारानंतरही चार महिने उलटून शासनाच्या प्रतिज्ञापत्रात प्रत्यक्ष कारवाईचा तपशील नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

यवतमाळ जिल्हा ट्रायबल फोरमचे जिल्हा उपाध्यक्ष अंकित नैताम यांनी दाखल केलेल्या जनहित याचिका क्र. ३९५३/२०२६ मुळे हे प्रकरण मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात पोहोचले आहे. मे २०२६ मध्ये न्यायालयाने राज्य शासनासह संबंधित यंत्रणांना नोटीस बजावली होती.

सहायक वनसंरक्षक (वन्यजीव) यांनी १५ जून २०२६ रोजी १७ आस्थापनांची स्थळपाहणी करून नियमभंगाची निरीक्षणे नोंदविली. त्यानंतर १६ जूनला विभागीय वन अधिकाऱ्यांनी पुढील कायदेशीर कार्यवाहीची शिफारस केली. मात्र, किती प्रकल्प सील केले, कोणावर दंडात्मक कारवाई झाली किंवा अनधिकृत बांधकामे हटविण्यात आली, याची माहिती ९ ऑक्टोबरच्या शासनाच्या प्रतिज्ञापत्रात स्पष्ट करण्यात आलेली नाही. विशेष म्हणजे, १८ सप्टेंबर २०१८ रोजी इको-सेन्सिटिव्ह झोनची अंतिम अधिसूचना जारी होऊनही झोनल मास्टर प्लॅन अद्याप अंतिम झालेला नाही. शासनाने एन.ए. परवानगी म्हणजे पर्यावरणीय क्षेत्रातील आवश्यक परवानगी नव्हे, अशी भूमिका स्पष्ट केली आहे. मात्र, प्रत्यक्ष कारवाईची प्रक्रिया अद्याप सुरू असल्याचे म्हटले आहे.

मग प्रत्यक्ष कारवाईला विलंब का?

वन विभागाला नियमभंग दिसतो, कारवाईची शिफारसही होते. मग प्रत्यक्ष कारवाईला विलंब का? टिपेश्वरच्या पर्यावरण संरक्षणापेक्षा पर्यटन व्यावसायिकांचे हित महत्त्वाचे ठरत आहे का, असा सवाल आता उपस्थित होत आहे. या प्रकरणात न्यायालय प्रशासनाकडून कारवाईचा ठोस हिशेब मागणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

योगेश निखार यांची पीएच.डी.ला गवसणी!



जनमाध्यम । प्रतिनिधी

यवतमाळ : जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या बळावर गरिबीच्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करत हिवरा दरणे येथील योगेश ज्योती किसना निखार यांनी भूगोल विषयात पीएच. डी. पदवी संपादन करून गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. गावातून पीएच.डी. पदवी प्राप्त करणारे ते पहिलेच व्यक्ती ठरले असून त्यांच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांनी २८ ऑक्टोबर २०२६ रोजी अधिकृत अधिसूचना निर्गमित करून त्यांना पीएच.डी. पदवी प्रदान केली. 'यवतमाळ जिल्ह्याच्या अनुसूचित जमातीच्या आर्थिक व सांस्कृतिक प्रारूपावर आधुनिकीकरणाचा प्रभाव : भौगोलिक विश्लेषण' या विषयावर त्यांनी संशोधन पूर्ण केले. कला व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हा (ता. तिवसा, जि. अमरावती) या संशोधन केंद्रातून डॉ. विजय ब. खराते यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी हे संशोधन केले. अत्यंत सामान्य व आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातून आलेल्या निखार यांनी शिक्षणाचा खर्च भागविण्यासाठी कधी हॉटेलमध्ये वेटर, तर कधी मॉलमध्ये सुरक्षा रक्षक म्हणून काम केले. मात्र, परिस्थितीपुढे हार न मानता त्यांनी उच्च शिक्षणाची वाटचाल सुरू ठेवली. सध्या ते दाते महाविद्यालय, यवतमाळ येथे इयत्ता अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना केंब्राटी तत्त्वावर अध्यापन करीत आहेत. अभ्यासू स्वभाव आणि संशोधक वृत्ती असलेल्या निखार यांचे भूगोल विषयावरील पुस्तकही लवकरच प्रकाशित होणार आहे. आपल्या या यशाचे श्रेय त्यांनी आई-वडील, बहीण आणि संशोधन मार्गदर्शक डॉ.विजय खराते यांना दिले आहे.

साखरा (खु.) येथे भगवान बिरसा मुंडा जयंती उत्साहात साजरी

जनमाध्यम । प्रतिनिधी



घाटंजी : आदिवासी समाजाचे महानायक, क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांची १५१ वी जयंती घाटंजी तालुक्यातील साखरा (खु.) येथे भगवान बिरसामुंडा चौक येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी आदिवासी समाजबांधवांनी पारंपरिक लोककलेचा जागर करीत आपल्या संस्कृतीचे दर्शन घडविले. पारंपरिक वेशभूषा परिधान करून समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. फटाक्यांची आतिषबाजी, घोषणाबाजी आणि उत्साहपूर्ण वातावरणात भगवान बिरसा मुंडा यांना अभिवादन करण्यात आले.या कार्यक्रमात समाजाचे महाजन गोविंदा मडावी, घट्या दादाराव कुळसंगे, सामाजिक कार्यकर्ते अरविंद जाधव व दिनेश पवार यांच्यासह महिंद्रा आडे, संतोष कुमरे , सुरज कुळसंगे, रवी मेश्राम, संदीप आडे, नागोराव कोवे, भाऊराव मडावी, श्रीकांत वेट्टी , राजू दडांजे , विष्णू दडांजे चेतन मरापे, विजु दडांजे , चंदन मरापे, महेश कुळसंगे, प्रेम कुळसंगे, मारोती मेश्राम, कुशाल कुळसंगे, यश कुळसंगे,श्यामा मेश्राम, विनोद मरापे, माधव कुळसंगे, सुनील कुरपते,, नागोराव कुळसंगे, सुमित कुळसंगे, अतुल दडांजे , अमोल दडांजे , अंकुश कुळसंगे, देवराव कुळसंगे, रामराव दडांजे , सुरज दडांजे , बाबू वेट्टी , काशीराम मरापे, शंकर पेंदोर यांच्यासह शेकडो समाज बांधव उपस्थित होते महिलांची उपस्थिती ही लक्षनीय होती .भगवान बिरसा मुंडा यांच्या विचारांचे स्मरण करीत आदिवासी समाजाची एकजूट आणि सांस्कृतिक परंपरा जपण्याचा संदेश या जयंती सोहळ्यातून देण्यात आला.

ऊसाला ४२०० रुपये भाव द्या, अन्यथा कारखान्यांचे गेट बंद!

२७ नोव्हेंबरपासून ऊसतोड आणि गाळप रोखण्याचा ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समितीचा इशारा

जनमाध्यम । प्रतिनिधी



महागाव : ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणींकडे साखर कारखानदारांचे लक्ष वेधण्यासाठी ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समितीने आक्रमक पवित्रा घेतला आहे. सन २०२६-२७ च्या गळीत हंगामासाठी प्रतिटन किमान ४२०० रुपये ऊसदर द्यावा, अन्यथा २७ नोव्हेंबरपासून साखर कारखान्यांचे गेट बंद करून ऊसतोड आणि गाळप रोखण्यात येईल, असा स्पष्ट इशारा समितीने दिला आहे.

यंदा दुष्काळी परिस्थितीमुळे ऊस उत्पादनात मोठी घट झाली असून एकरी उत्पादन २० ते २५ टनांवर आले आहे. दुसरीकडे खत, मजुरी, सिंचन आणि मशागतीचा खर्च वाढल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. साखरेचे बाजारभाव प्रतिकिलो ५५ ते ६० रुपयांपर्यंत पोहोचले असताना त्याचा लाभ ऊस उत्पादकांना का मिळत नाही, असा सवाल समितीने उपस्थित केला आहे.साखर उत्पादनासोबतच मळी, बगॅस, प्रेसमड, इथेनॉल आणि वीज निर्मितीतून कारखान्यांना उत्पन्न मिळत असताना शेतकऱ्यांच्या पदरी मात्र निराशाच पडत असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे.समितीच्या प्रमुख मागण्यांमध्ये प्रतिटन ४२०० रुपये ऊसदर, जळीत उसाच्या वजनातील कपात बंद करणे, कारखान्यांकडून भावातून कोणतीही कपात न करणे आणि मशीनद्वारे तोडलेल्या उसावरील वजनकपात थांबविणे यांचा समावेश आहे. आंदोलनामुळे काम बंद राहिल्यास ऊसतोड कामगारांची मजुरी आणि वाहतूकदारांचे वाहनभाडे देण्याची मागणीही करण्यात आली आहे. उमरखेड, हदगाव, महागाव व पुसद तालुक्यांतील शेतकऱ्यांच्या वतीने संघर्ष समितीने सहकारी साखर कारखानदारांसह साखर आयुक्तालय आणि संबंधित उपसाखर संचालकांकडे निवेदन सादर केले आहे. मागण्यांवर तातडीने तोडगा न निघाल्यास २७ नोव्हेंबरपासून कारखान्यांसमोर शांततापूर्ण आंदोलन छेडले जाईल. शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास आंदोलनाची जबाबदारी कारखाना व्यवस्थापनावर राहील, असा इशाराही देण्यात आला आहे.

हिंदू स्मशान भूमीतील अतिक्रमण काढून त्वरित सुशोभिकरण करा;दीपक परीहार यांचे निवेदनाद्वारे मागणी.!

जनमाध्यम । प्रतिनिधी



पुसद : शहराच्या मध्यभागी असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौक मधील महाजन पेट्रोल पंप च्या मागील बाजूस हिंदू स्मशानभूमी असून या परिसरात गेल्या काही वर्षांपासून अनेकांनी अतिक्रमण करून जागा बळकवली आहे. या समशानभूमीच्या परिसरात मास विक्रेते, हॉटेल्स वाले, फळ विक्रेते व इत्यादी केर, कचरा व घाण आणून टाकत आहेत. यामुळे परिसरात दुर्गंधी पसरून नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. या संदर्भात पुसद नगरपालिकेच्या प्रशासनाला निवेदने दिली त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. या हिंदू समशानभूमीची दुरावस्था झाली असून ती त्वरित दुरुस्त करण्यात यावी. परिसराचा योग्य ते विकास करून सुशोभिकरण करण्यात यावे या आशयाची मागणी दीपक सिंह परिहार जिल्हा सरचिटणीस भाजप व परिसरातील नागरिकांनी मुख्याधिकारी नगरपरिषद पुसद यांना दि.१२ नोव्हेंबर रोजी निवेदन देऊन करण्यात आली आहे. निवेदनाच्या प्रती मोहिनी इंद्रनील नाईक नगराध्यक्षा पुसद, जिल्हाधिकारी, तहसीलदार, विभागीय अधिकारी, उपसंचालक नगर रचना विभाग यवतमाळ यांना देण्यात आले आहे. निवेदनावर दीपक सिंह परिहार यांच्यासह अनेक नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

वकिली व्यवसायात प्रामाणिकपणा, अभ्यास व नैतिक मूल्येच यशाची गुरुकिल्ली : माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड

जनमाध्यम । प्रतिनिधी



यवतमाळ : वकिली व्यवसायात यश मिळविण्यासाठी शॉर्टकटचा मार्ग स्वीकारण्यापेक्षा प्रामाणिकपणा, अभ्यास आणि नैतिक मूल्यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचे युग असले तरी वाचन, मेहनत आणि सत्याची कास हीच न्यायक्षेत्रातील यशाची खरी गुरुकिल्ली आहे, असा स्पष्ट संदेश भारताचे माजी सरन्यायाधीश डॉ. धनंजय चंद्रचूड यांनी दिला.

यवतमाळ येथील स्वतंत्रता सेनानी जवाहरलाल दर्डा कॉलेज ऑफ लॉ येथे आयोजित 'कायदा आणि न्यायशास्त्र' विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी त्यांनी न्यायालयीन प्रक्रियेतील विलंब, बनावट कागदपत्रांचा वापर आणि वकिलांच्या नैतिक जबाबदारीवर परखड भाष्य केले. खटले लांबण्यास न्यायव्यवस्थेला दोष देण्यापूर्वी तारखा मागणाऱ्या वकिलांनी आत्मपरीक्षण करावे, असे त्यांनी सुनावले. कसाब खटल्याचा दाखला देत प्रत्येक आरोपीला कायदेशीर बाजू मांडण्याची संधी मिळणे हेच न्यायव्यवस्थेचे सामर्थ्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कौटुंबिक वादांमध्ये मध्यस्थीला प्राधान्य देण्याचे आवाहनही केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. विजय दर्डा यांनी न्यायव्यवस्थेतील अपुऱ्या पायाभूत सुविधा, प्रलंबित खटले आणि गरीब कैद्यांच्या जामिनाचा प्रश्न उपस्थित केला. न्यायालयीन कामकाज अधिक पारदर्शक व सुलभ करण्यासाठी मूलभूत सुधारणा, ई-फायलिंग आणि पर्यायी विवाद निवारण प्रणालीला गती देण्याची मागणी केली. सर्वोच्च न्यायालयाचे खंडपीठ नागपूर येथे स्थापन करण्याचाही आग्रह त्यांनी धरला. यावेळी जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद यावलकर यांच्यासह विधी क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

सातेगाव येथील शेतकरी आत्महत्या प्रकरणाला नवे वळण


पत्नीने आठ महिन्यांपूर्वी दिलेले तक्रार पत्र समोर

अंजनगाव सुर्जी/वार्ताहर

सातेगाव येथील शेतकरी अमोल मुरलीधर काळे (वय ३८) यांच्या मृत्यू प्रकरणाला आता अत्यंत गंभीर वळण मिळाले आहे. अमोल यांच्या पत्नीने आठ महिन्यांपूर्वीच संबंधित फायनान्स कंपनीला दिलेले लेखी तक्रार पत्र समोर आल्यानंतर सातेगावसह संपूर्ण अंजनगाव सुर्जी तालुक्यात संतापाची तीव्र लाट उसळली आहे.

कुटुंबीयांनी वेळीच लेखी इशारा देऊनही कंपनीने त्याची कोणतीही दखल घेतली नाही, त्यामुळेच अमोल यांच्यावर टोकाचे पाऊल उचलण्याची वेळ आली, असा थेट आरोप कुटुंबीय आणि ग्रामस्थांनी केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर तात्काळ गुन्हा दाखल करावा, अशी ठाम मागणी आता ग्रामसभेतून आणि शोकसभेतून करण्यात येत आहे.





कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीनुसार १६ मार्च २०२६ रोजी अमोल काळे यांच्या पत्नी आरती काळे यांनी 'स्पंदना फायनान्स लि., शाखा अंजनगाव सुर्जी' यांना एक लेखी निवेदन दिले होते.

या पत्रात त्यांनी स्पष्ट केले होते की, 'आम्ही घेतलेले कर्ज व्याजासह पूर्णपणे परत फेडले आहे. तरीही आमच्या कर्ज खात्यात मोठा गोंधळ असल्याचा संशय आहे. याबाबत सखोल चौकशी करून हिशोब स्पष्ट करावा. जर आमच्यावर विनाकारण डिफॉल्टचा ठपका लावला गेला किंवा आमचे काही बरे-वाईट झाले, तर त्याला सर्वस्वी कंपनी जबाबदार राहील.'

हे पत्र आता समोर आल्यामुळे अमोल काळे हे फायनान्स कंपनीच्या जाचालाच बळी पडले आहेत, यावर शिक्कामोर्तब झाल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. इतका गंभीर इशारा देऊनही कंपनीच्या अधिकाऱ्यांनी त्याकडे जाणीवपूर्वक. दुर्लक्ष केले, याबद्दल गावात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

सातेगाव येथे नुकत्याच पार पडलेल्या शोकसभेत ग्रामस्थांनी आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या. शासनाने दुष्काळ जाहीर केला असतानाही फायनान्स कंपन्यांचे कर्मचारी शेतकऱ्यांच्या घरी येऊन हप्त्यांसाठी सतत तगादा लावत होते, असा आरोप यावेळी करण्यात आला. शेतीतून कोणतेही उत्पन्न नाही, त्यात दुष्काळाची भीषण परिस्थिती आणि वरून वसुलीचा मानसिक दबाव, अशा तिहेरी संकटात अमोल काळे सापडले होते. एका कर्जाचे हप्ते भरण्यासाठी दुसरे कर्ज काढावे लागत असल्याने ते दिवसेंदिवस कर्जाच्या विळख्यात अडकत गेले, अशी माहिती कुटुंबीयांनी दिली आहे.

अकरा दिवसांची मृत्यूशी झुंज ठरली अपयशी

कर्ज वसुलीच्या तगाद्याला कंटाळून अमोल काळे यांनी २ नोव्हेंबर रोजी टोकाचे पाऊल उचलले होते. प्रकृती चिंताजनक झाल्याने त्यांना प्रथम अंजनगाव सुर्जी आणि त्यानंतर अचलपूर मार्गे अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

मात्र, तेथे उपचार सुरू असताना १३ नोव्हेंबर रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी आरती आणि दोन लहान मुले असा परिवार आहे.

पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

या गंभीर घटनेनंतरही पोलिसांकडून अजूनपर्यंत कोणतीही ठोस कायदेशीर हालचाल दिसून आलेली नाही, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. पत्नीने दिलेले तक्रार पत्र हा या प्रकरणातील अत्यंत महत्त्वाचा पुरावा असून, त्याच्या आधारे तातडीने तपास सुरू करावा, अशी मागणी जोर धरत आहे. या घटनेमुळे संपूर्ण तालुक्यात हळहळ व्यक्त होत असून, आता पोलिस तपासातून काय समोर येते आणि प्रशासन काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

ग्रामस्थांच्या प्रशासनाकडे प्रमुख मागण्या

शोकसभेनंतर ग्रामस्थांनी प्रशासनाकडे निवेदनाद्वारे खालील पाच प्रमुख मागण्या केल्या आहेत: १. पत्नी आरती काळे यांनी दिलेल्या तक्रार पत्राची सखोल चौकशी करून संबंधित कर्ज खात्याची स्वतंत्र आणि पारदर्शक तपासणी करावी. २. कुटुंबीयांच्या आरोपांनुसार संबंधित फायनान्स कंपनीच्या जबाबदार अधिकाऱ्यांवर आणि वसुली कर्मचाऱ्यांवर तात्काळ गुन्हा दाखल करावा. ३. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता, तालुक्यातील फायनान्स कंपन्यांच्या सक्तीच्या आणि बेकायदेशीर वसुलीवर प्रशासनाने तात्काळ अंकुश ठेवावा. ४. आधारवड हरपलेल्या काळे कुटुंबीयांना शासनाकडून तात्काळ आर्थिक मदत मिळावी. ५. अमोल काळे यांच्या दोन्ही लहान मुलांच्या पुढील शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी शासनाने घ्यावी.

चांदूर रेल्वेत सुयश बहुउद्देशीय संस्थेचा क्रीडा

चांदूर रेल्वे/वार्ताहर

येथे सुयश बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने गेल्या १३ वर्षांपासून सांस्कृतिक व क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. शहरातील युवकांना खेळण्यासाठी मैदान उपलब्ध करून देणे, विद्यार्थ्यांसह स्थानिक खेळाडूंच्या कलागुणांना वाव देणे आणि क्रीडा क्षेत्रात नवोदित खेळाडूंना प्रोत्साहन देणे हा या महोत्सवाचा मुख्य उद्देश आहे. यंदा दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता सांस्कृतिक कार्यक्रमांना मर्यादित स्वरूप देऊन मैदानी खेळांना प्राधान्य देण्यात आले असून, भव्य टेनिस बॉल खुले क्रिकेट सामने आयोजित करण्यात आले आहेत.



१३ वर्षांची परंपरा कायम; यंदा टेनिस बॉल क्रिकेट सामन्यांना प्राधान्य

या वर्षीच्या क्रीडा महोत्सवाचे अध्यक्ष नगरसेवक हर्षल वाघ असून, संस्थापक अध्यक्ष नगरसेवक सुमेद सरदार यांनी या उपक्रमाची माहिती दिली. क्रीडा महोत्सवाचा उद्घाटन सोहळा १७ नोव्हेंबर २०२६ रोजी नगर परिषद चांदूर रेल्वेच्या अध्यक्षा प्रियंका विश्वकर्मा यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नगर परिषद उपाध्यक्ष बच्चू वानरे, गटनेते हाजी अनिसभाई सौदागर, गटनेते निलेश उर्फ पप्पू भालेराव, सभापती अनिल मोटवानी, गजूभाऊ ठाकरे, प्राविण्य देशमुख व दुर्गाताई भूत उपस्थित राहणार आहेत. तर १९ नोव्हेंबर २०२६ रोजी होणाऱ्या बक्षीस वितरण सोहळ्यास माजी आमदार वीरेंद्रभाऊ जगताप, वंचित बहुजन आघाडीचे प्रदेशाध्यक्ष निलेश विश्वकर्मा, नगरसेविका कल्पना लांजेवार, कीर्ती, प्रियंका वरठे, नीलोफरताई आशिफ तसेच नगरसेवक अरिहंत गेडाम यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. महोत्सवाच्या यशस्वीते साठी देवानंदभाऊ खुणे, राजीव शिवणकर, नरेंद्र मेश्राम, मनोज गवई, बबन वानखडे, अमोल ठाकरे, बबलू शहा, शहजाद सौदागर, जावेद पठाण, योगेश बकाले, सुरज आठवले, अंकित वानखडे, संजय राठोड आदी कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत.

नांदगाव तालुक्यातील रस्त्याची झाली चाळण

नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर

तालुक्यातील सातरगांव, मांजरी म्हसला, कंझरा, शहापूर, सावनेर यासह अनेक खेडेगावाचा तालुक्याच्या ठिकाणी संपर्क जोडणारे रस्ते फारच दयनिय अवस्थेत असून रस्त्यातील गिट्टी उघडली व मोठमोठे खड्डे पडले आहे. त्यामुळे तालुक्याचे ठिकाणी ये जा करणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत असल्यामुळे ग्रामस्थांकडून संताप व्यक्त होत आहे.



तालुक्याचे ठिकाणावरून ग्रामीण भागाला जोडणाऱ्या अनेक रस्त्याची चाळण झाली असून रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडले व गिट्टी सुद्धा उघडली खेडेगावातील नागरीक विद्यार्थी दररोज तालुक्याच्या ठिकाणी नांदगाव ला ये जा करतात शिवाय शेतकरी सुद्धा याच रस्त्याचा वापर करीत असून वाहन धारकाला आपला जीव धोक्यात टाकून वाहनाने प्रवास करावा लागतो. दररोज मोठ्या प्रमाणात विद्यार्थी सुद्धा सायकल टू व्हीलर किंवा पायदळ या रस्त्यावरून जाणे येणे करतो. या रस्त्यावर अनेक किरकोळ अपघात सुद्धा घडले असल्यामुळे सुरक्षित प्रवास ाबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाला. सर्वात दयनिय अवस्था नांदगाव ते सातरगांव रस्त्याची झाली आहे. नागरिकांना या रस्त्याने पायदळ चालणे सुद्धा कठीण होत आहे. या रस्त्याची दुरुस्तीची मागणी करून सुद्धा अद्यापही याकडे लोकप्रतिनिधीचे लक्ष नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी दिसून येते. खड्डेमय रस्ते दुरुस्तीचा प्रश्न अनेक वर्षापासून रेंगाळलेला असून या सर्व रस्त्याचे दर्जेदार नूतनीकरण व्हावे अशी अपेक्षा वाहन चालकासह ग्रामीण परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली असली तरी तालुक्यातील या खड्डेमय रस्त्याच्या दैनिय अवस्थेकडे या परिसरातील आमदाराचे दुर्लक्ष का? हा सुद्धा नागरिकांमध्ये चर्चेचा विषय बनत आहे.

अयोध्येकरीता अमरावतीहून एसटीची विशेष सेवा

अमरावती/का.प्र.

प्रभू श्रीरामांच्या जन्मभूमीचे दर्शन घेण्याची इच्छा असलेल्या भाविकांसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने विशेष तीर्थयात्रेची सुविधा सुरू केली आहे. आता भाविकांना अमरावतीसह राज्यातील विविध बसस्थानकांवरून लालपरी किंवा शयनयान बसने थेट अयोध्येला जाता येणार आहे. यासाठी महामंडळाने ११ दिवसांचा विशेष प्रवास कार्यक्रम तयार केला असून, या यात्रेत जवळपास १० ठिकाणी मुक्कामाची व्यवस्था असेल. लालपरीने प्रवास करण्यासाठी किमान ४० प्रवाशांचा, तर शयनयान बससाठी किमान ३० प्रवाशांचा गट असणे आवश्यक आहे.

प्रत्येक प्रवाशाला १० लाख रुपयांचे विमा संरक्षणही दिले जाणार आहे. महामंडळासोबत आवश्यक कराराची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ही सुविधा सुरू करण्यात आली आहे. अयोध्येसोबतच परिसरातील प्रमुख

शयनयान बसचीही सुविधा

धार्मिक स्थळांनाही भाविकांना भेट देता येणार आहे. प्रवासाचे भाडे बसने प्रत्यक्ष पार केलेल्या अंतरानुसार ठरवले जाईल. बस आरक्षित करताना अंदाजित भाड्याच्या २० टक्के रक्कम आगाऊ नरावी लागेल. बसमधील अंतर मोजण्याच्या यंत्राद्वारे प्रवास पूर्ण झाल्यानंतर अंतिम भाडे निश्चित केले जाईल. यात्रेदरम्यान राहण्याचा आणि जेवणाचा खर्च प्रवाशांच्या गटालाच करावा लागेल.

तसेच इतर राज्यांतील प्रवासादरम्यान लागणारा प्रवासी कर आणि वाहनतळ शुल्कही गटाने भरायचे आहे. उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशमधील आवश्यक परवाने महामंडळा कडून घेतले जातील. प्रशिक्षित चालकांच्या माध्यमातून ही यात्रा पार पडणार आहे. अमरावती विभागाचे विभागीय नियंत्रक सचिन क्षीरसागर यांनी सांगितले की, भाविकांनी आवश्यक संख्येने गट तयार करून या सुविधेचा लाभ घ्यावा. अमरावती बसस्थानकाच्या प्रमुख कार्यालयासह अन्य ८ बसस्थानकांवर संपर्क साधून यात्रेची माहिती घेता येईल.

भाविकांच्या मागणीनुसार इतर राज्यांतील धार्मिक स्थळांसाठीही अशा सहली आयोजित केल्या जाणार आहेत. खासगी बसच्या तुलनेत परवडणाऱ्या दरात सुरक्षित तीर्थयात्रेची संधी उपलब्ध करून देणे हा महामंडळाचा उद्देश आहे.

प्रोत्साहनपर लाभासाठी शेतकरी प्रतिक्षेत

५० हजार रुपयांचा लाभ मिळणार केव्हा?

अमरावती/का.प्र.

जिल्ह्यात एक लाखावर शेतकऱ्यांना दोन लाखांपर्यंतच्या कर्जमुक्तीचा लाभ मिळाला. याशिवाय दीड लाखावर शेतकरी ५० हजारांपर्यंत मिळणाऱ्या प्रोत्साहनपर लाभासाठी पात्र आहेत. दिवाळीत या शेतकऱ्यांना लाभ मिळेल अशी आशा होती. परंतु याबाबत शासनस्तरावर हालचाल नसल्याने शेतकऱ्यांची निराशा झालेली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत जिल्ह्यातील १.२२ लाख शेतकरी खातेदारांना दोन लाखांपर्यंतच्या कर्जमाफीचा लाभ मिळाला आहे.

दुसरीकडे, प्रामाणिकपणे व वेळेवर कर्ज परतफेड करणाऱ्या नियमित शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंतचे 'प्रोत्साहन अनुदान' देण्याची घोषणा शासनाने केली होती. परंतु, दिवाळी उलटून गेली तरी अद्यापही याविषयी शासनस्तरावर कोणतीही ठोस हालचाल झालेली नाही. त्यामुळे सुमारे ९३,१४९ पात्र नियमित शेतकरी अजूनही अनुदानाच्या प्रतीक्षेत असून त्यांच्यामध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

जिल्ह्यातील नियमित खातेदारांना ५० हजारांचे प्रोत्साहन अनुदान देण्यासाठी साधारणपणे ४५० कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे. मात्र, निधी अद्याप वर्ग न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी दुष्काळाच्या आणि आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर या अनुदानाची अत्यंत गरज असताना, होत असलेल्या विलंबामुळे सहकार क्षेत्रातील व बँकिंग शिस्त पाळणाऱ्या शेतकरी वर्गात मोठी नाराजी पसरली आहे.

वेळेवर कर्ज भरूनही प्रोत्साहन अनुदान मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप आहे. प्रामाणिकपणे कर्ज भरण्याची त्यांची मानसिकता आता उरलेली नाही. त्यामुळे प्रामाणिकपणे कर्ज फेडून आम्ही चूक केली का, असा त्यांचा सवाल आहे. नियमित कर्ज भरणा करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन अनुदान देण्याची घोषणा शासनाने केली होती.

त्यामुळे दिलेले आश्वासन पाळावे व प्रोत्साहन अनुदानाच्या घोषणेची तातडीने पूर्तता करावी, अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे. दुष्काळाच्या संकटामुळे आधीच हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना या अनुदानाची तातडीने मदत मिळणे गरजेचे असल्याचे वास्तव आहे.

शकुंतला रेल्वेची जागा बनली कंपोस्ट डेपो

अचलपूर/वार्ताहर

शकुंतला रेल्वे बंद करण्यात आल्यानंतरही तिची होत असलेली उपेक्षा मात्र थांबलेली नाही. येथील विस्तीर्ण परिसरात मोठ्या प्रमाणात कचरा आणून टाकलेला आहे.

हा कचरा कोणाचा? असा प्रश्न या कचऱ्याकडे पाहून उपस्थित केला जात आहे.

जुळ्या शहरात इंग्रजांनी शकुंतला रेल्वे सुरू केली. मुर्तीजापूरपर्यंत ती दररोज धावायची. काळाच्या ओघात शकुंतलाची घरघर थांबली. रेल्वे स्थानक ओस पडले.

सदर जागा शहराच्या जवळ असल्याने आणि या ठिकाणी कुठलेच सुरक्षाकर्मी नसल्याने ओस पडलेल्या रेल्वे परिसराचा आपापल्या परीने उपभोग घेण्याची अनेकांची इच्छा बळावली. काही लोकांनी तर या जागेवर मोठ्या प्रमाणात घनकचरा आणून टाकण्याचे शहाणपण सुचले. अमरावती मार्गावरून अचलपूर मार्गाकडे रेल्वेच्या जागेतून जाणाऱ्या कच्च्या रस्त्यालगत मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढिगारे याची साक्ष देतात.

अचलपूर नगरपरिषदेंतर्गत उचलण्याचा आणि डेपोवर नेऊन टाकण्याचा दरवर्षी ठेका दिला जातो. त्यासाठी करोडो रुपये खर्च केले जाते. घंटागाडी चालकाने सदर कचरा डेपोवर नेण्याची तसदी घेतली नसावी, त्याऐवजी सदर कचरा शहरालगत असलेल्या रेल्वेच्या जागेवर टाकण्याचा पर्याय निवडला असावा, अशी एक शक्यता वर्तवली जात आहे.

एकीकडे स्वच्छ शहर सुंदर शहर असे नारे दिले जात असतानाच आणि त्यावर केंद्र व राज्य सरकारकडून मोठ्या प्रमाणात पैशाचा खर्च करण्यात येता असतानाच अशाप्रकारे शहराच्या वैभवाच्या ठिकाणी अस्वच्छतेचा डाग लावणे चुकीचे आहे, असे नागरिकांमध्ये बोलले जात आहे.

संक्षिप्त

चिखलदरा न.प.चे उपाध्यक्ष प्रमोद नाईक यांना मातृशोक

अमरावती- चिखलदरा नगर परिषदेचे युवा उपाध्यक्ष तथा कर्तव्यदक्ष लोकप्रतिनिधी प्रमोद पंजाबराव नाईक यांच्या मातोश्री आणि माजी नगराध्यक्ष ज्योती पंजाबराव नाईक (वय ६३) यांचे रविवार, १५ नोव्हेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. गेल्या तीन दिवसांपासून त्यांच्यावर अमरावती येथील झेनिथ हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. त्यांच्या आकस्मिक निधनाच्या वृत्ताने चिखलदरा गावात शोककळा पसरली आहे.



ज्योती नाईक यांनी चिखलदरा नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदाच्या कार्यकाळात शहराच्या विकासासाठी, सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी तसेच आपल्या प्रभागातील विविध मूलभूत सुविधांसाठी उल्लेखनीय कार्य केले होते. राजकीय पदाबरोबरच सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख होती. अत्यंत शांत, प्रेमळ, संयमी आणि आपुलकीच्या स्वभावामुळे त्या सर्वांच्या परिचयाच्या व आदराच्या होत्या. त्यांचे सुपुत्र प्रमोद नाईक हे आपल्या विकासाभिमुख कार्यशैलीमुळे चिखलदऱ्याच्या राजकीय व सामाजिक वर्तुळात लोकप्रिय झाले आहेत. तर पती पंजाबराव नाईक, प्रमोद नाईक आणि संपूर्ण नाईक परिवार हा गावातील नागरिकांच्या सुख-दुःखात सहभागी होणारा व मदतीसाठी सदैव तत्पर असणारा परिवार म्हणून ओळखला जातो. ज्योती नाईक यांच्या निधनाने नाईक परिवाराची मोठी हानी झाली असून त्यांच्या जाण्याने एक प्रेमळ, सेवाभावी आणि कर्तव्यनिष्ठ व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. त्यांच्या पश्चात पती, मुले, मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे.

आडकुजी महाराजांचा पुण्यतिथी महोत्सव

तिवसा- अखिल विश्वाला मानवतेचा संदेश देणाऱ्या राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांचे गुरुवर्य परमहंस श्री समर्थ आडकुजी महाराज यांचा १०५ वा पुण्यतिथी महोत्सव अर्थात प्रार्थना दिनोत्सव श्रीक्षेत्र वरखेड येथे मंगळवार १७ ते मंगळवार २४ नोव्हेंबरपर्यंत आयोजित करण्यात आला आहे. यादरम्यान समाधी मंदिर परिसर महाद्वार व आतील परिसरात आकर्षक रोषणाई करण्यात आली आहे. यासाठी आडकुजी महाराज संस्थान व्यवस्थापक मंडळाने श्रीक्षेत्र वरखेड यांनी या महोत्सवाची जय्यत तयारी केली असून वरखेड ग्रामस्थांसोबतखील नियोजन व येणाऱ्या भक्तांच्या सोयीसंदर्भात संस्थानाध्यक्ष अभिजित बोके यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक पार पडली. या सात दिवसीय पुण्यतिथी महोत्सवात दररोज सामुदायिक ध्यान, सामुदायिक प्रार्थना व त्यावरील चिंतन, ग्रामसफाई, ग्रामगीता प्रवचन, वारकरी कीर्तन, अभंग गायन, खंजरी भजन, कार्यकर्ता संमेलन, महिला मेळावा, आरोग्य शिबिर, महाप्रसाद, मुलींचा सत्कार इत्यादी धार्मिक व विधायक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. प्रसिद्ध भारुडकर ह.भ.प. गणेश महाराज शिंदे आळंदीकर, पवन महाराज रोहणकर झाडगाव यांचे विशेष भारुड कार्यक्रमाचे या सप्ताहात आयोजन करण्यात आले आहे. १७ नोव्हेंबरला प्रभाती 'श्री'च्या महासमाधीस महाभिषेक व तीर्थ स्थापना आशीष अहेर यांच्याहस्ते होऊन महोत्सवाचा प्रारंभ होणार आहे. २३ नोव्हेंबर रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत लहानुजी महाराज, सत्यदेव बाबा आदी पादुका पालखीचे आगमन होऊन पालखीचे स्वागत महाद्वारावर आडकुजी महाराज संस्थानचे विश्वस्त अभिजित बोके अध्यक्ष, मनोहर बोके व विश्वस्त करणारे आयोजन करण्यात आले आहे. २४ नोव्हेंबर काळ व महाप्रसाद प्रभाती आयुष्पूजन 'श्री'च्या महासमाधीची महापूजा व ध्वजारोहण अभिजित बोके अध्यक्ष श्री आडकुजी महाराज संस्थान वरखेड यांच्याहस्ते होणार आहे.



ओम परब्रम्ह श्री राणा गणपतेश्वर बाबांचा पुण्यतिथी सोहळा

चांदुर रेल्वे- ओम श्री राणा गणपतेश्वर बहुउद्देशिय सेवा संस्था, इंदिरा नगर चांदुर रेल्वे द्वारा संचालित ओम परब्रम्ह श्री राणा गणपतेश्वर मंदिरात श्री राणा गणपतेश्वर बाबांचा २५ वा पुण्यतिथी सोहळा २२ व २३ नोव्हेंबर रोजी साजरा करण्यात येत आहे. बाबांचा यावर्षो साजरा होणारा पुण्यतिथी सोहळा रौप्य महोत्सव म्हणून बाबांची निष्ठावंत भक्त मंडळी मोठ्या उत्साहाने व भक्तीभावाने साजरा करणार आहे. सोहळ्या निमित्य संस्थानाने दोन दिवसामध्ये विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. कार्यक्रमांमध्ये स्वछता अभियान, ग्रामीण रुग्णालयात भरती असलेल्या रुग्णांना फळ व बिस्कीटाचे वाटप, मंदिर परिसरात फळ झाडांचे वृक्षारोपण, सायंकाळी ग्रामगीता प्रवचन, सामुदायिक प्रार्थना व ध्यान तसेच भक्तिमय संगीत व भजनांजली व सायंकाळी ७ वाजता ह.भ.प. पांडुरंगजी कटयारमल महाराज यांच्या कीर्तनाला सुरुवात होईल तसेच २२ नोव्हेंबर रोजी रात्री ११:४५ ला वैकुंठ चतुर्दशी शुभ मुहूर्तावर बाबांनी देहत्याग केला होता. ह्या पावन दिवसाचे महात्म्य जाणून ह्याच दिवशी रात्री ठीक ११:४५ वाजता बाबांच्या समाधीचे महाद्वार उघडून समाधीचे विधिवत पूजाअर्चा तसेच बाबांच्या मूर्तीचा अभिषेक करून महाआरती केली जाते. हा भक्तिमय सोहळा अनेक भक्तांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ७:३० वाजता बाबांच्या रामधून पालखीचे परिसरातून भ्रमन होईल व दुपारी १२:०० वाजता सोनी मराठी फेम 'कोण बनणार महाराष्ट्राचा लाडका कीर्तनकार' ह्या कार्यक्रमात नामलौकिक प्राप्त ह.भ.प. पंकज महाराज पोहकार यांच्या सुमधुर वाणीतून काल्याचे कीर्तन होईल व त्यानंतर दुपारी १:३० वाजता महाप्रसादाला सुरवात होईल.



गटप्रवर्तकांसह महालॅबच्या कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविणार

अमरावती- राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत गटप्रवर्तक तसेच एचएलएल कंपनीच्या महालॅबमध्ये काम करणारे फ्लेबोटोमिस्ट व रनर बॉय यांच्या प्रलंबित प्रश्नांकडे लक्ष वेधत महाराष्ट्र राज्य नर्सेस व आरोग्य कर्मचारी संघटनेने आरोग्य आयुक्तांकडे चर्चेसाठी वेळ देण्याची व विशेष बैठक आयोजित करण्याची मागणी केली. यासंदर्भात संघटनेने आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या संचालकांना निवेदन पाठविले आहे. गटप्रवर्तक हे कामावर आधारित मोबदल्याच्या संकल्पनेत बसत नाहीत. तालुका समूह संघटक व जिल्हा समूह संघटकांप्रमाणे गटप्रवर्तकांसाठी पर्यवेक्षकीय संवर्ग घोषित करून निश्चित मासिक मानधन ठरवावे तसेच दहा वर्षे सेवा दिलेल्या गटप्रवर्तकांना अधिसंख्य

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

न्यायालयीन कर्मचाऱ्यांना न्याय द्या; पण प्रतीक्षेतील पक्षकारांना वेठीस धरू नका!

महाराष्ट्रातील जिल्हा व तालुका न्यायालयांमध्ये कार्यरत असलेले सुमारे ३४ हजार दुय्यम न्यायालयीन कर्मचारी १७ नोव्हेंबर २०२६ पासून आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी बेमुदत संपावर जाणार आहेत. या आंदोलनाकडे केवळ कर्मचारी संप किंवा न्यायालयीन कामकाजातील अडथळा म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. या कर्मचाऱ्यांच्या मागण्यांची पार्श्वभूमी, त्यांच्या कामाचे स्वरूप, वेतनातील तफावत आणि दीर्घकाळ प्रलंबित असलेले सेवाविषयक प्रश्न समजून घेणे आवश्यक आहे. न्यायव्यवस्था ही केवळ न्यायाधीश आणि वकिलांच्या माध्यमातून चालत नाही, तर तिच्या दैनंदिन कामकाजात न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असते. न्यायालयात दाखल होणाऱ्या प्रकरणांची नोंदणी, कागदपत्रांची पूर्तता, समन्स व नोटिसा पाठविणे, अभिलेखांचे जतन, आदेशांच्या प्रती तयार करणे, निकालांची नोंद आणि इतर प्रशासकीय कामकाज या सर्व प्रक्रियांमध्ये कर्मचारी महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे न्यायव्यवस्थेचा कणा असलेल्या या कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून सक्षम न्यायव्यवस्थेची अपेक्षा करता येणार नाही.

या आंदोलनामागील प्रमुख मुद्दा म्हणजे मुंबई उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर जिल्हा आणि तालुका न्यायालयांतील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू करणे आणि समान कामासाठी समान वेतनाच्या तत्त्वाचा विचार करणे. कर्मचारी संघटनांच्या म्हणण्यानुसार, मुंबई उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांना २००६ पासून सुधारित वेतनश्रेणीचा लाभ मिळत असताना दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांना त्याच धर्तीवर लाभ मिळालेला नाही. या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने ३१ जानेवारी २०२५ रोजी प्रस्ताव शासनाकडे पाठविल्याचे सांगितले जाते. मात्र, सुमारे २१ महिने उलटूनही त्यावर अंतिम निर्णय झालेला नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. याशिवाय शेट्टी आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी, अपुरी कर्मचारी संख्या, वाढता कामाचा ताण आणि संगणकीय कामकाजाबरोबरच कागदोपत्री नोंदी ठेवण्याची दुहेरी जबाबदारी हे प्रश्नही महत्त्वाचे आहेत. या संदर्भात एक महत्त्वाचा न्यायालयीन निर्णय लक्षात घेणे आवश्यक आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने १२ जून २०२६ रोजी राजेंद्र रामाजी धावळे व इतर विरुद्ध महाराष्ट्र शासन या रिट याचिका क्रमांक ७१८७/२०१५ मध्ये जिल्हा व दुय्यम



न्यायालयांतील लघुलेखकांच्या संदर्भात शेट्टी आयोगाच्या शिफारशी १ एप्रिल २००३ पासून लागू करण्याचे निर्देश दिले. तसेच वेतनातील फरक सहा महिन्यांत देण्याबाबत आदेश दिला.हा निर्णय न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक मागण्यांच्या गांभीर्याकडे लक्ष वेधणारा आहे. मात्र,हा विशिष्ट लघुलेखकांच्या प्रकरणातील निर्णय असून तो सर्व ३४ हजार कर्मचाऱ्यांच्या प्रत्येक मागणीवर लागू झालेला सार्वत्रिक आदेश आहे, असे समजणे कायदेशीरदृष्ट्या योग्य ठरणार नाही.

कर्मचाऱ्यांच्या बाजूने ठामपणे उभे राहत असताना या संपूर्ण प्रश्नातील दुसरी महत्त्वाची बाजू विसरता कामा नये, ती म्हणजे सामान्य पक्षकार. न्यायालयात येणारा प्रत्येक पक्षकार हा केवळ एका प्रकरणाचा क्रमांक नसतो. त्यामागे एखाद्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती, एखाद्या महिलेचा उदरनिर्वाह, एखाद्या आरोपीचे स्वातंत्र्य, एखाद्या मुलाच्या भविष्याचा प्रश्न किंवा एखाद्या अपघातग्रस्ताच्या नुकसानभरपाईची आशा असते. अनेक नागरिक रोजंदारीचे काम सोडून, प्रवासाचा खर्च करून आणि वकिलांची फी भरून न्यायालयात येतात. अशा परिस्थितीत संपामुळे सुनावणी पुढे ढकलली गेली, आवश्यक कागदपत्रे मिळाली नाहीत किंवा तातडीच्या अर्जावर प्रक्रिया झाली नाही, तर त्याचा सर्वाधिक फटका आर्थिकदृष्ट्या दुर्बल पक्षकारांना बसू शकतो. विशेषतः जामीन अर्ज, रिमांड, कौटुंबिक हिंसाचारातील संरक्षण, पोटगी, मुलांचा ताबा आणि इतर तातडीच्या प्रकरणांमध्ये विलंब होणे गंभीर ठरू शकते. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देतानाच पक्षकारांचे नुकसान होणार नाही यासाठी स्वतंत्र व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे.

शासन, मुंबई उच्च न्यायालयाचे प्रशासन, कर्मचारी संघटना आणि बार असोसिएशन यांनी तातडीने समन्वय बैठक घेऊन तोडगा काढावा. संपाच्या काळात तातडीच्या प्रकरणांचे कामकाज सुरू राहण्यासाठी कायदेशीर आणि प्रशासकीय निर्देशांनुसार आवश्यक व्यवस्था करावी. प्रकरणे पुढे ढकलली जाणार असल्यास पक्षकारांना आणि वकिलांना शक्य तितकी पूर्वसूचना द्यावी. ई-फायलिंग आणि उपलब्ध डिजिटल सुविधांचा प्रभावी वापर करावा. शासनाने कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत केवळ आश्वासने न देता लेखी निर्णय आणि अंमलबजावणीची निश्चित कालमर्यादा जाहीर करावी. कर्मचाऱ्यांनीही पक्षकारांच्या न्यायिक हक्कांचे संरक्षण करण्यासाठी न्यायालयीन प्रशासनाशी समन्वय ठेवावा. माझी भूमिका स्पष्ट आहे. न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांना माझा ठाम पाठिंबा आहे. समानतेचा अधिकार, कामाचा सन्मान आणि योग्य सेवाशर्ती या प्रत्येक कर्मचाऱ्याच्या रास्त अपेक्षा आहेत. मात्र, त्यांच्या हक्कांच्या लढ्यात सामान्य नागरिकांचा न्याय मिळविण्याचा अधिकार बाधित होऊ नये. शासनाने कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा आणि न्यायालयीन प्रशासनाने पक्षकारांचे हित सुरक्षित ठेवावे. कारण न्यायव्यवस्थेची खरी ताकद केवळ न्यायालयांच्या इमारतींमध्ये किंवा कायद्याच्या पुस्तकांमध्ये नसते, तर त्या व्यवस्थेत काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या योगदानात आणि सामान्य नागरिकाला वेळेत न्याय मिळण्यात असते.कर्मचाऱ्यांना न्याय मिळालाच पाहिजे; पण त्या न्यायाच्या लढ्यात सामान्य पक्षकारांचा न्याय हिरावला जाता कामा नये.

ॲड. धनंजय देशमुख
मो. ९२८४३८२१०२

मराठी अस्मितेचा हुंकार बाळासाहेब

ज्यांच्याकडे संविधानातील कोणतेही पद नव्हते, सरकारी खुर्ची नव्हती,सेना नव्हती पण होता केवळ एक आवाज , तो आवाज सर्व मुंबई बंद करीत होता. मातोश्रीवर निघणाऱ्या त्यांच्या एका वक्तव्याची दिल्लीत बसलेले नेते सुद्धा दखल घेत होते.ज्यांचे वक्तव्य राजकीय भूकंप घडवून आणणारे होते.

१९६० ची मुंबई एकीकडे गगनचुंबी इमारती तर दुसरीकडे चाळीत राहणारा मराठी माणूस.उद्योगपती,दुकानदार, कार्यालयातील बाबूपासून साहेबांपर्यंत सर्व गैर मराठी होते.मुंबईत गुजराती आणि दक्षिण भारतीयांचे वर्चस्व होते.मराठी तरुण बेरोजगार होता.मुंबई महाराष्ट्राची असून सुद्धा मराठी माणसाला कवडीचीही किंमत नव्हती.मुंबई तुमची तर भांडी घासा आमची अशी उपहासात्मक टिंगल होत होती.अशावेळी सर्व सामान्य कुटुंबात जन्मलेला तरुण हातात कुंचला आणि मनात आग घेऊन पुढे आला.बघता बघता ३० ऑक्टोबर १९६६ शिवाजी पार्क वर दसरा मेळावा साजरा झाला आणि खरी ठिणगी पडली ती म्हणजे मराठी माणूस जागृत करण्यासाठी.पुढे मराठी मार्मिक



मासिक मधून आपल्या कुंचल्याने अराजकीय व्यवस्थेवर फटकारे मारून असामाजिक व बेकायदेशीर वर्तना विरोधात लढा उभा केला आणि सुरू झाला 'बजाव पुंगी अन् हटाव लुंगी'चा नारा आणि मग मराठी माणूस पेटून उठला तो बाळासाहेबा मुळेच.

बाळासाहेबांनी शिवसेना स्थापनच केली नाही तर साध्या तरुणांची वाघाची फौज निर्माण करून प्रस्थापितांना फोडून काढण्याचे बळ दिले आणि जातीभेद न करता सामान्य तरुणाला असामान्य बनले.त्याच्या खांद्यावर अत्याचाराविरोधात लढण्याकरिता भगवा ध्वज दिला.आता मराठी माणूस आपल्या हक्काकरीता लढू लागला.त्यामुळे मराठी युवकांना रोजगार प्राप्त होऊ लागला.कारखाने, रेल्वे,कार्यालये मराठी तरुणाची नियुक्ती होऊ लागली.

१७ नोव्हेंबरला साहेब या जगातून गेले. मराठी माणसाला जगण्याचा ताठ कणा देणारे साहेब केवळ माणूस नव्हते तर एक विचार होता. बाळासाहेबांनी विसरता येत नाही. ज्यांनी मराठी माणसाच्या हक्क आणि हितासाठी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांनी मराठी माणसाला इज्जत दिली.त्यांच्या ज्वलंत विचाराने तरुण संघटित होऊ लागला.

बाळासाहेबांनी केवळ शिवसेना नावाची संघटनाच स्थापन केली नाही तर लाखो शिवसैनिक तयार करून प्रस्थापितांना फोडून काढण्याची ताकद दिली.सर्वसामान्यांना आमदार,खासदार,मंत्री करणारा किंगमेकर आणि शून्यातून विश्व निर्माण करणारा जादूगार होते.संकट कितीही आले तरी ती पेलण्याची ताकद आपल्या शिवसैनिकांना देऊन त्यातून मार्ग काढणारा अवलिया होता.महाराष्ट्र आणि देशात अनेक नेते होऊन गेले पण त्यांना जनता कदाचित विसरली असेल पण पण बाळासाहेबांना विसरता येत नाही. जो पर्यंत भूतलावर सूर्य,चंद्र आहे तो पर्यंत साहेबांचे नाव अमर आहे.

अखंड हिंदुस्तानांचे कैवारी,प्रबोधकार,मराठी मनाचे मानबिंदू, हिंदू अस्मितेचे शिरोमणी, हिंदू हृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना विनम्र अभिवादन!



डॉ संजय साळीवकर,
अमरावती.
मो.९४२३४२४८५१


राष्ट्रीय अपस्मार दिवस

भारतामध्ये राष्ट्रीय अपस्मार दिवस १७ नोव्हेंबर रोजी साजरा केला जाणार आहे. मेंदूशी संबंधित या विकाराबद्दल समाजात जनजागृती निर्माण करणे आणि या आजाराविषयी असलेले गैरसमज दूर करणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे.जागतिक आरोग्य संघटनेच्या माहितीनुसार, मेंदूतील पेशींमध्ये अचानक होणाऱ्या असामान्य विद्युत प्रवाहामुळे रुग्णाला वारंवार झटके (फिट्स) येतात, तर योग्य उपाययोजनांनी यापैकी अंदाजे २५% प्रकरणे टाळता (प्रतिबंधित करता) येऊ शकतात.

प्रमुख कारणे :रस्ते अपघात,उंचावरून पडणे किंवा खेळादरम्यान मेंदूला गंभीर दुखापत होणे.बाळंतपणादरम्यान बाळाच्या मेंदूला ऑक्सिजनचा पुरवठा कमी पडणे, जन्माच्या वेळी इजा होणे किंवा बाळाचे वजन खूप कमी असणे.मेंदूज्वर , एन्सेफलायटिस किंवा न्यूरोसिस्टीसर्कोसिस यांसारखे आजार.मेंदूतील रक्तपुरवठा खंडित होणे किंवा मेंदूमध्ये गाठ तयार होणे.कुटुंबातील अनुवंशिक दोष किंवा मेंदूच्या रचनेतील जन्मजात व्यंग.

सुमारे ७०% रुग्ण केवळ नियमित आणि स्वस्त अपस्मारविरोधी औषधांच्या मदतीने पूर्णपणे झटकेमुक्त आयुष्य जगू शकतात .रस्ते अपघात टाळण्यासाठी हेल्मेट व सीटबेल्टचा वापर करणे, गर्भवती महिला आणि नवजात बालकांची योग्य वैद्यकीय काळजी घेणे, स्वच्छता राखून मेंदूचे संसर्ग टाळणे आणि उच्च रक्तदाब नियंत्रणात ठेवून पक्षाघाताचा धोका कमी करणे यामुळे अपस्मार टाळता येतो .

फिट्स (झटका) आल्यास प्रथमोपचार -जर एखाद्या व्यक्तीला अचानक फिट्स आल्यास: सुरक्षित जागा. घाबरून न जाता व्यक्तीच्या आजूबाजूच्या टोकदार किंवा कठीण वस्तू बाजूला करा, जेणेकरून त्यांना इजा होणार नाही. एका कुशीवर झोपवा. तोंडात काहीही घालू नका. वैद्यकीय मदत.जर झटका ५ मिनिटांपेक्षा जास्त वेळ टिकला किंवा व्यक्तीला श्वास घेण्यास त्रास होत असेल, तर तात्काळ जवळच्या रुग्णालयात घेऊन जावे.अपस्मार रुग्णाच्या योग्य व्यवस्थापनात आणि सामान्य आयुष्य जगण्यात कुटुंबाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. कुटुंबातील सदस्यांचा भावनिक आधार, औषधोपचारातील सातत्य आणि झटका आल्यास योग्य प्रथमोपचार यामुळे रुग्ण पूर्णपणे सुरक्षित आणि आत्मनिर्भर राहू शकतो.डॉक्टरांनी दिलेली अपस्मारविरोधी औषधे एकही



दिवस न चुकवता आणि ठराविक वेळी घेण्यास रुग्णाला मदत करा. रुग्णाला झटका कधी आला, किती वेळ टिकला, त्याआधी कोणती लक्षणे दिसली आणि झटक्याचे स्वरूप कसे होते याची डायरीत नोंद ठेवा. ही माहिती डॉक्टरांना औषधांचा डोस ठरवण्यासाठी उपयोगी पडते.ठरलेल्या तारखेला रुग्णाला न्यूरोलॉजिस्टकडे तपासणीसाठी घेऊन जा आणि आवश्यक रक्ताच्या किंवा ईईजी चाचण्या वेळेवर करून घ्या. तेव्हा रुग्णाला द्या आत्मविश्वास, नको कसलीही भीती; कुटुंबाच्या प्रेमानेच बदलेल त्याची स्थिती!

डॉ विनोद पवार
मो.९४२३४ ३३४५३

निवडणूक आयोगाचा संशयास्पद व्यवहार

देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश्वरकुमार यांनी मतदार विरोधी SIR राबवून मतदार वगळले व भाजप पुरस्कृत मतदार समाविष्ट केले. याविरुद्ध संपूर्ण देशभर असंतोष प्रकट झाला. हजारोंच्या संख्येत मतदार मोर्चात रस्त्यावर उतरले. उद्रेकाने निवडणूक आयोगाचा संशयास्पद व्यवहार उघड झाला.रस्त्यावरील संघर्ष,सर्वोच्च न्यालायातील लढा, आणी मोदी सरकार विरुद्ध विरोधी पक्षांने आक्रमक लढा उभारला. या विद्रोहाने मोदी सरकार त्रस्त झाले.गेल्या सहा महिन्यापासून लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी पत्रकार परिषदा व रस्त्यावरील तरुणांच्या मोर्चाने वारंवार हा संशयास्पद व्यवहार उघड केला.सर्वोच्च न्यालयाच्या सक्त निर्देशातून आपल्या भाजप समर्थित SIR मध्ये आयोगाला बदल करण्यास भाग पाडले. या दुहेरी आक्रमक डावपेचाने मोदी सरकार संभ्रमित झाले.

परिणामी संसदेच्या हिवाळी अधिवेशनात संसद व राज्यसभेत अनुपस्थित राहले. संसदेत त्यांना तोंड दाखवायला जागा उरली नाही.दिल्ली मधील जंतर मंतर वरील बेरोजागारंचे आंदोलन कॉकरोच जनता पाटीच्या हजारो तरुणांचे मेळावे,राहुल गांधींची 'छात्रोकी गुंज'या सततच्या आंदोलनाने मोदी शहांना जनसामान्य व तरुणांच्या विद्रोहाने दिल्लीतील रस्त्यावर फिरणे मुश्किल झाले. सोबतच दिल्लीतील वरिष्ठ पत्रकार डॉ राकेश पाठक, रविश, अभिसार मिश्रा, कुमकुम बेनेवाल ,या जेष्ठ पत्रकारांच्या युट्युब वृत्त वाहिन्यांतील विश्लेषनातून सरकारला पळताभुई थोडी केली. सरकार विरोधी वृत्त प्रसारणाने मादी सरकार चोहबजुने चक्रव्यूहात अडकले.

राहुल गांधींनी एकामागून एक हजारोच्या संखेतील मोर्चाने मोदी शहासह ज्ञानेशकुमार यांना बेजार केले. विरोधी हल्ल्याने ज्ञानेशकुमार यांनी आपले पुर्वीच आदेश फिरवून मतदारांच्या सोयीचे बदल करून उलटा मार्ग पत्करला.सर्वोच्च न्यायालायातील जेष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांच्या प्रभावी प्रतिपादनाने न्यायालयानेही निवडणूक आयोग विरुद्ध कठोर कारवाईचे धोरण अवलंबिले. मोदी सरकार विरोधी वातावरणामुळे सरकारची परिस्थिती दोलायमान अवस्थेत आहे. देश व आंतरराष्ट्रीय स्तरावर सरकारची फजिती होते.

२०१९ व २०२४ च्या निवडणुकात लोकसभा आणी विधानसभा मतदार संघातील ५१ मतदार संघात मतदान घोटाळा झाला. सुमेधा मित्तल व व्यंकटेश यांच्या अहवालात हा घोटाळा उघड केला.यामुळे देशाच्या राजकीय क्षेत्रात खळबळ माजली. २०२४ च्या निवडणुका दरम्यान राजीवकुमार निवडणूक आयुक्त होते. ते पुर्णपणे मोदी सरकारच्या अंकित होते. यावेळच्या विधानसभा व लोकसभा मतदार संघाच्या मतमोजणी व प्रत्यक्ष मतदान यात जमिन अस्मानचा फरक आढळतो असा 'कलेकटिव्ह रिपोर्टर्स' च्या अहवालात उघड केला. या फरकाने ५१ मतदार संघात भाजपचे उमेदवार निवडून आल्याचे अंतिम निकालात घोषित करण्यात आले. सात फेब्रुवारी २०२५ ला महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत घोळ झाल्याचा आरोप काँग्रेसने पत्रकार परिषदेत केला होता.चार महिन्यानंतर काँग्रेसने पुनः पत्रकार परिषदेत ८५ मतदार संघात मतमोजणीत घोटाळा झाल्याचा एका निवेदनात आरोप केला.मात्र निवडणूक आयोगाने आरोप फेटाळला.

यात दोन राज्ये व एका केंद्रशासीत प्रदेशातील ५१ मतदार संघातील मतदान मोजणी व प्रत्यक्ष झालेले मतदान यातील आकडे जुळत नाही मोठा फरक आहे.सहाय्यक निवडणूक अधिकाऱ्यांच्या अहवालाच्या पडताळणीत ४,२१२ मुळ दस्तावाजांचे डिजिटल स्वरुपात बदल केल्याचे आढळून आले.५३१ मतदार संघात या फरकाने भाजप उमेदवार निवडून आल्याचे अंतिम निकालात घोषित करण्यात आले. या खळबळजनक वृत्ताने मोदी सरकार व NDA मधील घटक पक्षात अस्वस्थता निर्माण झाली.यामुळे राजकीय क्षेत्रात सत्ता बदलाचे संकेत मिळत आहेत.

पुरुषोत्तम गुळवे
मो.९४२२३२५०७४
gulvepurushottam@gmail.com

मोकळेपणाने वावरणे हा तिचा मूलभूत अधिकार...

'मग तू पोस्ट टाकू नकोस.'

'फोटो कशाला शेअर करतेस?'

'अकाउंट बंद कर. त्रास संपेल.'

वृंदा बाईला troll करायला सुरुवात केली की हे असले सल्ले अगदी सहज दिले जातात. जे घरात, समाजात, तेच ऑनलाईन जगात. म्हणजे बोलणे आणि व्यक्त होणे तिने थांबवायचे. स्वतःचा ऑनलाइन प्रेझन्स तिने बंद करायचा. स्वतःची जागा तिने सोडायची. तिचा छळ करणाऱ्यांचे आणि त्या छळाला व्हायरल होण्यासाठी मदत करणाऱ्या व्यवस्थेचे काय? त्या डिझाईनचे काय ज्या मुळे हा प्रश्न ऑनलाईन जगात निर्माण झाला आहे. मी इंटरनेटच्या फॉल्टी दिझाईनबद्दल पूर्वीही लिहिलेले आहे. पण आता एक महत्त्वाचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे.

Equality Now ने ६ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध केलेला 'The Architecture of Harm: Mapping the Digital Pathways to Violence Against Women and Girls' हा अहवाल या व्यवस्थेकडे लक्ष वेधतो. स्त्रीद्वेष पसरवण्यात अल्गॉरिदम, डिजिटल प्लॅटफॉर्मची रचना आणि त्यातून मिळणारा आर्थिक फायदा यांचा सहभाग कसा आहे हे हा अहवाल उलगडून दाखवतो. ऑनलाइन आणि प्रत्यक्ष आयुष्यातील हिंसेचे परस्परसंबंधही किती गुंतागुंतीचे आहेत हे मांडतो.

इथे 'Architecture' हा शब्द महत्त्वाचा आहे. कोणता आशय अधिक लोकांना दिसणार, कुणाचा आवाज पुन्हापुन्हा ऐकू येणार, कोण व्हायरल होणार, काय व्हायरल होणार, कशाला प्रसिद्धी मिळणार आणि त्यातून कुणाला पैसे मिळणार, हे ठरवणारी एक रचना डिजिटल जगात अस्तित्वात आहे. स्त्रीद्वेष आणि स्त्रियांना होणारे trolling यांचा विचार करताना ही रचनाही तपासायला हवी.

एखादा तरुण फिटनेसचे व्हिडिओ बघत असेल. डेटिंगविषयी माहिती शोधत असेल. पैसे कसे कमवायचे याचे सल्ले ऐकत असेल. या साध्या वाटणाऱ्या विषयांमधूनही त्याला अधिकाधिक टोकाच्या, पुरुष वर्चस्वाचे समर्थन करणाऱ्या आशयाकडे नेले जाऊ शकते, असे या अहवालातील विश्लेषणात मांडले आहे.

या अहवालातील मुद्दे गंभीर आहेत. या सगळ्याचा विचार आपण घरात वाढणाऱ्या आणि



हातात सतत मोबाईल असणाऱ्या मुलांच्या दृष्टिकोनातून करायला हवा. तो किती वेळ फोन वापरतो याबरोबरच, त्या वेळेत स्त्रियांविषयी तो काय ऐकतो? बघतो? नात्यांविषयी दहत्हा जग त्याला काय शिकवू बघतेय? एखाद्या स्त्रीचं स्वतंत्र मत त्याला स्वतःचा अपमान का वाटू लागतो आहे? स्त्रीच्या देहाकडे, विचारांकडे, भावविश्वाकडे तो कसे बघतोय, त्याला इंटरनेटच्या जगातले विविध घटक प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे काय शिकवता आहेत? स्क्रीन टाइमच्या आकड्यापलीकडे जाऊन हे प्रश्न विचारावे लागतील.

AI मुळे यात आणखी भर पडते आहे. संमतीशिवाय लैंगिक स्वरूपाचे बनावट फोटो आणि व्हिडिओ तयार करण्याची साधनं आज सहज उपलब्ध आहेत. खोट्या, मॉर्फ फोटोमुळे निर्माण होणारी भीती खरी असते. घरच्यांना काय सांगायचे, ऑफिसमध्ये काय बोलले जाईल, मुलांपर्यंत हे पोहोचेल का, पुन्हा कुठे शेअर होईल, या प्रश्नांचे ओझे त्या स्त्रीला वाहावावे लागते. फोन बाजूला ठेवला म्हणून हे ओझे बाजूला ठेवता येत नाही.

आणि मग एखादी बाई पुढची पोस्ट लिहिण्याआधी दहा वेळा विचार करते. मत थोडे सौम्य करते. काही विषय टाळते. कधीतरी बोलणंच थांबवते. कधी कधी या स्पेसमधून कायमची बाजूला होते. डिजिटल हिंसेची किंमत आपल्याला वाटते त्यापेक्षा प्रचंड मोठी आहे.

या अहवालात सरकार आणि टेक कंपन्यांकडून ठोस जबाबदारीची अपेक्षा आहे. प्लॅटफॉर्म तयार करतानाच सुरक्षिततेचा विचार करणे, अल्गॉरिदममध्ये पारदर्शकता आणणे, हानिकारक आशयातून पैसे कमावण्याला आळा घालणे आणि सक्षम नियामक यंत्रणा उभारणे या महत्त्वाच्या शिफारशी देण्यात आल्या आहेत. माध्यम शिक्षणावर भर दिलेला आहे. जे मी गेली अनेक वर्ष करते आहे.

प्रत्येक वेळी सुरक्षित राहण्याची जबाबदारी स्त्रीवर टाकून कसे चालेल? घरात, घराबाहेर, शाळेत, ऑफिसमध्ये आणि आता ऑनलाईन जगातही तिला वावरायचे असेल तर तिने तिची सुरक्षा बघावी. याला काहीही अर्थ नाहीये. जबाबदारी माध्यमांची देखील तितकीच आहे. ही माध्यमे बनवणाऱ्या IT कंपन्यांची देखील आहे. ती त्यांच्या गळ्यात टाकणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष किंवा आभासी कुठल्याही जगात मोकळेपणाने वावरणे हा तिचा मूलभूत अधिकार आहे. तो शाबुत रहावा यासाठी प्रयत्नरत असण्याची गरज कधी नव्हे एवढी आज आहे.

-मुक्ता चैतन्य

■ मंगळवार, १७ नोव्हेंबर २०२६
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सहय

अकोला
जिल्हा विशेष

डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी फवारणीच्या कामाला गती द्या!

दर चौथ्या दिवशी प्रत्येक प्रभागात फवारणी करण्याचे सभापती अग्रवाल यांचे निर्देश

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरात डासांचा प्रादुर्भाव वाढत असून, नागरिकांसह नगरसेवकांकडूनही तक्रारी वाढू लागल्या आहेत. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या मलेरिया विभागाच्या कामकाजाचा स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी सोमवारी (१६ नोव्हेंबर) आढावा घेतला. डासअळी नाशक फवारणीच्या कामाबाबत त्यांनी नाराजी व्यक्त करीत फवारणी मोहिमेला अधिक गती देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

महापौर शारदा रणजीत खेडकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभागृहात ही बैठक पार पडली. यावेळी मलेरिया विभागामार्फत शहरात सुरू



असलेल्या फवारणीसह अन्य उपाययोजनांची माहिती घेण्यात आली. मात्र, प्रत्यक्षात डासअळी नाशक फवारणीचे काम अपेक्षित पद्धतीने होत नसल्याचे निदर्शनास आल्याने सभापती अग्रवाल यांनी विभागाच्या कामकाजावर नाराजी व्यक्त केली.

शहरातील प्रत्येक प्रभागात ज्या भागात फवारणी करण्यात आली आहे, त्या ठिकाणी दर चौथ्या दिवशी पुन्हा फवारणी करावी. प्रत्येक मशीन ऑपरेटरने दिवसाला किमान दहा पंप फवारणीचे काम पूर्ण करावे, असे निर्देश देण्यात आले. फवारणी यंत्रे चार्ज करण्यासाठी आणि औषधांचा साठा ठेवण्यासाठी स्वतंत्र जागा निश्चित करून आवश्यक व्यवस्था करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

फवारणी सुपरवायझरनी संपूर्ण शहरातील प्रभागनिहाय कामाचे नव्याने नियोजन करावे. केवळ नियोजन करून न थांबता प्रत्यक्ष फवारणीची नियमित पाहणीही करावी, असे अग्रवाल यांनी स्पष्ट केले. याशिवाय, पंप ऑपरेटरनी आपापल्या कार्यक्षेत्रातील नागरिकांना शौचालयाच्या व्हेंट पाइपवर जाळी बसविण्याबाबत सूचना द्याव्यात. वारंवार सांगूनही जाळी न बसविणाऱ्या नागरिकांची नावे प्रशासनाकडे सादर करावीत, असेही निर्देश देण्यात आले.

बैठकीला उपमहापौर अमोल गोगे, मनपा सहायक आयुक्त सुमेध अलोने, सभागृह नेते पवन महल्ले, उपायुक्त गणेश शहाणे, नगरसेवक सिद्धार्थ उपरवट, मलेरिया विभागप्रमुख डॉ. निर्तीन गायकवाड यांच्यासह विभागातील कर्मचारी आणि पंप ऑपरेटर उपस्थित होते.

अपघात करून पसार झालेला वाहनचालक सहा तासांत जेरबंद!

सेवानिवृत्त एएसआयच्या मृत्यूप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

■ प्रतिनिधी | अकोला ■

इनकम टॅक्स चौक परिसरात सेवानिवृत्त सहायक पोलीस उपनिरीक्षकाला (एएसआय) धडक देऊन मृत्यूस कारणीभूत ठरल्यानंतर वाहनासह पसार झालेल्या चालकाला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवघ्या सहा तासांत शोधून काढत जेरबंद केले. कुणाल राजू बगळेकर (वय ३०, रा. नागे लेआउट, कौलखेड, अकोला) असे ताब्यात घेतलेल्या वाहनचालकाचे नाव असून, अपघातासाठी वापरलेले महिंद्रा जीतो वाहनही पोलिसांनी जप्त केले आहे.

रविवार, १५ नोव्हेंबर रोजी सकाळी ६.५४ वाजताच्या सुमारास हा अपघात घडला. सेवानिवृत्त एएसआय अरुण लक्ष्मणराव मेतकर (वय ६५, रा. रक्षण रोड, व्हीएचबी कॉलनी, अकोला) हे इनकम टॅक्स चौक परिसरातून जात असताना भरधाव वेगाने आलेल्या अज्ञात वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या मेतकर यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. अपघातानंतर चालक वाहनासह घटनास्थळावरून पसार झाला होता.

याप्रकरणी खदान पोलीस ठाण्यात कलम १९४ बीएनएसनुसार आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती.



अपघातग्रस्त वाहनही घेतले ताब्यात

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेंडेकर यांना तातडीने पथक तयार करून पसार चालकाचा शोध घेण्याचे निर्देश दिले. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेने समांतर तपास सुरू केला. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली.

अपघातस्थळापासून वाहनाचा माग काढत अवघ्या सहा तासांत चालक कुणाल बगळेकर याला ताब्यात घेण्यात आले. तसेच अपघातात वापरलेले महिंद्रा जीतो वाहन (क्रमांक एमएच ३० एक्यू ०५८८) जप्त करण्यात आले.

पुढील कायदेशीर कारवाईसाठी आरोपी आणि वाहन खदान पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. अपघात घडवून घटनास्थळावरून पसार झालेल्या चालकाचा अल्पावधीत शोध घेण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले.

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक डॉ. निलेश पांडे आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेंडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक गोपाल जाधव, पोलीस हेडकॉन्स्टेबल वसीमोद्दीन, रवि खंडारे, अन्सार अहमद, आकाश मानकर, अभिषेक पाठक आणि मोहम्मद आमीर यांनी ही कारवाई केली.

उतावळी प्रकल्पाचे पाणी अखेर कालव्यात; शेतकऱ्यांना दिलासा!

आमदार नितीन देशमुख यांच्या पाठपुराव्याला यश

■ प्रतिनिधी | पातूर ■

उतावळी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांची प्रतीक्षा अखेर संपली असून, प्रकल्पाचे पाणी कालव्याद्वारे सोडण्यात आले आहे. शिवसेना उपनेते तथा आमदार नितीन बाप्पू देशमुख यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून, सोमवार, १६ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता मेहकर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांच्या हस्ते कालव्यात पाणी सोडण्याचा शुभारंभ करण्यात आला.

उतावळी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना मागील काही काळापासून पाणीटंचाईचा सामना करावा



लागत होता. पिकांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध होत नसल्याने शेतीचे नुकसान होण्याची भीती निर्माण झाली होती. त्याचबरोबर पशुधनाच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनला होता. त्यामुळे प्रकल्पातून कालव्याद्वारे पाणी सोडण्याची मागणी शेतकऱ्यांकडून सातत्याने केली जात होती. शेतकऱ्यांची ही अडचण लक्षात घेऊन आमदार नितीन देशमुख यांनी पाणी सोडण्यासाठी संबंधित यंत्रणेकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या प्रयत्नांना अखेर यश मिळाले. आमदार सिद्धार्थ खरात यांच्या हस्ते पाणी सोडण्याचा शुभारंभ झाल्याने लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

कालव्यातून पाणी प्रवाहित झाल्याने पिकांच्या सिंचनासह पशुधनाच्या पाण्याचा प्रश्नही मार्गी लागण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. पाण्याची प्रतीक्षा संपल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी जलसंपदा विभागाचे अधिकारी सांगळे, शेख, घाळे यांच्यासह दीपक जावळे, बाळू चव्हाण, गजानन चव्हाण तसेच परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संत जलाराम बाप्पा जयंतीनिमित्त महाप्रसाद

अकोला : संत जलाराम बाप्पा यांची २२७वी जन्मजयंती सोमवारी स्थानिक बिरला कॉलनी परिसरातील संत जलाराम बाप्पा मंदिरात अत्यंत भक्तिभावाने साजरी झाली. या निमित्ताने आयोजित बाप्पांच्या महाप्रसादाचा पाच हजार भक्तांनी लाभ घेतला. उत्सवाची सुरुवात सकाळी पू. जलाराम बाप्पा यांच्या विग्रहाच्या अभिषेकाने, ध्वजारोहण व पूजनाने झाली. बजमान राजेशभाई सोळा, अजय भायानी, पवनभाई खोडानी, परागभाई आडतीया, पवनभाई गणात्रा, मोहन विठलानी आणि डॉ. विपुलभाई कानाणी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी मंदिर परिसरात भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरात ४६ बाटल्या रक्त संकलित करण्यात आले; रक्तसंकलनाचे काम डॉ. हेडगेवार ब्लड बँकने केले.

जाहीर नोटीस

वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं.१८७६/२०२६ प्रोसेस नं.१४४१२/२०२६
चौ.ता. १७/१२/२०२६ दिनांक : ०७/११/२०२६

अर्जदार : १. सुरभा शामराव देशमुख २. बिपीन शामराव देशमुख रा. दीड रोड, कोर्ट कॉलनी, हनुमान नगर, केडगांव, ता. जि. अहमदनगर ३. प्रविण शामराव देशमुख रा. क्र. १ व ३ रा. पोपळघर हॉस्पिटल जवळ, रणपिसे नगर, अकोला, ता. जि. अकोला ४. वैशाली राजेश वाघ रा. बि – ५, अंजिवा अपार्टमेंट, इंदिरा नगर, महिला बँकेच्या वर, सिडको, नाशिक, ता. जि. नाशिक

विरुध्द

गैरअर्जदार : कोणीही नाही.
मयताचा पत्ता :- मयत : १. शामराव हरिहर देशमुख
पत्ता :- रा. जागृती विद्यालयजवळ, रणपिसे नगर, अकोला

या अर्थीअपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, शामराव हरिहर देशमुख यांचे दि. ०५/१०/२०२६ रोजी जागृती विद्यालयजवळ, नगर, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसलयाही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसलयाही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/११/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, अधिक्षक, दिवाणी न्यायालय (क-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १२४४/२०२६ प्रोसेस नं. ११७८९/२०२६
चौ.ता. १७/१०/२०२६ दिनांक : १६/०९/२०२६

अर्जदार : १. रेश्मा हरीलाल टकरानी, वय अं. ६०वर्षे, धंदा- घरकाम, रा. ज्या नारायणदास आर्नदानी, माता मंदिर जवळ, नानक नगर, निमवाडी, अकोला, ता. जि. अकोला. २. संदिप हरीलाल टकरानी, वय ४१ वर्षे, धंदा- व्यवसाय, रा. माता मंदिर जवळ, नानक नगर, निमवाडी कॅम्प, अकोला, ता. व जि. अकोला. ३. अनुप हरीलाल टकरानी, वय ३९ वर्षे, धंदा- व्यवसाय, रा. रमेश महाराज घराजवळ, नानक नगर, निमवाडी कॅम्प, अकोला, ता. जि. अकोला

विरुध्द

गैरअर्जदार : निल
मयताचा पत्ता :- मयत : हरीलाल भगवानदास टकरानी
पत्ता :- रा. माता मंदिर जवळ, नानक नगर, निमवाडी कॅम्प, अकोला, ता. व जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत हरीलाल भगवानदास टकरानी यांचे दि.१४/०७/२०२५ रोजी अकोला, ता. व जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसलयाही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसलयाही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, अधिक्षक, दिवाणी न्यायालय (क-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

वि. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), पातुर यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं.१५६/२०२६ प्रोसेस नं.१४४३/२०२६
चौ.ता. २२/१२/२०२६ दिनांक : ०७/११/२०२६

अर्जदार : १. ममताबाई सुरेंद्र कवळकार वय ७६ वर्षे, धंदा- घरकाम २. राजेंद्र सुरेंद्र कवळकार वय ६० वर्षे, धंदा- शेती ३ सुखदेव सुरेंद्र कवळकार वय ४३ वर्षे, धंदा- शेती ४. गिता सुरेंद्र कवळकार वय ४७ वर्षे, धंदा- घरकाम क्र. १ ते ४ रा. सस्ती, ता. पातुर, जि. अकोला ५. मिराबाई रामराव साबळे वय ६२ वर्षे, धंदा- घरकाम रा. किसनंद्रड पुर्णा, ता. अकोट, जि. अकोला ६. ताराबाई मानिकराव साबे वय ५० वर्षे, धंदा- घरकाम रा. लदनापुर, ता. संग्रामपुर, जि. बुलढाणा ७. रत्नाबाई हरीदास काळे वय ५१ वर्षे, धंदा- घरकाम रा. वरुळा बळेगांव, ता. जि. अकोला ८. देवयानी सदानंद पोंगे वय ४६ वर्षे, धंदा- घरकाम रा. खरप बु., ता. जि. अकोला

विरुध्द

गैरअर्जदार : निल
मयताचा पत्ता :- मयत : सुरेंद्र गणुजी कवळकार
पत्ता :- रा. सस्ती, ता. पातुर, जि. अकोला

या अर्थी उपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुरेंद्र गणुजी कवळकार यांचे दि. ०५/०९/२०२४ रोजी सस्ती, ता. पातुर, जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसलयाही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २२/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसलयाही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/११/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

दिनांक:- ०७/११/२०२६, पातुर — शिक्का — आदेशानुसार, सहा अधिक्षक, दिवाणी न्यायालय (क.स्तर), पातुर

जाहीर नोटीस

वि. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), पातुर यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं.१४८/२०२६ प्रोसेस नं.१३७७/२०२६
चौ.ता. ०९/१२/२०२६ दिनांक : २३/१०/२०२६

अर्जदार : १. चंद्रकला अंबादास ताठोळे वय ७४ वर्षे, धंदा- घरकाम २. संदिप अंबादास ताठोळे वय ४७ वर्षे, धंदा- शेती ३ नितीन अंबादास ताठोळे वय ४० वर्षे, धंदा- शेती ४. गोवर्धन अंबादास ताठोळे वय ३८ वर्षे, धंदा- शेती वरील अ.क. १ ते ४ रा. अंबाशी, ता. पातुर, जि. अकोला ५. रेखा गजानन तिवरे वय ४३ वर्षे, धंदा- घरकाम रा. सांगवी, ता. तेल्हारा, जि. अकोला

विरुध्द

गैरअर्जदार : निल
मयताचा पत्ता :- मयत : अंबादास विष्णाथ ताठोळे
पत्ता :- रा. अंबाशी, ता. पातुर, जि. अकोला

या अर्थी उपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अंबादास विश्वनाथ ताठोळे यांचे दि.२६/०८/२०२६ रोजी कोरडे हॉस्पीटल, अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसलयाही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०१/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसलयाही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

दिनांक:- २३/१०/२०२६, पातुर — शिक्का — आदेशानुसार, सहा अधिक्षक, दिवाणी न्यायालय (क.स्तर), पातुर

जाहीर नोटीस

वि.०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं.१८८६/२०२६ प्रोसेस नं.१४१७१/२०२६
चौ.ता. १७/१२/२०२६ दिनांक : ०५/११/२०२६

अर्जदार : १. सौ. रेणुका आनंद मांडुस्कर रा. धनवंती नगर, इंदौर, राजेंद्र नगर, ता. जि. इंदौर २. गणेश रमेश देशपांडे रा. ३३०, खटीक मोहल्ला, इंदौर, ता. जि. इंदौर

विरुध्द

गैरअर्जदार : कोणतेही नाही.
मयताचा पत्ता :- मयत : १ माया रमेश देशपांडे २. रमेश दत्तात्रय देशपांडे
पत्ता :- रा.भूत बंगल्या मागील गल्ली, गोठी उमरी, अकोला ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, माया रमेश देशपांडे यांचे दि. १२/०२/२००३ रोजी अकोला येथे व रमेश दत्तात्रय देशपांडे यांचे दि. २९/१२/२०२४ रोजी इंदौर ता. जि. इंदौर येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसलयाही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसलयाही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/११/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, अधिक्षक, दिवाणी न्यायालय (क-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं.१८३३/२०२६ प्रोसेस नं.१३८८९/२०२६
चौ.ता. १६/१२/२०२६ दिनांक : २९/१०/२०२६

अर्जदार : १. गोदावरी मधुकर जाधव २. अरुणा मधुकर जाधव ३. शेकर मधुकर जाधव तिघेही रा. मु. पो. काटी, ता. जि. अकोला. ४. शोभा पांडुरंग बेंगे, लग्ननांतरचे नाव शोभा मधुकर जाधव, लग्नाआधीचे नाव रा. कविठा बु, ता. जि. अमरावती.

विरुध्द

गैरअर्जदार : निल
मयताचा पत्ता :- मयत : मधुकर बळीराम जाधव
पत्ता :- रा. मु. पो. काटी, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मधुकर बळीराम जाधव यांचे दि.१८/१०/२०१७ रोजी काटी, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसलयाही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १६/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसलयाही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, अधिक्षक, दिवाणी न्यायालय (क-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं.१८९४/२०२६ प्रोसेस नं.१४४१८/२०२६
चौ.ता. १९/१२/२०२६ दिनांक : ०७/११/२०२६

अर्जदार : १. नागोराव शंकरराव शिरसाट रा. शासकिय निवास स्था, वन परिक्षेत्र कार्यालय, मंगरूळपीर रोड, पिंपी कॅम्प, अकोला, ता. जि. अकोला. २. श्याम शंकरराव शिरसाट ३. अजय शंकरराव शिरसाट ४. दिपक शंकरराव शिरसाट क्र. २ ते ४ रा. रमाबाई चौक, भिम नगर, जुने शहर, अकोला, ता. जि. अकोला ५. प्रभा बाबुराव शिरसाट ६. पायल बाबुराव शिरसाट क्र.५ व ६ रा. जीतापूर, पिंपी खु, ता. जि. अकोला

विरुध्द

गैरअर्जदार : कोणीही नाही.
मयताचा पत्ता :- मयत : १. शंकरराव गोटूराम शिरसाट २. वच्छलाबाई शंकरराव शिरसाट ३. बाबुराव शंकरराव शिरसाट
पत्ता :- रा. रमाबाई चौक, भिम नगर, जुने शहर, अकोला, ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, शंकरराव गोटूराम शिरसाट यांचे दि. ०३/१०/२०२३ रोजी, वच्छलाबाई शंकरराव शिरसाट यांचे दि. २९/११/२० रोजी आणि बाबुराव शंकरराव शिरसाट यांचे दि. ११/०९/२००० रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसलयाही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १९/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसलयाही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/११/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, अधिक्षक, दिवाणी न्यायालय (क-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं.१७४८/२०२६ प्रोसेस नं.१३१४८/२०२६
चौ.ता. ०४/१२/२०२६ दिनांक : १४/१०/२०२६

अर्जदार : १. दीपक शिवाजी आठवले २. विनेक दीपक आठवले ३. शशिल दीपक आठवले सर्व रा. बस स्टॉप जवळ, दहीहांडा, ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : कोणीही नाही.
मयताचा पत्ता :- मयत : वंदना दीपक आठवले
पत्ता :- रा. दहीहांडा ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत वंदना दीपक आठवले यांचे दि. २०/०६/२०२४ रोजी दहीहांडा, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसलयाही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०४/१२/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसलयाही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १४/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, अधिक्षक, दिवाणी न्यायालय (क-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

विद्यमान दिवाणी न्यायालय (क. स्तर), तेल्हारा यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ३८७/२०२६ प्रोसेस क्र. ११९६/२०२६
चौ.ता. १६/१२/२०२६ दिनांक : ०६/११/२०२६

अर्जदार : १. श्रीमती अनिता विजय मातोडे/मोतोडे वय ३७ वर्षे, धंदा- घरकाम २. कु. विनयी विजय मातोडे वय १५ धंदा- शिक्षण ३. कु. माहेश्वरी विजय मातोडे वय ०७ वर्षे, धंदा-शिक्षण ४. वि. ओम विजय मातोडे वय २.५ वर्षे, धंदा-मिनर (अर्जदार क्र. २ ते ४ तर्फे अ.पा.क. क्र. १ आई) सर्व अर्जदार रा. कात्री, पोष्ट सौदळा, ता. तेल्हारा, जि. अकोला

विरुध्द

गैरअर्जदार : कोणीही नाही.

ज्याअर्थी वरील अर्जदार क. १ ते ४ नुसार मुंबई रेग्युलेशन अॅक्ट अंतर्गत वि. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर तेल्हारा यांचे न्यायालय वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. अर्जदार क. १ चे पती व अर्जदार क. २ ते ४ चे वडील मयत नामे विजय भास्करराव मातोडे हे दि. २०/१०/२०२५ रोजी मौजे मानकोली, गिरवंडी, ठाणे येथे मयत झालेले आहेत त्यामुळे अर्जदार लेख कायदेशीर वारस असून इतर कोणतेही वारस नाहीत.

त्याअर्थी सर्वांना सूचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक १६/१२/२०२६ रोजी किंवात्या अगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक ०४/११/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का — आदेशानुसार, सहायक अधिक्षक, दिवाणी न्यायालय, क.स्तर, तेल्हारा

जाहीर नोटीस

वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं.१३३३/२०२६ प्रोसेस नं.१३८८९/२०२६
चौ.ता. १६/१२/२०२६ दिनांक : २९/१०/२०२६

अर्जदार : १. गोदावरी मधुकर जाधव २. अरुणा मधुकर जाधव ३. शेकर मधुकर जाधव तिघेही रा. मु. पो. काटी, ता. जि. अकोला. ४. शोभा पांडुरंग बेंगे, लग्ननांतरचे नाव शोभा मधुकर जाधव, लग्नाआधीचे नाव रा. कविठा बु, ता. जि. अमरावती.

विरुध्द

गैरअर्जदार : निल
मयताचा पत्ता :- मयत : मधुकर बळीराम जाधव
पत्ता :- रा. मु. पो. काटी, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मधुकर बळीराम जाधव यांचे दि.१८/१०/२०१७ रोजी काटी, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसलयाही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १६/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसलयाही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/१०/

बोरच्या जंगलात वाघ-बिबट्यांचा दबदबा वाढला

सहा वर्षांत वाघांची घनता दुपटीहून अधिक; २.५७ वर झेप, बिबट्यांची घनताही १३.१७ वर

वर्धा/जनमाध्यम

बोरच्या जंगलात वाघांची डरकाळी आता अधिक बुलंद झाली आहे! एकेकाळी घटलेल्या वाघांच्या घनतेने गेल्या काही वर्षांत वेगाने झेप घेतली असून, अवघ्या सहा वर्षांत ती दुपटीहून अधिक वाढली आहे. २०२० मध्ये प्रति १०० चौरस किलोमीटर क्षेत्रात १.१९ असलेली वाघांची घनता २०२५ मध्ये थेट २.५७ वर पोहोचली. वाघांच्या या वाढत्या अधिवासाने बोर व्याघ्र प्रकल्पाच्या संवर्धन प्रयत्नांना मोठे यश मिळत असल्याचे चित्र समोर आले आहे. दुसरीकडे, बिबट्यांची घनताही २०२० मधील ७.३७ वरून २०२५ मध्ये १३.१७ वर पोहोचली आहे.



मध्य भारतातील महत्त्वाचा वन्यजीव कॉरिडॉर म्हणून बोर व्याघ्र प्रकल्पाची ओळख आहे. पेंच, मेळघाट आणि ताडोबा-अंधारी या व्याघ्र प्रकल्पांना जोडणाऱ्या भौगोलिक स्थानामुळे बोरचे महत्त्व अधिक आहे. त्यामुळे येथील वाघांची वाढ केवळ स्थानिक जंगलापुरती मर्यादित नसून मध्य भारतातील व्याघ्र संवर्धनाच्या दृष्टीनेही महत्त्वाची मानली जाते.

वन्यजीव विभागाच्या सूक्ष्म निरीक्षणातून वाघांच्या घनतेतील वाढीचा हा सकारात्मक आलेख पुढे आला आहे. २०२० मध्ये १.१९ असलेली घनता २०२१ मध्ये १.१० वर घसरली होती. मात्र, त्यानंतर वाघांच्या संख्यात्मक उपस्थितीत सातत्याने वाढ नोंदविण्यात आली. २०२२ मध्ये १.५४, २०२३ मध्ये १.७७, २०२४ मध्ये २.३१ आणि २०२५ मध्ये २.५७ अशी ही वाढ झाली. म्हणजेच सहा वर्षांत वाघांच्या घनतेत दुपटीपेक्षाही अधिक वाढ झाली आहे. बिबट्यांच्या बाबतीतही बोरचे जंगल समृद्ध होत



असल्याचे आकडेवारीतून दिसते. २०२० मध्ये ७.३७ असलेली घनता २०२१ मध्ये ६.६८ वर आली. त्यानंतर २०२२ मध्ये ७.२९८, २०२३ मध्ये १०.४७ आणि २०२४ मध्ये तब्बल १५.७९ वर पोहोचली. २०२५ मध्ये ती काहीशी कमी होऊन १३.१७ झाली असली, तरी सहा वर्षांपूर्वीच्या तुलनेत ती लक्षणीयरीत्या अधिक आहे.

वाघ-बिबट्यांच्या वाढत्या उपस्थितीसोबतच तृणभक्षी प्राण्यांच्या संख्येतील चढ-उतारही वन्यजीव व्यवस्थापनासाठी महत्त्वाचे ठरत आहेत. जंगलातील अन्नसाखळी, पाणवठे आणि नैसर्गिक अधिवासाचे संरक्षण यावरच या वन्यजीवविश्वाचे संतुलन अवलंबून आहे. सध्या बोरच्या कोअर आणि बफर क्षेत्रात सफारीसाठी पर्यटकांचीही मोठी गर्दी होत आहे. वाघांच्या वाढत्या घनतेमुळे बोरचे जंगल पुन्हा एकदा वन्यजीवप्रेमींच्या आकर्षणाचे केंद्र ठरत आहे.

भाऊबीजेची भेट नव्हे, संकटग्रस्तांच्या डोळ्यांतील अश्रू पुसण्याचा प्रयत्न

एकनाथ शिंदेंकडून शेतकरी कुटुंबांना मदतीचा हात

आर्वी/जनमाध्यम

शेतात राबणाऱ्या हातांवर संकटाचे सावट, घरात आर्थिक विवंचना आणि सणासुदीच्या दिवसांत चुलीची चिंता अशा परिस्थितीत भाऊबीजेच्या निमित्ताने संकटग्रस्त शेतकरी कुटुंबांसह गोरगरीबांच्या मदतीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे धावून आले. सणाचा आनंद केवळ घरांपुरता मर्यादित न राहता गरजूंच्या घरातही दिवाळीचा दिवा उजळावा, या भावनेतून वर्धा जिल्ह्यात हजारो शिधा किट पाठविण्यात आल्या.



आर्वी येथील गुरुनानक धर्मशाळेत शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रशांत शहागडकर आणि उपजिल्हाप्रमुख दशरथ जाधव यांच्या हस्ते ५०० हून अधिक गरजू महिला, पुरुष, शेतकरी व शेतमजुरांना शिधा किटचे वितरण करण्यात आले. या उपक्रमासाठी पूर्व विदर्भ संपर्कप्रमुख तथा प्रवक्त्या आमदार मनीषाताई कायंदे आणि संपर्कप्रमुख राज दीक्षित यांनी पुढाकार घेतला.

विशेष म्हणजे आ.मनीषा कायंदे यांनी भ्रमणध्वनीवरून उपस्थितांशी थेट संवाद साधत दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. प्रशांत शहागडकर यांनी ही मदत म्हणजे भाऊबीजेची आपुलकीची भेट असल्याचे सांगितले.दशरथ जाधव यांनी शिवसेनेच्या सामाजिक बांधिलकीचा उल्लेख केला.या उपक्रमामुळे आर्थिक संकटात असलेल्या अनेक कुटुंबांच्या सणाला आधार मिळाला. राजकारणाच्या पलीकडे जाऊन गरजूंच्या दुःखात सहभागी होण्याचा हा प्रयत्न ठरला.

मातीशी नाळ जोडणारा कुंभार समाज आजही उपेक्षित

आरक्षणासाठी राज्यव्यापी आंदोलनाचा एल्गार

आळेफाटा (पुणे)/जनमाध्यम

शतकानुशतके मातीशी नाळ जोडून समाजाच्या गरजा भागविणारा कुंभार समाज आजही आपल्या हक्कांसाठी शासनदरबारी संघर्ष करीत आहे. पारंपरिक मातीकलेला राजाश्रय नाही, व्यवसायाला आधार नाही आणि आरक्षणाचा प्रश्नही प्रलंबित आहे. आता आश्वासनांच्या पलीकडे जाऊन हक्क मिळविण्यासाठी महाराष्ट्रातील ३६ जिल्हे आणि ३७२ तालुक्यांतील संघटनात्मक ताकद उभी करून राज्यव्यापी आंदोलन छेडू, असा निर्धार सकल कुंभार समाज विकास परिषदेचे प्रदेशाध्यक्ष संजय गाते यांनी व्यक्त केला.



आळेफाटा येथील हॉटेल ज्ञानेश्वरीमध्ये आयोजित राज्यव्यापी बैठकीत ते बोलत होते. श्री संत शिरोमणी गोरोबा काका मातीकला बोर्डाची २०१८ मध्ये घोषणा होऊनही प्रत्यक्ष स्थापना झालेली नाही. त्यासाठी घोषित ५० लाखांचा निधीही अद्याप मिळालेला नाही. दुसरीकडे २०१९ च्या राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख झालेला आरक्षणाचा प्रश्नही प्रलंबित आहे. या दोन्ही मागण्यांसह तेर येथील संत गोरोबा काकांच्या जन्मभूमी व समाधीस्थळाचा तीर्थक्षेत्र आराखड्यानुसार विकास करण्याची मागणी करण्यात आली.

महसूल विभागाच्या २०२५ च्या परिपत्रकातील जाचक अटी दूर करून नव्याने शासन निर्णय निर्गमित झाल्याचे बैठकीत स्वागत करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानण्यात आले.प्रदेश सरचिटणीस सुभाष तेटवार यांनी गावपातळीपर्यंत संघटन मजबूत करण्याचे आवाहन केले. ॲड. संजय रुईकर यांनी भटक्या जमातींच्या आरक्षणासाठी स्वतंत्र अभ्यास समितीची मागणी केली. बैठकीत नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्याही जाहीर करण्यात आल्या. घोषणांवर नव्हे, कृतीवर भर मातीकला बोर्ड, आरक्षण आणि तीर्थक्षेत्र विकास या तीन मागण्यांसाठी शासनाला निवेदन देऊन आंदोलनाची दिशा निश्चित करण्यात येणार असल्याचे गाते यांनी स्पष्ट केले.

फळविक्रेत्याकडे दहा हजारांच्या हप्त्याची मागणी

वर्धा- दुकान चालवायचे असेल तर दरमहा दहा हजार रुपये हप्ता द्यावा लागेल, अशी धमकी देत फळविक्रेत्याला मारहाण करून चाकूचा धाक दाखवत लुटल्याची घटना इतवारा बाजार परिसरात घडली. याप्रकरणी शहर पोलिसांनी सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून काही संशयितांना अटक करण्यात आली आहे.शिवम राजेश दुबे (२७, रा. महादेवपुरा, वर्धा) हे १५ नोव्हेंबर रोजी दुपारी ३.२७ वाजता इतवारा बाजारातील फळाचे दुकान उघडण्यासाठी गेले होते. यावेळी पांढऱ्या रंगाच्या चारचाकी वाहनातून अमोल गेडाम, दादू भगत, सनी सुरजुसे, सुजल पाटील व अन्य व्यक्ती तेथे आल्या. दुकान चालवायचे असेल तर दरमहा दहा हजार रुपये हप्ता द्यावा लागेल, अशी मागणी अमोल गेडाम याने केली. त्यानंतर टोळक्याने शिवम यांना मारहाण करीत बाजूच्या गल्लीत नेले. सनी सुरजुसे याने कमरेतील चाकू पोटाला लावून जीवे मारण्याची धमकी दिली. यावेळी सोन्याची अंगठी आणि दोन हजार २०० रुपये रोख असा ऐवज हिसकावून घेतला. पुन्हा पोलिसांत गेल्यास परिणाम भोगावे लागतील, अशी धमकी देत आरोपी पसार झाले. शहर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

आधी पाणी वाचवा, मग रेती उपसा! दुष्काळात रेतीघाटांचे लिलाव थांबवा

तहानलेल्या नद्या पोखरू नका; शेतकरी, पशुधन आणि नागरिकांच्या पाणीहक्कासाठी आशीष गोस्वामी यांची शासनाकडे भावनिक साद

वर्धा/जनमाध्यम

एका बाजूला दुष्काळाचे सावट, दुसरीकडे पिण्याच्या पाण्यासाठी सुरू असलेली धडपड आणि अशा परिस्थितीत नदीपात्रातील रेतीउपशाची तयारी! महसुलाच्या हव्यासापोटी नैसर्गिक जलस्रोतांवर घाला घालू नका. बांधकामासाठी रेतीला पर्याय शोधता येईल; मात्र नष्ट झालेल्या जलस्रोतांना पर्याय निर्माण करता येणार नाही. त्यामुळे यंदा दुष्काळग्रस्त जिल्ह्यांमध्ये रेतीघाटांचे लिलाव करू नयेत आणि नदीपात्रातील वाळूउपशाला पूर्णतः स्थगिती द्यावी, अशी आर्त मागणी करुणाश्रम वन्यजीव बचाव व पुनर्वसन केंद्राचे आशीष गोस्वामी यांनी केली आहे.



यंदाच्या नैसर्गिक आपत्ती आणि भीषण पाणीटंचाईची परिस्थिती लक्षात घेता नदी, पाणी आणि पर्यावरणाचे संरक्षण करणे काळाची गरज बनली आहे. नदीपात्रातील वाळूउपशामुळे नैसर्गिक जलस्रोतांवर परिणाम होण्याची शक्यता असताना दुष्काळग्रस्त भागात रेतीघाटांचे लिलाव घेणे कितपत योग्य, असा प्रश्न गोस्वामी यांनी उपस्थित केला आहे.

महसुलापेक्षा माणसाचा पाणीहक्क मोठा

वाळू बांधकामासाठी आवश्यक असली तरी पाणी प्रत्येक सजीवाच्या अस्तित्वाचा आधार आहे. शेतकऱ्यांना पिकांसाठी, जनावरांना पिण्यासाठी आणि नागरिकांना दैनंदिन वापरासाठी पाणी मिळणे ही प्राथमिक गरज आहे. पाण्याअभावी शेती संकटात असताना नदीपात्रातील नैसर्गिक संपत्तीचा व्यावसायिक वापर करण्याऐवजी जलस्रोतांचे संरक्षण करण्याला शासनाने प्राधान्य द्यावे, असे त्यांनी म्हटले आहे.

या मागणीसाठी राज्यातील संबंधित मंत्री, जिल्हा प्रशासन आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे साकडे घालण्यात आले आहे. रेतीघाटांचे लिलाव थांबवून दुष्काळग्रस्त भागातील नद्यांचे संवर्धन करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

रेती व्यावसायिकांच्या विरोधात हा मुद्दा नसून शेतकरी, सामान्य नागरिक, पशुधन, पर्यावरण आणि भावी पिढ्यांच्या पाणीहक्काचा हा प्रश्न आहे. आज जलस्रोतांचे संरक्षण केले नाही, तर उद्या पाण्यासाठी संघर्ष करण्याची वेळ येईल. त्यामुळे 'नदी वाचवा, पाणी वाचवा' हा केवळ नारा न राहता शासनाने त्याची अंमलबजावणी करावी, अशी ठाम भूमिका आशीष गोस्वामी यांनी मांडली आहे.

बिरसा मुंडांच्या संघर्षातून भावी पिढ्यांना प्रेरणा

आ.कुणावार यांचे अभिवादन



हिंगणघाट/जनमाध्यम

आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी आणि स्वाभिमानासाठी ऐतिहासिक लढा उभारणारे महान क्रांतिकारक भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त आ.समीर कुणावार यांनी हिंगणघाट येथील जनसंपर्क कार्यालयात त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

जल,जंगल आणि जमिनीच्या रक्षणासाठी भगवान बिरसा मुंडा यांनी उभारलेले ऐतिहासिक 'उलगुलान' आंदोलन भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महत्त्वपूर्ण पर्व ठरले आहे. आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी त्यांनी केलेला संघर्ष, दाखवलेले असामान्य शौर्य आणि दिलेला त्याग आजही समाजाला प्रेरणा देणारा आहे.

त्यांचे राष्ट्रप्रेम आणि सामाजिक समर्पण भावी पिढ्यांसाठी आदर्शवत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

या निमित्ताने आ.कुणावार यांनी समस्त आदिवासी बांधवांना जनजातीय गौरव दिनाच्या शुभेच्छा दिल्या. भगवान बिरसा मुंडा यांच्या विचारांचा आणि संघर्षाचा वारसा जपण्याचे आवाहनही करण्यात आले.

आईच्या उत्तरक्रियेसाठी दोन दिवसांची सुट्टी घेताच शिक्षिकेला प्रशिक्षणातून डच्चू

वरिष्ठ वेतनश्रेणी प्रशिक्षणाच्या कठोर नियमांवर शिक्षक समितीचा आक्षेप

वर्धा/जनमाध्यम

वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी आयोजित दहा दिवसीय प्रशिक्षणातील उपस्थितीच्या कठोर नियमांमुळे शिक्षकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. जवळच्या नातेवाइकांचे निधन, आजारपण अथवा अन्य अपरिहार्य कारणांमुळे प्रशिक्षणाला अनुपस्थित राहिल्यास संबंधित शिक्षकांना प्रशिक्षणातून वगळले जात असल्याचा आक्षेप महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने नोंदविला आहे. या नियमांमध्ये मानवी दृष्टिकोनातून सुधारणा करण्याची मागणी समितीने राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक डॉ. मंगेश जोशी यांच्याकडे केली आहे.

ठाणे जिल्ह्यातील कल्याण येथील बिर्ला महाविद्यालयात सुरू असलेल्या प्रशिक्षणादरम्यान हा प्रकार घडला.एका प्राथमिक शिक्षिकेच्या आईचे ३ नोव्हेंबरला निधन झाले. आईचे दहावे झाल्यानंतरही त्या १३ नोव्हेंबरला प्रशिक्षणाला उपस्थित राहिल्या. मात्र,आईच्या उत्तरक्रियेसाठी १४ व १५ नोव्हेंबर रोजी दोन दिवसांची रीतसर पूर्वपरवानगी मागून अनुपस्थित राहिल्याने त्यांचे नाव उपस्थिती पत्रकातून वगळण्यात आले. परिणामी त्यांना प्रशिक्षणापासून वंचित राहावे लागले असून, पुन्हा शुल्क भरून नोंदणी करावी लागण्याची शक्यता आहे.

दहा दिवसांच्या प्रशिक्षणासाठी शिक्षकांकडून दोन हजार रुपये शुल्क घेतले जाते. सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत प्रशिक्षण घेताना चहा-नाश्त्याचीही व्यवस्था नसल्याचा समितीचा आरोप आहे. दहा मिनिटे उशीर झाल्यासही प्रशिक्षणातून वगळण्याच्या नियमावर समितीने प्रश्न उपस्थित केले आहेत.

अपरिहार्य कारणांसाठी उपस्थितीची सवलत देणारी तरतूद करावी आणि प्रशिक्षण नियमावलीचा पुनर्विचार करावा, अशी मागणी समितीने केली आहे.

सिंदी रेल्वेत आजपासून भागवत कथेची पर्वणा;त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त आठवडाभर धार्मिक कार्यक्रमं

भक्तिरसाचा सुरेल सोहळा!

सिंदी रेल्वे/जनमाध्यम

भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्माचा संगम घडविणाऱ्या संगीतमय श्रीमद् भागवत कथा सप्ताहाने सिंदी रेल्वे शहरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. त्रिपुरारी पौर्णिमा उत्सवानिमित्त राजेंद्र वॉर्ड क्रमांक ३ येथील श्री बजरंगबली (वानरदेव) व्यवस्थापन समितीच्या वतीने १७ ते २४ नोव्हेंबरदरम्यान या धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. भागवत कथेचे श्रवण, हरिपाठ आणि भजनांच्या सुरेल मेजवानीतून भाविकांना आध्यात्मिक आनंदाची अनुभूती घेता येणार आहे.

या सप्ताहात वर्धा येथील ह.भ.प. गणेश महाराज ढासरे भागवताचार्य म्हणून उपस्थित राहून श्रीमद् भागवत कथेचे निरूपण करणार आहेत. दररोज सकाळी ९ ते दुपारी १२ वाजेपर्यंत भागवत कथा, तर सायंकाळी ५ ते ७ या वेळेत हरिपाठ होणार आहे. त्यामुळे आठवडाभर परिसरात भक्तिरसाची अनुभूती अनुभवायला मिळणार आहे. या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे शनिवार, २१ नोव्हेंबर रोजी आयोजित भजनसंध्या. सायंकाळी ७ ते रात्री १० वाजेपर्यंत भजनसम्राट ह.भ.प. गणेश महाराज शिंदे आपल्या भजनसेवेने भाविकांना मंत्रमुग्ध करणार आहेत. त्यांना तबल्यावर श्रेयस महाराज, पॅडवर निखिल महाराज, ऑर्गन व गायनात सुरेश महाराज, तर गायनाची साथ सचिन महाराज देणार आहेत.मंगळवार, २४ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत भागवत कथा सप्ताहाची सांगता होणार आहे. यानिमित्त सायंकाळी ७ ते रात्री १० वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

श्रवणातून भक्तीचा आनंद आणि भजनातून अध्यात्माची अनुभूती देणाऱ्या या धार्मिक सोहळ्याचा सिंदी रेल्वेसह परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन श्री बजरंगबली (वानरदेव) व्यवस्थापन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

कापसाच्या पहिल्याच मुहूर्ताला ९३६१ रुपयांचा भाव

सिंदी रेल्वे बाजारपेठेत खरेदीचा श्रीगणेशा; शेतकऱ्यांचा सन्मान, बाजारपेठेला गतवैभव मिळवून देण्याचे आव्हान

सिंदी रेल्वे/जनमाध्यम

कापसाच्या बाजारपेठेत यंदा पहिल्याच मुहूर्ताला दराची जोरदार सलामी मिळाली आहे. विदर्भातील प्रख्यात कापूस मंडी म्हणून ओळख असलेल्या सिंदी रेल्वे येथे हंगामातील कापूस खरेदीचा शुभारंभ रविवारी उत्साहात झाला. मुहूर्ताच्या सर्वच गाडीला प्रतिक्विंटल ९ हजार ३६१ रुपयांचा सर्वोच्च दर मिळाल्याने कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या आशा उंचावल्या आहेत. मात्र, एकेकाळी चार जिनिंग आणि दोन प्रेसिंग मिलच्या गजबजाटाने फुललेली ही बाजारपेठ आज केवळ एका जिनिंग-प्रेसिंग मिलवर आल्याने बाजारपेठेला गतवैभव मिळवून देण्याचे मोठे आव्हान कायम आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातील वासुदेव प्रेसिंग फॅक्टरी येथे रविवारी सकाळी ११ वाजता काटापूजन करून खरेदीचा शुभारंभ करण्यात आला. बाजार समितीचे सभापती केसरीचंद खंगार आणि माजी सभापती बबनराव हिंगणेकर यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी देवळीचे उद्योजक मोहनबाबू अग्रवाल यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुहूर्ताची कापूस खरेदी



तुमसर येथील खरेदीदार आदेश सराफ, संकेत सराफ तसेच देवळीचे महेश अग्रवाल, दिनेश अग्रवाल आणि अमन अग्रवाल यांच्या आदेश एंटरप्रायझेसच्या वतीने करण्यात आली. यावेळी कापूस उत्पादक शेतकरी रामजी गोल्हर यांचा शाल, श्रीफळ आणि शगुन राशी देऊन सन्मान करण्यात आला. पहिल्याच दिवशी मिळालेल्या चांगल्या दरामुळे बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण होते.

एकेकाळी सिंदी रेल्वेची कापूस बाजारपेठ विदर्भात नावाजलेली होती. चार जिनिंग आणि दोन प्रेसिंग मिलमुळे येथे मोठी आर्थिक उलाढाल होत होती. मात्र, काळाच्या ओघात ही परिस्थिती बदलली. सध्या केवळ एकच जिनिंग-प्रेसिंग मिल सुरू असल्याने कापूस खरेदीची व्याप्ती आणि बाजारपेठेची उलाढाल मर्यादित झाली आहे. बाहेरील व्यापाऱ्यांची अपेक्षित उपस्थिती नसल्याने परिसरातील शेतकऱ्यांना कापूस विक्रीसाठी कांडळी, हिंगणघाट आणि सेलू येथील बाजारपेठांचा रस्ता धरावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर सिंदी रेल्वेच्या बाजारपेठेत पुन्हा व्यापाऱ्यांची रेलचेल वाढावी आणि स्थानिक शेतकऱ्यांना जवळच कापूस विक्रीची सुविधा मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. सभापती केसरीचंद खंगार यांनी परिसरातील कापूस उत्पादकांनी आपला कापूस सिंदी रेल्वे बाजारपेठेत विक्रीसाठी आणावा, असे आवाहन केले. यावेळी राधेश्याम पाटोदिया, जयरामदास पाटोदिया, ओमप्रकाश राठी, उद्योजक राजेश सेठिया, बजरंग अग्रवाल, ललित बेटाला, बाजार समितीचे बंडू अंबागडे यांच्यासह व्यापारी व मान्यवर उपस्थित होते.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ३४९
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

प्रशासक नियुक्त ग्रामपंचायतींचा कारभार वाऱ्यावर!

-प्रशासक आणि ग्रामसेवक गावाकडे फिरकेनात

नागरिकांच्या समस्यांकडे दुर्लक्ष?ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी

युवराज डोंगरे/खल्लारः-

दर्यापूर तालुक्यात ज्या ग्रामपंचायतींवर प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या ग्रामपंचायतींचा कारभार सध्या रामभरोसे सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. अनेक दिवसांपासून संबंधित प्रशासक अधिकारी गावात भेट देत नसल्याचा आरोप आता ग्रामस्थांकडून करण्यात येत असून, ग्रामसेवकही गावाकडे पाठ फिरवित असल्याने नागरिकांच्या अडचणी वाढत चालल्या आहेत.

सध्या दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झालेली असताना गावागावांमध्ये पाणीटंचाईसह विविध मूलभूत समस्या गंभीर बनत आहेत. मात्र, या समस्यांची प्रत्यक्ष पाहणी करून नागरिकांच्या अडचणी जाणून घेण्याची जबाबदारी असलेले प्रशासक आणि ग्रामसेवकच गावात येत नसतील, तर ग्रामस्थांनी आपल्या समस्या मांडाव्यात तरी कुणाकडे? असा संतप्त प्रश्न उपस्थित केला जात आहे.विशेष म्हणजे, प्रशासकांची नियुक्ती झाल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी गावाला भेट देऊन ग्रामपंचायतीचा कारभार, प्रलंबित विकासकामे, पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते तसेच इतर नागरी सुविधांचा आढावा घेणे अपेक्षित आहे. परंतु अनेक ठिकाणी अद्याप ग्रामसभा घेण्यात आलेल्या नसल्याने गावातील प्रलंबित प्रश्न, विकासकामांची सद्यस्थिती आणि नागरिकांच्या मागण्या प्रशासनापर्यंत पोहोचत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. ग्रामसभा होत नसल्यामुळे गावात कोणती कामे अपूर्ण आहेत, कोणत्या कामांना प्राधान्य देण्याची गरज आहे आणि शासनाच्या कोणत्या योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचलेला नाही, याची माहिती ग्रामस्थांना मिळणार तरी कशी? असा प्रश्नही उपस्थित होत आहे.यापूर्वी प्रशासनाकडे तक्रारी आणि समस्या मांडूनही त्यावर ठोस कार्यवाही होत नसल्याची ग्रामस्थांची भावना आहे. संबंधित प्रशासक अधिकारी आणि ग्रामसेवक यांच्या कामकाजावर वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नियंत्रण आहे की नाही.तसेच कर्तव्यात कसूर होत असल्यास त्यांच्यावर कारवाई का केली जात नाही. असा सवाल नागरिकांकडून विचारला जात आहे. गावातील नागरिकांशी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वागणुकीतही बदल झाल्याची भावनाही ग्रामस्थाकडून व्यक्त व्यक्त होत आहे.

लोकशाही व्यवस्थेत ग्रामस्थांच्या प्रश्नांना प्राधान्य मिळणे आवश्यक असताना प्रशासनाच्या या उदासीनतेमुळे ग्रामिण भागातील नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.दर्यापूर तालुक्यातील प्रशासक नियुक्त ग्रामपंचायतींच्या कामकाजाची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने चौकशी करावी, संबंधित प्रशासक व ग्रामसेवकांना गावभेटी अनिवार्य कराव्यात, प्रलंबित ग्रामसभा घेऊन नागरिकांच्या समस्या जाणून घ्याव्यात आणि पाणीटंचाईसह इतर मूलभूत प्रश्न तातडीने सोडवावेत, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. एकीकडे ग्रामिण भागात दुष्काळी परिस्थिती आणि दुसरीकडे प्रशासनाची उदासीनता, अशा दुहेरी संकटात गावकऱ्यांनी जगायचे तरी कसे? त्यामुळे शासनाने शक्य तितक्या लवकर ग्रामपंचायतींच्या निवडणुका घ्याव्यात किंवा तोपर्यंत प्रशासकीय यंत्रणा सक्षमपणे कार्यरत ठेवून नागरिकांना न्याय द्यावा, अशी जोरदार मागणी आता पुढे येत आहे.

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.आर.आर.खामतकर,३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२२३५/२०२६

जाहीरनामा/सायटेशन — **नारायणदास अधिक पाच -वि- निरंक**

पुढील ता.२६.११.२०२६

अर्जदार :
1. Narayandas Jagannath Lahoti, Age 86 Yrs. Occu.: Business R/o 25, Near Hanuman Mandir, Shankar Nagar, Amravati.
2. Sanjay Narayandas Lahoti, Age 59 Yrs. Occu.: Retired R/o A-11, Aryasmruti CHS Ramchandra Nagar, Dombivalli East, Kalyan, Dist. Thane
3. Ajay Narayandas Lahoti, Age 56 Yrs. Occu.: Business R/o 25, Near Hanuman Mandir, Shankar Nagar, Amravati.
4. Priti Lalitkumar Kabra (Before Marriage Priti D/o Narayandas Lahoti) Age 63 Yrs. Occu.: Household R/o Kabra Hospital, Jasnagara Hotel, Near Railway Station, Ramdaspeth, Akola, Tq. Dist. Akola
5. Chhaya Manoj Maheshwari (Before Marriage Chhaya D/o Narayandas Lahoti) Age 61 Yrs. Occu.: Household R/o Sham Machinery Stores, Main Road, Mantha, Jalna-431504
6. Ekata Sandip Panpalia (Before Marriage Ekata D/o Narayandas Lahoti) Aged about 57 Yrs. Occu.: Household R/o Sharda Nagar, V.T.C. wARDHA-442001

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Shanta Alias Shantabai Alias Shantadevi Narayandas Lahoti हे दिनांक 05.04.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Narayandas Jagannath Lahoti + 5 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Narayandas Jagannath Lahoti + 5 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२६.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

क्र.२९
विक्रीचा जाहीरनामा (ऑर्डर २१, नियम ६६)
अमरावती येथील वि.५ वे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) यांचे न्यायालयात
ठिकाण - अमरावती, दिनांक १८.१२.२०२६
(नमुना क्र.२९, परिशिष्ट ई, अनुसूची-१)
दिवाणी दावा क्र.Spl.D सन ६०/२०२५
अर्ज क्र. सन २०

प्रविण नथ्थुजी देशमुख
द्वारा- शशिकांत खंडार, प्लॉट नं.७४, गगलानी नगर, वडाळी नाका, अमरावती — **वादी**

निलेश भगवंतराव भस्मे,
मु.पो.शिराळा, ता.जि.अमरावती — **प्रतिवादी**

यादारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, समासात नमुद केलेल्या दाव्यामधील हुकूमनामा धारकाची मागणी पूर्ण करण्याकरीता, या न्यायालयाने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, ऑर्डर २१, नियम ६४ अन्वये सोबतच्या अनुसूचीत नमुद केलेल्या जप्त मालमत्तेची विक्री करण्याचा आदेश दिला असून, दाव्याचा खर्च व विक्रीच्या दिनांकापर्यंतचे व्याज यासह ती मागणी ३५,००,०००/- इतक्या रुपयांशे आहे.

ई.सन २०१९ Spl.CS चा दावा क्र.७६ या दाव्यात प्रविण देशमुख हा वादी असून निलेश भस्मे हा प्रतिवादी होता. या दाव्याचा न्यायनिर्णय अमरावती येथील ७ वे दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) न्यायाधीशांनी दिला आहे.

ही विक्री जाहीर लिलावाद्वारे करण्यात येईल आणि ती मालमत्ता अनुसूचित निर्दिष्ट केल्याप्रमाणे **लाटस** विक्रीसाठी मांडण्यात येईल. उपरोक्त दाव्यातील न्यायनिर्णित ऋणकोची जी मालमत्ता पुढील अनुसूचीमध्ये नमुद करण्यात आली आहे, त्या मालमत्तेची विक्री केली जाईल आणि उक्त मालमत्तेशी संलग्न असलेली दायित्वे व तत्संबंधी मागण्या ज्या मर्यादिपर्यंत निश्चित करण्यात आल्या आहेत त्या मर्यादेपर्यंत त्या गोष्टी अनुसूचित प्रत्येक **लाटास** निर्देशित केल्या जाईल.

ही विक्री पुढे ढकलण्यासंबंधी कोणताही आदेश झाला नसल्यास, ती विक्री अमरावती येथे दिनांक १९.१२.२०२६ रोजी १०.३० वाजता होणाऱ्या मासिक विक्रीच्या वेळी दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) अमरावती यांच्यामार्फत केली जाईल. तथा कोणत्याही लाटाबाबतची बोली मंजूर होण्यापुर्वी जर उपरोक्त ऋणांची आणि विक्रीच्या खर्चाची रक्कम देऊ करण्यास भरण्यात आली, तर ती विक्री बंद करण्यात येईल.

विक्रीच्या वेळी आम जनतेपैकी कोणालाही, व्यक्तिशः किंवा रितसर अधिकृत केलेल्या एजंटामार्फत बोली बोलण्याची मुभा राहील. तथापि, उपरोक्त दाव्यातील न्यायनिर्णित धनकोंनी किंवा त्यांच्या वतीने बोललेली बोली स्विकारली जाणार नाही. तसेच न्यायालयाने यापुर्वी स्पष्टपणे परवानगी दिलेली असल्याखेरीज, त्या धनकोंना केलेली कोणतीही विधीग्राह्य (व्हॅलिड) ठरणार नाही. विक्रीच्या आणखी काही शर्ती पुढीलप्रमाणे आहेत.

विक्रीच्या शर्ती-

१. खालील अनुसूचित नमुद केलेला तपशील हा न्यायालयाला असलेल्या अद्ययावत माहितीनुसार नमुद केलेला आहे. परंतु या जाहीरनाम्यात काही चूक असल्यास, चुकीचे विधान असल्यास किंवा एखादी गोष्ट गाळली गेली असल्यास त्याबाबत न्यायालय जबाबदार राहणार नाही.

२. दरवेळी बोली किती रकमेने वाढवावयाची हे विक्रीचे कामकाज पाहणारा अधिकारी ठरवील. बोलीच्या रकमेबाबत किंवा बोलीदाराबाबत वाद निर्माण झाला तर तो लाट ताबडतोब पुन्हा लिलावासाठी मांडला जाईल.

३. सर्वाधिक बोली बोलणाऱ्या बोलीदारास त्या लाटाचा खरेदीदार म्हणून घोषित केले जाईल. मात्र, तो बोलीदार बोली बोलण्यास कायदेशीरपणे पात्र असला पाहिजे, आणि तसेच, सर्वाधिक बोलीमध्ये देऊ केलेली किंमत अत्यंत अपुरी असल्याचे स्पष्ट दिसून आल्याने ती बोली नाकारणे इष्ट ठरेल असे न्यायालयास किंवा विक्रीचे कामकाज पाहणाऱ्या अधिकाऱ्यास वाटल्यास, न्यायालय किंवा असा अधिकारी स्वविवेकानुसार ती बोली स्विकारण्यास नकार देऊ शकेल.

४. विक्रीचे कामकाज पाहणारा अधिकारी स्वविवेकानुसार आणि कारणे नमुद करुन विक्री तहकूब करु शकेल. परंतु तो अधिकार नेहमी ऑर्डर २१, नियम ६९ च्या उपबंधाच्या अधीन राहील.

५. जंगम मालमत्तेच्या बाबतीत पत्येक लाटाची किंमत विक्रीच्या वेळी हावी लागेल किंवा विक्रीचे कामकाज पाहणारा अधिकारी सांगेल त्यप्रमाणे विक्रीनंतर लवकरच भरावी लागेल, आणि अशी किंमत भरण्यास कसूर झाल्यास ती मालमत्ता पुन्हा ताबडतोब लिलाव करुन विकली जाइन.

६. स्थावर मालमत्तेच्या बाबतीत, ज्या व्यक्तीस खरेदीदार म्हणून घोषित केले जाईल, त्या व्यक्तिने, तशी घोषणा झाल्यानंतर ताबडतोब आपल्या खरेदी किंमतीच्या २५ टक्के एवढी रक्कम, विक्रीचे कामकाज पाहणाऱ्या अधिकाऱ्याकडे अनामत म्हणून भरली पाहिजे. अशारितीने रक्कम भरण्यात कसूर झाल्यास ती मालमत्ता पुन्हा ताबडतोब लिलाव करुन विकली जाईल.

७. मालमत्तेची विक्री झाल्यापासून (विक्रीचा दिवस वगळता) पंधरावा दिवशी न्यायालयाचे कामकाज बंद होण्यापूर्वी खरेदीदार खरेदी किंमतीची संपूर्ण रक्कम भरील किंवा पंधरावा दिवस हा रविवार अथवा सुटीचा दिवस असल्यास पंधरावा दिवसानंतरच्या पहिल्या कामाच्या दिवशी अशी रक्कम भरण्यात येईल.

८. खरेदी किंमतीच्या उर्वरित रक्कम नेमून दिलेल्या मुदतीच्या आत भरण्यात कसूर झाल्यास, विक्रीची नवीन अधिसूचना काढून त्या मालमत्तेची पुन्हा विक्री करण्यात येईल. अशा प्रसंगी अनामत रकमेसमूहन विक्रीचा खर्च भागविल्यानंतर जी रक्कम शिल्लक राहील ती रक्कम, न्यायालयाला उचित वाटल्यास, सरकारजमा केली जाईल आणि कसूर करणाऱ्या खरेदीदाराचे त्या मालमत्तेसंबंधीचे किंवा ती मालमत्ता मागाहून जितक्या रकमेस विकली जाईल त्या रकमेच्या कोणत्याही भागासंबंधीचे सर्व मागणीहक्क नाहीसे होतील.

आज दिनांक / /२०२६ रोजी माझ्या सहीनिशी आणि न्यायालयाची मोहोर लावून हा जाहीरनामा काढला आहे.

न्यायाधिश

धनकोतर्फे वकील श्री.शेंडे बी.एम., नि.क्र.३४ व ६८ वरील आदेशानुसार ऑर्डर २१ नियम ६६ अन्वये विक्रीचा जाहीरनामा प्रकरणात जोडलेल्या स्थावर मालाच्या यादीनुसार मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे--

मालमत्तेचे वर्णन :-

मौजे-शिराळा भाग ३ प्र. ता.जि.अमरावती शेत सर्व्हे नं.६६५, क्षेत्रफळ १ हे.२५ आर. पैकी ३१.२५ आर, भोगवटादार-१, ज्याची चतुःसिमा पुढीलप्रमाणे--

पुर्वेस - गट क्र.६६८/१ श्री.ज्ञानेश्वर नामदेवराव पेढेकर यांचे शेत, **पश्चिमेस** - गट क्र.६४८/१ श्री.पंकज केशवराव वानखडे, रेणुका शाम ठोटे, शाम ज्ञानेश्वरराव ठोटे यांचे शेत, **उत्तरेस** - गट क्र.६६६ श्री.आदर्श अरविंद गंधे, नंदकुमार लक्ष्मणराव गंधे यांचे शेत व गट क्र.६६७, रस्त्यालगतील क्षेत्र श्री.विनोद कृष्णराव गोहत्रे व श्री.संजय लव्हाळे यांचे शेत, **दक्षिणेस** - गट क्र.६६४/१ श्री.निलेश भगवंतराव भस्मे, श्री.पवन भगवंतराव भस्मे, मंगेश भगवंतराव भस्मे, भगवंतराव दशरथजी भस्मे यांचे शेत व गट क्र.६६४/२ श्री.संतोष मोतीलालजी साहू यांचे शेत व गट क्र.६७० श्री.मनोज केशवराव वानखडे यांचे शेत.

शिक्का

सहायक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, (व.स्तर), अमरावती

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ७४
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

'कॉक्रोच जनता पार्टी'च्या संघटनात्मक विस्ताराला सुरुवात!

चांदूर रेल्वे व अमरावती येथे प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक

-वेस्ट झोन समन्वयक निलाक्षी वानखेडे यांचे मार्गदर्शन

चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-

देशभरात चर्चेत आलेल्या 'कॉक्रोच जनता पार्टी'ने (सीजेपी) आता अमरावती जिल्ह्यात संघटनात्मक विस्ताराच्या दृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. याच अनुषंगाने रविवारी अमरावती आणि चांदूर रेल्वे येथे पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संघटनात्मक बैठका पार पडल्या. या बैठकांना विदर्भातील विविध भागांतील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

दिल्ली येथे कॉक्रोच जनता पार्टीच्या माध्यमातून करण्यात आलेले आंदोलन देशभर चर्चेचा विषय ठरले होते. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर चांदूर रेल्वे शहरातील काही स्वयंसेवकांनी यापूर्वीच स्थानिक स्तरावर आंदोलन केले होते. आता या स्वयंसेवकांशी समन्वय साधत अमरावती जिल्ह्यात पक्षाची संघटनात्मक बांधणी करण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे.

पक्षाच्या वेस्ट झोन समन्वयक निलाक्षी वानखेडे



यांनी बैठकीत मार्गदर्शन करतांना सध्या संघटनेचा पाया मजबूत करणे, कार्यकर्त्यांना संघटित करणे आणि जिल्ह्यात पक्षाचे जाळे विस्तारण्यावर भर दिला जात असल्याचे सांगितले. लवकरच जिल्हास्तरीय कार्यकारिणीची अधिकृत घोषणा करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. या बैठकीला राज्य समन्वयक माहीया गौरखेडे, यवतमाळ शहर प्रमुख प्रकाश भिसे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. शाळा आणि शिक्षण क्षेत्रातील विविध समस्या, विद्यार्थ्यांचे प्रश्न तसेच शैक्षणिक व्यवस्थेतील अडचणी यावर कॉक्रोच जनता पार्टीच्या माध्यमातून आक्रमकपणे आवाज उठविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी अमरावती येथील राजेश धुरंधर, सुबोध जंगम, निखिल गुजर, सूरज हजारे, सुबोध मेश्राम, विशाल खेडकर,आकाश डोंगरे , ॲड. सुयोग मामूलकर , बुद्धशील रामटेके, तेजस वानखेडे, प्रतीक गावंडे, सुकृती मेश्राम, अवंती उके, प्राची निकोसे, अर्चना वरघाट , प्रणिता चौधरी आणि आचल नवले, चांदूर रेल्वे येथील स्वप्नील डोळस, पंकज घोरपडे, ॲड. लौकिक डोंगरे, हार्दिक सोनोने, तेजस मेश्राम, अक्षय स्थूल, गौरव इंगोले, धीरज मेश्राम, यश वानखेडे, सुमित खंडारे, आदित्य वानखेडे, अश्विन रामटेके, सेजल मेंढे, कल्याणी कालमेघ, श्रेया वानखेडे आणि अलीशा धवणे आदी कार्यकर्ते उपस्थित होते. अमरावती जिल्ह्यातील संघटनात्मक बांधणीच्या माध्यमातून आगामी काळात शैक्षणिक व सामाजिक प्रश्नांवर पक्षाची भूमिका अधिक प्रभावीपणे मांडण्याच्या दृष्टीने या बैठकांना महत्त्व प्राप्त झाले आहे.

महापारेषण — **ई-निविदा सूचना**

कार्यकारी अभियंता (स्था), अकोला स्थळसंस्थिती नियंत्रण व.स.नि.नि.मा.के. गर्या अकोला यांचे कार्यालयाकडून ई.टी-०७, ई.टी-०८, ई.टी-०९ **(Rfx No: 7000042120, 7000042121 and 7000042122)** या कामांसाठी ई-निविदा पद्धतीकरिता एसआरएम्(SRM) सप्लाय मॅनेजमेंट आणि अनुषंगी व्यवस्थापन संकेतस्थळावरुन ऑनलाईन ई निविदा मागविण्यात येत आहेत. सदर ई-निविदांची विक्री दि. १७/११/२०२६ ते २६/११/२०२६ पर्यंत व स्वीकृती दि. २६/११/२०२६ या कालावधीत सायं. ५ वाजेपर्यंत उपलब्ध राहील. निविदेचे सर्व ती अद्ययावत कागदपत्रे देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. निविदा उघडण्याचा दिनांक २७/११/२०२६ शक्य असल्यास. संविदेचा तपशील व इतर माहिती करीता https://jamelender.mahatransco.in किंवा www.mahatransco.in या वेबसाईटचा वेळोवेळी पहावे.

सही/-
कार्यकारी अभियंता (स्था)
अकोला स्थळसंस्थिती नियंत्रण विभाग
म.रा.वि.पा.कं मर्या. अकोला

दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
जन्म/मृत्यू नोंदणीचा आदेश होण्याकरीता दाखल केलेल्या प्रकरणाचा जाहीरनामा

कि.फौ.अर्ज क्र.७५/२०२६ — ने.ता.०१.१२.२०२६

अर्जदार : सतीश वासुदेवराव पकडे
वय ३५ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा.वार्ड नं.४ नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

---- विरुध्द ---

गैरअर्जदार ग्रामपंचायत कार्यालय जळू मार्फत सचिव तथा जन्म मृत्यू अधिकारी नगरपंचायत कार्यालय नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

ज्याअर्थी अर्जदार नामे **सतीश वासुदेवराव पकडे** यांचा मृत्यू दिनांक **०५.०६.१९८९** रोजी नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. अर्जदार नामे **सतीश वासुदेवराव पकडे** यांच्या मृत्यूची नोंद जन्म मृत्यू निबंधक, नगरपंचायत नांदगाव खंडेश्वर ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती यांचे जन्म व मृत्यू रजिस्टरमध्ये करण्यात आली नाही. करीता उपरोक्त अर्जदाराने त्यांची जन्माची नोंद **जन्म मृत्यू अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अ** अन्वये मृत्यूची नोंद घेण्याबाबत आदेश होण्याकरीता वि.दिवाणी व फौजदारी न्यायालय, नांदगांव खंडेश्वर येथील न्यायालयात दिनांक **१४.१०.२०२६** रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी उपरोक्त अर्जावर ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी दिनांक **२७.०३.२०२०** रोजी सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **०२.११.२०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

जाहीरनामा/सायटेशन नोटीस
वि.ए.बी.कट्टे साहेब न्यायदंडाधिकारी प्र.श्रे. जि.अमरावती यांच्या न्यायालयात (कोर्ट नं.०१)
कि.कि.अर्ज क्रमांक १२८५/२०२६

अर्जदार : रवि सुखदेव झांझोटे
वय ४९ वर्षे,
रा.सुशिल नगर, अमरावती, ता.जि. अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदारः मा.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी, महानगरपालिका, अमरावती, ता. जि.अमरावती

ज्याअर्थी यातील अर्जदाराने मा.कोर्ट नं.०१ मध्ये जन्म व मृत्यूची नोंदणी अधिनियम १९६६ चे कलम १३(३)(अ) प्रमाणे यातील अर्जदार **नामे रवि सुखदेव झांझोटे** यांनी **विजयश्री रवि झांझोटे** यांच्या जन्माची नोंद दिनांक **०४.०२.२००९** रोजी झाली आहे. अशी नोंद करण्याचा हुकूम होणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जाबाबत कोणाची काही तकार अगर हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द केल्यापासून ३० दिवसांच्या आत आपण आपल्या वकीलामार्फत अगर स्वतः मा.कोर्ट नं.०१ यांनी नेमलेल्या तारखेपासून म्हणजेच दिनांक १५.१२.२०२६ रोजी अगर त्यापुर्वी हजर होऊन आपले म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणाचीही तकार न आल्यास मा.कोर्ट नं.०१ योग्य तो हुकूम काढतील याची नोंद घ्यावी.

शिक्का

आदेशानुसार
सह दिवाणी न्यायालय,
कनिष्ठ स्तर, अमरावती

दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
जन्म/मृत्यू नोंदणीचा आदेश होण्याकरीता दाखल केलेल्या प्रकरणाचा जाहीरनामा

कि.फौ.अर्ज क्र.७४/२०२६ — ने.ता.०१.१२.२०२६

अर्जदार : मंगेश नामदेवराव डोंगरे
वय ५० वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.अडगांव खुर्द, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

---- विरुध्द ---

गैरअर्जदार ग्रामपंचायत कार्यालय जळू मार्फत सचिव तथा जन्म मृत्यू अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय जळू ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

ज्याअर्थी अर्जदार नामे **मंगेश नामदेवराव डोंगरे**, यांची आई मयत **सखवार नामदेव डोंगरे** यांचा मृत्यू दिनांक **२६.१२.२०२३** रोजी अडगांव खुर्द, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. अर्जदार यांची आई **मयत सखवार नामदेव डोगरे** यांच्या मृत्यूची नोंद जन्म मृत्यू निबंधक, ग्रामपंचायत जळू, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती यांचे जन्म व मृत्यू रजिस्टरमये करण्यात आली नसल्यामुळे जन्म मृत्यू अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अ अन्वये मृत्यूची नोंद घेण्याबाबत आदेश होण्याकरीता वि.दिवाणी व फौजदारी न्यायालय, नांदगांव खंडेश्वर येथील न्यायालयात दिनांक १४.१०.२०२६ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी उपरोक्त अर्जावर ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी दिनांक २७.०३.२०२० रोजी सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक**२०.१०.२०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

-जाहीर नोटीस-

वि.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) व न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.चांदूर बाजार, जि. अमरावती
इतर कि.फौ.प्रकरण क्र.४०४/२०२६ — **ने.ता.१६/१२/२०२३**

अर्जदार - **अनंत बाबुराव पाथरे**
वय ४८ वर्षे, धंदा-शेती
रा.जवळा शहापूर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

गैरअर्जदार - **निबंधक,**
ग्रामपंचायत कार्यालय, जवळा शहापूर
ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३ (३) अ अन्वये जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, जवळा शहापूर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे होण्याबाबत

ज्या अर्थी उपरोक्त अर्जदारचे आजोबा **रामराव नथ्थुजी पाथरे मृत्यूची** नोंद घेण्याकरिता अर्ज जन्म- मृत्यू नोंदणी अधिनियम १३ (३) आणि जन्म-मृत्यू नोंदणी नोंदणी कायदा १९६९ प्रमाणे अर्ज दाखल केला आहे.त्या अर्जात असे नमुद केले आहे की, अर्जदारचे वडिल **रामराव नथ्थुजी पाथरे यांच्या मृत्युची दि.०८.०८.१९७८ रोजी मौजा जवळा शहापुर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** येथे झाला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसाचे आंत न्यायालयाच्या कामकाजाच्या दिवशी ठिक सकाळी १०.३० वाजता आपला आक्षेप स्वतः किंवा निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर राहून नोंदवावा त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही.

आज दि.०७/११/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

दिनांक - ०७/११/२०२६

शिक्का

आदेशानुसार
सही/-
(सहायक अधिक्षक)
दिवाणी व फौजदारी न्यायालय (क.स्तर)
चांदूर बाजार

नगर परिषद कार्यालय, अचलपूर
जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **आशा प्रकाशराव शेवतकर,** पत्ता महेराबपुरा, अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.३० संगणक मालमत्ता क्र.**ACHA000/26635** जुना मालमत्ता क्र. **३०००७६५५** नझुल शिट क्र.**४-डी** प्लॉट नं.**६१** ही कर आकारणी नोंदवहीनुसार **नारायण गंगाराम शेवतकर** या नावाने असून वरील अर्जदार यांनी या **आशा प्रकाश शेवतकर व इतर ७** या नावाने फेरफार घेण्याकरिता **नझुल आखिव पत्रिका अन्वये दुरुस्ती करण्याकरीता** या कार्यालयामध्ये दिनांक **१६.११.२०२६** रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -

पुर्वेस - सरकारी रस्ता
पश्चिमेस - अमोल मेहरे यांचे घर
दक्षिणेस - रामदास सुरले यांचे घर
उत्तरेस - सरकारी गल्ली व पचपिपरे यांचे घर

शिक्का

मुख्याधिकारी,
नगर परिषद, अचलपूर

जाहीर नोटीस

विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती
आर.एम.जे.सी.क्र.४४८/२०२६ — ने.ता.१५.१०.२०२६

अर्जदार :
१. **विनोद श्रावणजी मालखेडे**, वय ५१ वर्षे, व्यवसाय-मजूरी रा.चौधरी पुरा, गडीपुरा, वार्ड क्र.२, करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार :
१. **सुरेश श्रावणजी मालखडे**,

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

बस-मोटारसायकलच्या भीषण धडकेत तरुणाचा जागीच मृत्यू; महिला गंभीर जखमी



कवठा कडूजवळ घडला अपघात

चांदूर रेल्वे/वार्ताहर

अमरावतीहून मालखेडमार्गे चांदूर रेल्वेकडे जाणाऱ्या महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसची आणि स्प्लेंडर मोटारसायकलची कवठा काडूजवळ समोरासमोर धडक झाली. या भीषण अपघातात मोटारसायकलस्वार अथर्व येळणे (वय २८, रा. अंजनगाव बारी) यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांच्यासोबत असलेल्या मीनाक्षी कळंबे (वय ३५, रा. निंभा) या गंभीर जखमी झाल्या. मिळालेल्या माहितीनुसार, अथर्व येळणे आणि मीनाक्षी कळंबे हे एमएच २७ जे ४५४ क्रमांकाच्या स्प्लेंडर मोटारसायकलने पळाखेडच्या दिशेने जात होते.

दरम्यान, कवठा काडूजवळ समोरून येणाऱ्या एसटी बसची त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक बसली. धडक इतकी भीषण होती की, अथर्व येळणे यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या मीनाक्षी कळंबे यांना प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी अमरावती येथील पराश्री रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पीएसआय डिकोनवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली या अपघाताचा पुढील तपास सुरू आहे.

समित्यांवर नियुक्ती केली, पण कामासाठी सुविधाच नाहीत!

माजी न्यायमूर्ती सुदाम देशमुख यांचे आयुक्तांना खुले पत्र

अमरावती/का.प्र.

महानगरपालिकेच्या दोन महत्त्वपूर्ण चौकशी समित्यांवर नियुक्ती करूनही कामकाजासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जात नसल्याने माजी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुदाम पं. देशमुख यांनी नाराजी व्यक्त केली आहे. गेल्या पाच महिन्यांपासून कार्यालयीन कक्ष, सहायक कर्मचारी आणि चौकशीसाठी आवश्यक कागदपत्रे मिळाली नसल्याचा आरोप करीत त्यांनी महापालिका आयुक्तांना खुले पत्र लिहिले आहे.

देशमुख यांच्याकडे तत्कालीन मुख्याधिकाऱ्यांच्या कार्यकाळातील आर्थिक अनियमिततेची चौकशी करून अहवाल सादर करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तसेच शहरातील रेवडी व



हातगाडीवर व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या चौकशी समितीच्या अध्यक्षपदाचीही जबाबदारी त्यांच्याकडे आहे. या दोन्ही समित्यांचे काम सुरू करण्यासाठी त्यांनी प्रशासनाकडे सहायक कर्मचारी, स्वतंत्र कार्यालयीन कक्ष आणि चौकशीसाठी आवश्यक फाईल्स उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. मात्र, पाच महिने उलटूनही प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे त्यांनी पत्रात म्हटले आहे.

यासंदर्भात त्यांनी अनेकदा महापालिकेच्या विधी कक्षात जाऊन कामकाज सुरू करण्याची तयारी दर्शविली. मात्र, प्रत्यक्षात बसण्यासाठी जागा, मदतीसाठी कर्मचारी आणि तपासणीसाठी कागदपत्रेही मिळाली नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. महापालिका आयुक्तांची प्रत्यक्ष भेटही होऊ शकली नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे. 'मी महापालिका प्रशासनाचा कर्मचारी नाही. त्यामुळे वारंवार विनंती करण्याचे मला कारण नव्हते व नाही. मात्र, या परिस्थितीत माझे म्हणणे सार्वजनिक करणे लोकहिताचे वाटते,' अशी भूमिका देशमुख यांनी खुल्या पत्रातून मांडली आहे.

आपल्या पत्राची दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक निर्देश द्यावेत आणि त्याबाबत आपणास कळवावे, अशी मागणी त्यांनी आयुक्तांकडे केली आहे. अन्यथा आवश्यक सुविधा आणि प्रशासनाचे सहकार्य मिळत नसल्याने दोन्ही चौकशी समित्यांवर काम करणे आपल्याला शक्य होणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. चौकशीची जबाबदारी सोपवूनही आवश्यक साधनसामग्री आणि प्रशासकीय सहकार्य मिळत नसल्याने महापालिकेच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

संक्षिप्त



साईनगर प्रभागातील विविध भागांचा उपमहापौरांचा पाहणी दौरा

अमरावती- साईनगर प्रभागातील विविध नागरी समस्यांची पाहणी करण्यासाठी महानगरपालिकेचे उपमहापौर सचिन भेंडे यांनी प्रभागातील विविध भागांचा दौरा केला. यावेळी त्यांनी तिरुपती नगर, सदनी नगर, साने गुरुजी नगर क्रमांक १, चंदन नगर आणि वडनेरवाडी परिसराला भेट देऊन नागरिकांशी थेट संवाद साधला व त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. या पाहणी दौऱ्यादरम्यान परिसरातील स्वच्छतेची स्थिती, झाडांमुळे निर्माण होणाऱ्या अडचणी, रस्त्यांची दुरवस्था, नाली बांधकाम तसेच इतर मूलभूत नागरी सुविधांशी संबंधित समस्यांबाबत नागरिकांनी उपमहापौरांचे लक्ष वेधले. नागरिकांनी मांडलेल्या विविध प्रश्नांची सचिन भेंडे यांनी गांभीर्याने दखल घेत संबंधित महानगरपालिका अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना नियमित राबविण्याची ग्वाहीही यावेळी देण्यात आली. नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेऊन त्यांचे निराकरण करणे, प्रभागात मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे आणि साईनगर प्रभागाचा सर्वांगीण विकास साधणे हेच आपले प्राधान्य असल्याचे उपमहापौर सचिन भेंडे यांनी यावेळी स्पष्ट केले. आता संबंधित समस्यांवर प्रशासनाकडून कितपत लवकर कार्यवाही होते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

कांडली येथे ८१ हजारांची घरफोडी

अमरावती- परतवाडा ठाण्याच्या हद्दीतील कांडली येथील रहिवासी एका नागरिकाचे घर फोडून ८१ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास करण्यात आला. कांडली येथील रहिवासी दिनेश सगणे (५०) हे भाऊबीजेनिमित्त कुटुंबासह गावी गेले होते. या काळात अज्ञात चोरट्याने त्यांचे घर फोडून सोन्या-चांदीचे दागिने व रोख असा एकूण ८१ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. ही बाब लक्षात आल्यावर दिनेश सगणे यांनी परतवाडा ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

शेतशिवारातून केबल चोरला

अमरावती- शिरखेड ठाण्याच्या हद्दीतील नेरपिंगळाई शिवारातील शेतकऱ्यांच्या शेतातून १६७ मीटर केबल चोरून नेण्यात आला. नेरपिंगळाई शिवारातील वैभव राऊत (३५) यांच्यासह अन्य शेतकऱ्यांच्या शेतातील विहिरीमधील १६ हजार ७०० रुपये किमतीचा केबल अज्ञात चोरट्याने चोरून नेला.

गुरुदेव सेवकांचा जिल्हावार कार्यकर्ता मेळावा व सत्कार सोहळा उत्साहात

तिवसा/वार्ताहर

वं. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या ५८ व्या स्मृतीदिनानिमित्त श्रीगुरुदेव आध्यात्म गुरुकुल, गुरुकुंज मोझरी व पद्मश्री फाउंडेशन नागपूर द्वारा आयोजित गुरुदेव प्रचारकांचा जिल्हावार कार्यकर्ता मेळावा व सत्कार समारंभ पार पडला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. ओमप्रकाश भारती विभाग अध्यक्ष, प्रदर्शनकारी कला विभाग, महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय वर्धा यांनी भूषविले. तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आचार्य हरि वेरूळकर गुरुजी संस्थापक राष्ट्रधर्म प्रचार समिती गुरुकुंज हे होते. कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून लाभलेले डॉ. श्रीराम राठोड साहेब माजी अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर, संचालक राजीव गांधी इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स आदीलाबाद. डॉ. रमेश वत्सला विश्वनाथ थोरात साहेब, सदस्य रंगभूमी प्रयोग परीनिरीक्षक मंडळ महाराष्ट्र शासन मुंबई., रवी मानव संचालक गुरुकुल, गुरुकुंज मोझरी. डॉ. संजय आदमने अध्यक्ष पद्मश्री फाउंडेशन नागपूर. या सर्व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

सर्वप्रथम सर्व मान्यवरांचा शाल, श्रीफळ व सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर मानद डि.लीट



पदवी प्राप्त प्रचारकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला त्यात प्रामुख्याने डॉ. रेखा येवतीकर पुणे. डॉ. सुजय सुंदरराव देसाई कोल्हापूर, डॉ. अनंत महाराज कुंडकर अंजनखेड यवतमाळ, डॉ. संजय लक्ष्मणराव गायकवाड अकोला, डॉ. शितल ढोले वर्धा, डॉ. सविता तायडे दर्यापूर, डॉ. भास्करराव सुखदेवराव भटकर अमरावती, डॉ. प्रभाकरराव गायकवाड आर्वी, डॉ. शंकरराव मोहोड वर्धा, डॉ. प्रमोद भोंगे पुलगाव, तर प्रा. डॉ. संध्या देशमुख यांना पद्म पुरस्कार, माई सिंधु सपकाळ पुरस्कार, मानद डॉक्टरेट पदवी पुरस्कार आणि प्रा. सविता जयवंत खरवडे ब्रह्मपुरी यांना माई सिंधु सपकाळ जीवन गौरव पुरस्कार, राज्यस्तरीय अभंग भूषण पुरस्कार डॉ. अमित लांडगे वर्धा यांना देण्यात आला. सन्माननीय मुकुंद बाबारावजी पुनसे यांना राज्यस्तरीय श्रीगुरुदेव जीवन गौरव पुरस्कार, सुरेश पवार व रुपरावजी सेलगरे वर्धा यांना श्री गुरुदेवसेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाचे संचालन डॉ. प्रमोद भोंगे ग्रामगीताचार्य यांनी केले. तर प्रास्ताविक डॉ. संजय आदमने यांनी केले. प्रमुख मान्यवरांचे मनोगत या ठिकाणी झाले त्यात, प्रा. डॉ. ओमप्रकाश भारती, आचार्य श्री वेरूळकर गुरुजी, डॉ. श्रीराम राठोड, डॉ. संध्या देशमुख, डॉ. रमेश थोरात. या सर्वांनी वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे साहित्य, ग्रामगीता आणि सर्व संतांचे विचार समाजाला अंधश्रद्धा, कर्मकांड, अनिष्ट रूढया पासून दूर ठेवण्यास मदत करून सामाजिक परिवर्तनास सहाय्य करते. कार्यक्रमाचे आभार डॉ. शंकर मोहोड. वर्धा यांनी केले. डॉ. संजय आदमने यांनी श्री गुरुदेव अध्यात्म गुरुकुल, गुरुकुंज मोजरीचे संचालक रवी मानव आणि त्यांचे सहकारी सेवक यांना विशेष धन्यवाद देऊन कार्यक्रम चांगल्या रीतीने पार पडला.

बोअरवेल आणि विहीर खोदकामावरील निर्बंध १५ डिसेंबरपर्यंत शिथिल

अमरावती/का.प्र.

शेतीविषयक कामे, पिकांचे संवर्धन आणि सिंचनाची निकड लक्षात घेता जिल्ह्यात शेतीविषयक कामांसाठी नवीन बोअरवेल (विंधन विहीर) आणि विहीर खोदकाम, विहीर बळकटीकरणावरील निर्बंध १५ डिसेंबर २०२६ पर्यंत तात्पुरत्या स्वरूपात शिथिल करण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष आशिष येरेकर यांनी यासंदर्भातील आदेश जारी केले आहेत.

दुष्काळ सदृश्य स्थिती पाहता संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर भूजल स्रोतांचे संरक्षण आणि पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी यापूर्वी जिल्ह्यात



बोअरवेल आणि विहीर खोदकामावर निर्बंध घालण्यात आले होते. मात्र, सध्याची कृषीविषयक कामांची तातडी लक्षात घेता या निर्णयात तात्पुरती सूट देण्यात आली आहे. या आदेशानुसार, १५ डिसेंबर पर्यंत शेतकऱ्यांना शेतीच्या कामांसाठी नवीन बोअरवेल किंवा विहीर खोदण्यासाठी प्रशासनाची विशेष परवानगी घेण्याची अट लागू राहणार नाही.

ही सवलत केवळ शेतीविषयक कामांसाठीच लागू राहणारबाहे. या कामासोबतच शेतपरिसरात विहीर पुनर्भरण, विंधन विहीर पुनर्भरण, जलतारा आणि इतर जलसंधारणविषयक उपाययोजना करणे बंधनकारण करण्यात आले आहे. हा आदेश तत्काळ प्रभावाने लागू करण्यात आला असून १५ डिसेंबर नंतर बोअरवेल आणि विहीर खोदकामाबाबतचे पूर्वीचे निर्बंध पुन्हा पूर्ववत लागू होतील, असेही या आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

घरासमोर उभी दुचाकीची चोरी

अमरावती - घरासमोर उभी करून ठेवलेली दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची घटना देवदत्त नगर, बाकडेवाडी परिसरात घडली. याप्रकरणी पोलिसस्टेशन गाडगेनगर, येथे चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसस्टेशन गाडगेनगर येथे अप. क्र. ९६६/२६, कलम ३०३ (२) बीएनएस अन्वयेहा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. फिर्यादी गणेश दीपक काटोके (२७) रा. देवदत्तनगर बाकडे वाडी, अमरावती यांनी दिलेल्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली. फिर्यादींच्या तक्रारीनुसार, त्यांनी त्यांची दुचाकी क्रमांक एमएच २७ डीएन १८७७ तिची किंमत ३० हजार रुपये आहे. ठेवली होती. त्यानंतर ते झोपण्याकरिता गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी ०८.३० वाजताच्या दरम्यान त्यांना त्यांची गाडी दिसून आली नाही. आजूबाजूला शोध घेतला असता ती मिळून आली नाही. ती कोणीतरी चोरून नेली, अशी फिर्यादीची तक्रार आहे. या प्रकरणाचा पुढील तपास गाडगेनगर पोलिस करीत आहेत.

१८७ कोटींच्या वीज बिल वसुलीसाठी महावितरणची मोहीम तीव्र

साडेतीन हजार वीज ग्राहकांचा वीज पूरवठा खंडित

अमरावती/का.प्र.

अमरावती परिमंडळातील घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक तसेच इतर लघुदाब वीज ग्राहकांकडे १८७ कोटी रुपयांचे वीज बिल थकीत असून, या रकमेच्या वसुलीसाठी महावितरणकडून विशेष मोहीम राबविण्यात येत असून, या मोहिमेदरम्यान बिल भरण्यास प्रतिसाद न देणाऱ्या परिमंडळातील ३ हजार ५७२ ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे.

वीज बिलाची वसुली करणे हा महावितरणचा उद्देश असून, ग्राहकांवर कारवाई करणे अपेक्षित नाही. मात्र, वीज बिलांचा भरणा न झाल्यास नाइलाजास्तव वीजपुरवठा खंडित करण्यासारखी कारवाई करावी लागते. ही कटू कारवाई टाळण्यासाठी ग्राहकांनी आपली चालू तसेच थकीत वीज बिले वेळेत भरून महावितरणला सहकार्य करावे, असे आवाहन अमरावती परिमंडळाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी केले आहे. परिमंडळातील लघुदाब वीज ग्राहकांकडे असलेल्या एकूण १८७ कोटी रुपयांच्या देयकांमध्ये अमरावती जिल्ह्यातील ७६ कोटी रुपये, तर यवतमाळ जिल्ह्यातील १११ कोटी रुपयांच्या थकबाकीचा समावेश आहे.

अमरावती जिल्ह्यातील विभागनिहाय थकबाकीचा विचार करता अचलपूर विभागाकडे १८ कोटी ७० लाख, अमरावती ग्रामीण विभागाकडे १६ कोटी, अमरावती शहर विभागाकडे ३४ कोटी आणि मोर्शी विभागाकडे ७ कोटी ३० लाख रुपयांची वीज बिले थकीत आहेत. दुसरीकडे, यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा विभागाकडे १८ कोटी ३४ लाख रुपये, पांढरकवडा विभागाकडे २४ कोटी २५ लाख रुपये, पुसद विभागाकडे २९ कोटी ३९ लाख रुपये, तर यवतमाळ विभागाकडे ३८ कोटी ७१ लाख रुपयांची थकबाकी आहे. दरम्यान, वीज बिल वसुली मोहिमेला गती देताना महावितरणने वीज बिल भरण्यास प्रतिसाद न देणाऱ्या ३ हजार ५७२ ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित केला आहे. यामध्ये अमरावती जिल्ह्यातील २ हजार ८८९, तर यवतमाळ जिल्ह्यातील ६८३ ग्राहकांचा समावेश आहे.

ऑनलाइन सुविधाही उपलब्ध

वीज ग्राहकांना वीज बिल भरण्यासाठी महावितरणने विविध पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. महावितरणच्या अधिकृत वीज बिल भरणा केंद्रांसह www.mahadiscom.in या संकेतस्थळावरून, महावितरणच्या मोबाईल ॲपद्वारे, मोबाईल वॉलेट तसेच विविध ऑनलाइन सुविधांच्या माध्यमातून ग्राहकांना वीज बिलाचा भरणा करता येतो. त्यामुळे ग्राहकांनी वीजपुरवठा खंडित होण्याची वेळ येऊ न देता आपली चालू व थकीत वीज बिले तातडीने भरावीत, असे आवाहन महावितरणने केले आहे.

कर्जमाफीचा दिलासा अपुरा; शेतकरी आत्महत्यांचे सत्र कायम

अमरावती/का.प्र.

कर्जमाफीच्या घोषणा, मदतीची पॅकेजेस आणि शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी राबवण्यात येत असलेल्या विविध शासकीय योजनांनंतरही अमरावती जिल्ह्यातील बळीराजाची विवंचना संपलेली नाही. नापिकी, आर्थिक चणचण आणि कर्जाच्या डोंगराखाली दबलेल्या जिल्ह्यातील तब्बल १४३ शेतकऱ्यांनी जानेवारी ते ऑक्टोबर २०२६ या दहा महिन्यांच्या कालावधीत मृत्यूला कवटाळले असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, मदतीसाठी पात्र ठरलेल्या कुटुंबांपैकी केवळ ३७ कुटुंबांनाच मदतीचा पहिला हप्ता मिळाला असून, ७२ प्रकरणे अद्याप प्रशासकीय चौकशीतच अडकून पडली आहेत. जिल्हा प्रशासनाच्या अहवालानुसार, जिल्ह्यात गेल्यावर्षी म्हणजेच २०२५ मध्ये एकूण १८६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. यंदाही हे सत्र कायम राहिले असून,



दहा महिन्यांत १४३ बळी

ऑक्टोबर अखेरपर्यंत ऑक्टोबर १९२५६ १२ ५उ रअखेरपर्यंत हा आकडा १४३ वर पोहोचला आहे. यंदा नोंदवण्यात आलेल्या १४३ आत्महत्यांच्या प्रकरणांपैकी ४९ प्रकरणे सरकारी मदतीसाठी पात्र ठरवण्यात आली आहेत, तर २२ प्रकरणे अपात्र ठरली आहेत. उर्वरित ७२ प्रकरणांची चौकशी अद्याप प्रलंबित असून, एक प्रकरण फेरचौकशीसाठी पाठवण्यात आले आहे. पात्र ठरलेल्या ४९ कुटुंबांपैकी ३७ कुटुंबांना मदतीचा पहिला हप्ता वितरित करण्यात आला असला, तरी दोन पात्र कुटुंबे अद्याप एका पैशाच्या मदतीच्या प्रतीक्षेत आहेत.

विद्यापीठ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे १८ नोव्हेंबरला 'लेखणी बंद' आंदोलन

अमरावती/का.प्र.

उच्च शिक्षण संचालकांनी दिलेल्या लेखी आश्वासनानंतर, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचारी संघ आणि महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समितीने आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी पुकारलेल्या आंदोलनाच्या तारखांमध्ये बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. सुधारित कार्यक्रमानुसार, आता 'लेखणी बंद' आंदोलन १८ नोव्हेंबर रोजी तर 'काम बंद' आंदोलन २६ नोव्हेंबर, रोजी करण्यात येणार आहे.

आश्वासनानंतर आंदोलनात बदल - ५ नोव्हेंबर, रोजी कृती समितीच्या वतीने उच्च शिक्षण संचालनालय, पुणे येथे धडक मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चादरम्यान शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा घेतली. त्यानंतर, कर्मचाऱ्यांच्या धोरणात्मक मागण्यांसंदर्भात दिवाळीनंतर मंत्रालयात वित्त विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत तातडीने बैठक आयोजित करण्याचे लेखी आश्वासन डॉ. देवळाणकर यांनी दिले. या सकारात्मक आश्वासनाचा विचार करून समितीने आंदोलनाच्या तारखा पुढे ढकलल्या आहेत.

सुधारित आंदोलन कार्यक्रम- लेखणी बंद आंदोलन: पूर्वी १३ नोव्हेंबरला नियोजित असलेले हे आंदोलन आता बुधवार, १८ नोव्हेंबर रोजी राबविण्यात येईल. काम बंद आंदोलन: पूर्वी १८ नोव्हेंबरला नियोजित असलेला हा टप्पा आता गुरुवार, २६ नोव्हेंबर २०२६ रोजी राबविण्यात येईल. बेमुदत काम बंद: मंत्रालय स्तरावर सकारात्मक निर्णय न झाल्यास या बेमुदत आंदोलनाची पुढील तारीख स्वतंत्रपणे जाहीर केली जाईल.

कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्या- सातव्या वेतन आयोगानुसार १०:२०:३० वर्षांची सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करणे, पात्र कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पाच दिवसांचा आठवडा लागू करणे, विद्यापीठे व महाविद्यालयांतील रिक्त पदे भरण्यास तात्काळ मंजुरी देणे, सेवानिवृत्तीचे वय ५८ वरून ६० वर्षे करणे.

मंत्रालय स्तरावर होणाऱ्या बैठकीत सदर मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय होईल अशी अपेक्षा आहे; मात्र समाधानकारक निर्णय न झाल्यास आंदोलन अधिक तीव्रतेने राबविण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. तरी सर्व पदाधिकारी व सदस्यांनी या सुधारित कार्यक्रमाची नोंद घेऊन आंदोलनासाठी संघटनात्मक तयारी व एकजूट कायम ठेवावी, असे आवाहन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचारी संघाचे अध्यक्ष अजय देशमुख, महासचिव नरेंद्र घाटोळ यांनी केले आहे.

रविवारी प्राथमिक शिक्षक समितीची राज्य कार्यकारिणी सभा

अमरावती- महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीची राज्य कार्यकारिणी सभा रविवार २२ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता गंधर्व लॉन्स, उमरगा, जि. धाराशिव येथे होणार आहे. सभा राज्याध्यक्ष विजय दत्तदेव कोंबे यांच्या अध्यक्षतेखाली होईल. सभेला राज्य, विभागीय कार्यकारिणी पदाधिकारी, सदस्य, जिल्हा / शहर शाखा अध्यक्ष व सरचिटणीस यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी केले आहे. जिल्हावार सभासद नोंदणी व राज्य देय हिस्सा आढावा, जुन्या जिल्हा शाखांना मंजुरी आदी विषय असतील. या सभेला शिक्षक नेते उदय शिंदे, राज्याध्यक्ष विजय कोंबे, राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर, राज्य सल्लागार विजयकुमार पंडीत, महादेव पाटील माळवदकर, राज्य उपाध्यक्ष राजन सावंत, आनंदा कांदळकर, विलास कंटेकुरे, राज्य कार्याध्यक्ष सयाजी पाटील, राज्य कोषाध्यक्ष नंदकुमार होळकर, राज्य संघटक राजेंद्र खेडकर, सुरेश पाटील, राज्य कार्यालयीन चिटणीस किशोर पाटील, सतिश सांगळे, राज्य संपर्क प्रमुख किसन बिरादार, राज्य प्रवक्ता नितिन नवले, राज्य प्रसिद्धी प्रमुख राजेश सावरकर, राज्य ऑडिटर पंडित नागरगोजे, महिला आघाडी प्रमुख वर्षा केनवडे, नपा-मनपा आघाडी प्रमुख सुधाकर सावंत, जुनी पेन्शन आघाडी प्रमुख प्रफुल्ल पुंडकर, उर्दू आघाडी प्रमुख सैयद शफीक अली हे उपस्थित राहणार आहेत.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

ग्रामीण भागात खासगी फायनान्स कंपन्यांचा 'कर्जपाश'

-वसुलीच्या जाचाला कंटाळून आत्महत्यांचे सत्र वाढले

-शेतकरी व कष्टकरी खासगी कंपन्यांच्या विळख्यात

-कर्जवसुलीच्या तगाद्यामुळे ग्रामीण कुटुंबे उद्ध्वस्त

अमरावती/प्रतिनिधी:-

ग्रामीण भागात सध्या खासगी फायनान्स आणि मायक्रो-फायनान्स कंपन्यांचे जाळे मोठ्या प्रमाणावर पसरले असून, या कंपन्यांच्या मनमानी कारभारामुळे आणि कर्जवसुलीच्या अमानुष तगाद्यामुळे सामान्य नागरिक व शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत असल्याचे धक्कादायक चित्र समोर येत आहे. दुष्काळ, नापिकी आणि राष्ट्रीयीकृत बँकांकडून वेळेत पीककर्ज किंवा अर्थसहाय्य मिळण्यास होणारी टाळाटाळ यामुळे गरजू ग्रामस्थ या खासगी कंपन्यांच्या सहज उपलब्ध होणाऱ्या पण महागड्या कर्जाच्या जाळ्यात अडकत आहेत.

ग्रामीण भागातील अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर आणि छोटे व्यावसायिक घरखर्च, शेतीची कामे किंवा वैद्यकीय गरजा भागवण्यासाठी खासगी फायनान्स कंपन्यांकडून कर्ज घेतात. सुरुवातीला अत्यंत सोप्या अटींवर कर्ज दिले जाते. मात्र, अवकाळी पाऊस किंवा दुष्काळी परिस्थितीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास हप्ते थकतात. अशा वेळी या कंपन्यांचे वसुली प्रतिनिधी थेट घरी येऊन संबंधित कुटुंबावर प्रचंड मानसिक दबाव आणतात. सामाजिक प्रतिष्ठेला धक्का लागण्याच्या भीतीने आणि सततच्या अपमानाला कंटाळून अनेकजण नैराश्याच्या गर्तेत जात आहेत.



दहा महिन्यांत १४३ बळी

अमरावती : कर्जमाफीची घोषणा, शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी राबवण्यात येत असलेल्या विविध योजनांनंतरही अमरावती जिल्ह्यातील शेतक-यांची विवंचना संपलेली नाही. नापिकी, आणि कर्जाच्या डोंगरामुळे जिल्ह्यातील तब्बल १४३ शेतकऱ्यांनी जानेवारी ते ऑक्टोबर २०२६ या दरम्यान मृत्यूला कवटाळल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, मदतीसाठी पात्र ठरलेल्या कुटुंबांपैकी केवळ ३७ कुटुंबांनाच मदतीचा पहिला हप्ता मिळाला असून, ७२ प्रकरणे अद्याप प्रशासकीय चौकशीतच आहेत. जिल्हा प्रशासनाच्या अहवालानुसार, जिल्ह्यात गेल्यावर्षी म्हणजेच २०२५ मध्ये एकूण १८६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. यंदाही हे सत्र कायम राहिले असून, ऑक्टोबर अखेरपर्यंत हा आकडा १४३ वर पोहोचला आहे. यंदा नोंदवण्यात आलेल्या १४३ आत्महत्यांच्या प्रकरणांपैकी ४९ प्रकरणे सरकारी मदतीसाठी पात्र ठरवण्यात आली आहेत, तर २२ प्रकरणे अपात्र ठरली आहेत. उर्वरित ७२ प्रकरणांची चौकशी अद्याप प्रलंबित असून, एक प्रकरण फेरचौकशीसाठी पाठवण्यात आले आहे.

एका कर्जासाठी दुसरे कर्ज घेण्याची जीवघेणी साखळी:

फायनान्स कंपन्यांच्या कार्यपद्धतीमुळे ग्रामीण भागात 'कर्जाची साखळी' तयार झाली आहे. एका कंपनीचा थकलेला हप्ता भरण्यासाठी दुसऱ्या कंपनीकडून कर्ज उचलणे आणि दुसऱ्याचे कर्ज फेडण्यासाठी तिसऱ्या कंपनीचे दार ठोठावणे, अशा विचित्र चक्रव्यूहात अनेक कुटुंबे अडकली आहेत. व्याजाचा वाढता डोंगर आणि उत्पन्नाचे घटलेले स्रोत यामुळे हे कर्ज फेडणे अशक्य होऊन बसते. या आर्थिक विवंचनेतूनच ग्रामीण भागात विष प्राशन करून किंवा इतर मार्गाने जीवन संपवण्याच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे.

प्रशासकीय अंकुशाची आणि कठोर कारवाईची मागणी: शासनाने दुष्काळी परिस्थिती जाहीर केलेली असताना किंवा संकटाच्या काळात कर्जवसुलीला स्थगिती देण्याचे निर्देश असतानाही, खासगी फायनान्स कंपन्यांकडून या नियमांना केराची टोपली दाखवली जात असल्याचा आरोप होत आहे. या कंपन्यांच्या अनधिकृत वसुली एजंट्सवर कोणाचाही वचक राहिलेला नाही. त्यामुळे, ग्रामीण भागातील सामान्य नागरिक आणि शेतकऱ्यांचे प्राण वाचवण्यासाठी शासनाने या खासगी फायनान्स कंपन्यांच्या कारभाराची सखोल चौकशी करावी, वसुलीच्या नावाखाली मानसिक छळ करणाऱ्या कंपन्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत आणि राष्ट्रीयीकृत बँकांची कर्जप्रक्रिया सुलभ करावी, अशी जोरदार मागणी ग्रामीण भागातून जोर धरू लागली आहे.

मानवता जपा, अन्यथा आंदोलन करू



ग्रामीण भागात आर्थिकदृष्ट्या दुर्बल अथवा अल्पभूधारक शेतकरी खाजगी फायनान्स कंपनी कडून कर्ज घेतात, त्या कर्जाचे व्याज सुद्धा अव्वा चे सव्वा असते. गरजेपोटी गरीब अल्पभूधारक शेतकऱ्यांना खाजगी फायनान्स कंपनीचे दार ठोठावावे लागते. सद्या पूर्णतः दुष्काळ परिस्थिती असल्याने गरीब घटक व अल्पभूधारक शेतकरी यांचे कडील उत्पन्नाचे स्रोत बंद झाले आहे.त्यामुळे खाजगी फायनान्स कंपन्यांनी मानवता जपून सक्तीची वसुली बंद करावी, अन्यथा गोरगरीब जनतेकडून सक्तीने वसुली करणाऱ्या फायनान्स कंपन्यांचे कार्यालयात आंदोलन करू.

-सागर भवते, जिल्हा महासचिव, वंचित बहुजन युवा आघाडी अमरावती.



मायक्रो फायनान्स कंपनीच्या गुंडगिरीमुळे ग्रामीण भागातील शेतकरी व शेतमजूर विशेष करून महिला बचत गटातील महिला भगिनी त्रस्त आहेत. या प्रकरणांमध्ये सन्माननीय जिल्हाधिकारी अमरावती व पोलीस अधीक्षक अमरावती यांनी जातीने लक्ष घालून फायनान्स कंपन्यांवर वचक निर्माण केला पाहिजे.

-प्रकाश साबळे, माजी जि.प.सदस्य



'दुष्काळाने शेतकरी उद्ध्वस्त झाला, बँकांनी पाठ फिरवली आणि खासगी फायनान्स कंपन्यांनी वसुलीचा फास आवळला! शेतकरी आत्महत्यांच्या तक्रारी समोर येत असताना सरकार नेमके काय करत आहे? मुख्यमंत्र्यांनी केवळ घोषणा न करता सक्तीची वसुली तात्काळ थांबवावी. कर्जबाजारी शेतकऱ्यांचे जीव वाचवणे ही सरकारची जबाबदारी आहे; कंपन्यांच्या नफ्याचे रक्षण करणे नव्हे!'

-किशोर तिवारी, शेतकरी नेते, माजी अध्यक्ष शेतकरी मिशन



ग्रामिण भागातील नागरिकांचा मुख्य स्रोत शेती आहे. यावर्षी कमी पावसाने शेतातील उत्पादन घटले असून अशातच ग्रामिण भागात खुप मोठया प्रमाणात खाजगी फायनान्स कंपन्याचे जाळे पसरले आहे. हे फायनान्स कंपनीवाले ग्रामिण भागातील नागरिकांना वसुलीचा तगादा लावत आहेत. याच कारणामुळे काही ठिकाणी आत्महत्या देखिल झाल्या. ग्रामिण भागात खाजगी फायनान्स कंपनीच्या विळख्यात अडकलेले नागरिक हे एक कर्ज फेडण्यासाठी दुसऱ्या कर्जाचा आधार घेत आहेत. आधीच डोक्यावर असलेले एक खाजगी कर्ज व त्यातच भर म्हणून दुसरेही कर्ज व सतत खाजगी फायनान्स कंपनीचा कर्ज भरण्याचा तगादा, यामुळे ग्रामिण कुटुंबे ही उद्धवस्त होत आहेत. याला शासनाने आळा घालणे महत्वाचे आहे.

-प्रतिक पाटील राऊत, युवासेना जिल्हा सरचिटणीस अमरावती

अमरावतीच्या बहुप्रतीक्षित रेल्वे उड्डाणपुलाच्या पुर्ननिर्माण कामाला वेग!

एका वर्षात पुलाचे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट,आ.खोडके यांच्याकडून पाहणी





अमरावती/प्रतिनिधी:-

जवळपास ६० वर्षे जुना आणि जीर्ण झालेला रेल्वे उड्डाणपूल सुरक्षिततेच्या कारणास्तव वाहतुकीसाठी बंद होता. त्यामुळे नागरिकांना वाहतूक कोंडीचा मोठा त्रास सहन करावा लागत होता.

या समस्येची दखल घेत आमदार सुलभा संजय खोडके यांनी सातत्याने शासनस्तरावर पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळून (पान २ वर)

जनगणनेच्या दुसरा टप्प्यास सुरुवात

-दोन दिवसांचे प्रशिक्षण

अमरावती/प्रतिनिधी:-

देशाच्या जनगणना २०२७ साठी दुसऱ्या टप्प्यास सुरवात झाली आहे. यासाठी जिल्ह्यात जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यासाठी नियुक्त अधिकारी-कर्मचारी यांच्या दोन दिवसीय प्रशिक्षणास सुरवात झाली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात प्रशिक्षण होत आहे.

प्रशिक्षणाचे उद्घाटन महापालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांच्या उपस्थित पार पडले. जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यासाठी संक्षिप्त घरयादी आणि गणना गट तयार करण्यात येणार आहे. या प्रक्रियेस सुरुवात झाली आहे.



यासाठी जिल्हास्तरीय दोन दिवसांचे प्रशिक्षण घेण्यात येत आहे. प्रशिक्षण देण्यासाठी जनगणना संचालनालयाचे उपनिबंधक वाय. एस. पाटील, ऋषिकेश पाथरे प्रशिक्षक म्हणून उपस्थित आहेत.

जनगणनेचा दुसरा टप्पा हा व्यापक स्वरूपाचा असल्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रगणक, पर्यवेक्षक आणि जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मुख्याधिकारी आणि त्यांची जनगणना संबंधित यंत्रणा, तसेच अमरावती महानगरपालिका येथील जनगणनेशी संबंधित यंत्रणा सदर प्रशिक्षणास उपस्थित आहेत.

जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यात प्रत्येक व्यक्तीनिहाय ४० प्रश्न विचारले जाणार आहेत. यातून त्यांची सामाजिक, आर्थिक स्थिती पाहण्यात येणार आहे. नागरिकांना स्वत: माहिती भरण्याचा पर्यायही देण्यात येणार आहे.

त्यानंतर प्रगणक प्रत्येक घरी जाऊन माहितीची पडताळणी करणार आहेत. तसेच जनगणनेच्या वेळी येणाऱ्या समस्या आणि त्यावरील उपायांची माहिती या प्रशिक्षणात देण्यात येत आहे. प्रशिक्षणासाठी जणगणना कक्षाच्या सहायक महसूल अधिकारी राधिका देशमुख, महसूल सहायक प्रियंका राऊत, राहूल कोठे, चेतना वानखडे यांनी सहकार्य केले.

सरपंच पदासाठी २० नोव्हेंबरला आरक्षण सोडत

आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा जास्त,शासनाच्या निर्देशानुसार सुधारणा

अमरावती/प्रतिनिधी:- जिल्ह्यातील सार्वत्रिक निवडणुकीद्वारे गठीत होणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाचे आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा जास्त होत असल्यामुळे, शासनाच्या निर्देशानुसार आरक्षणामध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. केवळ नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि खुला प्रवर्ग (महिलांसह) बदल होत असल्याने यासाठी शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर रोजी संबंधित तहसिल कार्यालयात आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या ग्रामपंचायत निवडणूक विभागाने दिलेल्या माहितीनुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या आरक्षणामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. केवळ नागरिकांचा मागास प्रवर्ग व खुला प्रवर्ग (महिलांसह) यांच्या आरक्षणामध्ये बदल होणार आहे. सुधारीत आरक्षण निश्चित करण्यासाठी तसेच नव्याने स्थापित झालेल्या ग्रामपंचायतीचे सरपंचपदाचे प्रवर्गनिहाय आरक्षण महिलांसह निश्चित करण्यासाठी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

सर्व संबंधित तालुक्यांमध्ये प्राधिकृत अधिकारी तथा तहसीलदार आणि नियंत्रण अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ही सोडत पार पडणार आहे.अमरावती तालुक्यासाठी अनिलकुमार भटकर, संतोष आठरे, भातकुली तालुक्यासाठी महेश घाटुळे, अक्षय मांडवे, मोर्शी तालुक्यासाठी प्रदिप (पान २ वर)

भरधाव दुचाकीची बसला धडक; युवकाचा मृत्यू

-आई गंभीर जखमी, अंजनगाव बारीत शोककळा

अंजनगाव बारी/प्रतिनिधी:-

मालखेड रेल्वे रोडवरील अंडा फार्मजवळील कवठा कडू फाट्याजवळ भरधाव दुचाकीची बसला जोरदार धडक बसून झालेल्या भीषण अपघातात अंजनगाव बारी येथील २२ वर्षीय युवकाचा जागीच मृत्यू झाला, तर त्याच्यासोबत दुचाकीवर प्रवास करणारी त्याची मोठी आई गंभीर जखमी झाली. ही दुर्दैवी घटना आज (दि.१६) सकाळी सुमारे ११.१५ वाजताच्या सुमारास घडली.





कृष्णा दिलीप येरणे (वय २२, रा. अंजनगाव बारी) हा आपल्या मोठ्या आईला सोबत घेऊन कवठा येथून अंजनगाव बारीकडे दुचाकीने येत होता. दरम्यान, कवठा कडू फाट्याजवळ एमएच- ४० एक्यू ६२०८ क्रमांकाच्या बसला दुचाकीची जोरदार धडक बसली. धडक इतकी भीषण होती की दुचाकी थेट बसच्या खाली गेली. या अपघातात कृष्णा येरणे याचा जागीच मृत्यू झाला, तर त्याची मोठी आई गंभीर जखमी झाली.

या अपघाताच्या वृत्ताने अंजनगाव बारी (पान २ वर)

बिबट्याचा गोठ्यात बांधलेल्या गाईवर हल्ला

-सिंभोरा शेत शिवारातील घटना

मोर्शी/प्रतिनिधी:-





मोर्शीपासून ८ किमी अंतरावर अप्परवर्धा धरण लगतच असलेल्या सिंभोरा शेत शिवारातील राजेंद्र नथुजी शेळके यांच्या शेतात जर्सी गाईवर बिबट्याने हल्ला चढवून तिला जिवंत मारून टाकल्याची घटना आज दि.१६ नोव्हेंबर रोजी उघडकीस आली. त्यामुळे आता पुन्हा सिंभोरा,भांबोरा,कवठाळ, इतर गावातील नागरिकांमध्ये दहशत निर्माण झाली आहे.

सिंभोरा येथील राजेंद्र नथुजी शेळके यांची तीन एकर शेती सिंभोरा गावापासून एक किलोमीटर अंतरावर नशीरपूर ते सिंभोरा कॅनल रस्त्यावर असून त्यांच्या शेतात असलेल्या टीनाच्या गोठ्यात जनावरे बांधून ठेवली होती.राजेंद्र शेळके यांचा मुलगा मिलिंद शेळके हा नेहमीप्रमाणे काल दि.१५ नोव्हेंबर रोजी रात्री सहा वाजेपर्यंत शेतात होता.तो घरी परत आल्यानंतर मध्यरात्रीच्या सुमारास एका बिबट्याने शेतात प्रवेश करून गोठ्यात बांधलेल्या तीन वर्षाच्या जर्सी गाईवर हल्ला चढवून तिला खरचटत शेतात नेऊन जिवंत मारून टाकले. आज पुन्हा दि.१६ नोव्हेंबर रोजी मिलिंद शेळके हे आपल्या शेतात गेले असतांना त्यांना आपली गाय बिबट्याने खाल्ली असल्याचे प्रथमदर्शी आढळून आले. लगेच या घटनेची माहिती शेळके यांनी वनविभागाला दिली. वनपरिक्षेत्राधिकारी योगिता मगर यांच्या मार्गदर्शनाखाली मोर्शी वर्तुळाचे वनपाल बी.एस. अळसापुरे,पारडी बीटच्या वनपाल व्ही.आर. खपास यांनी घटनास्थळी धाव घेऊन वन विभागाच्या वतीने ट्रॅप व ड्रोन कॅमेराच्या साह्याने बिबट्याचा शोध घेणे सुरू (पान २ वर)

चार वर्षांपासून क्रीडा संकुलाचा मुख्य रस्ताच बंद; ट्रॅकचीही दुरवस्था!

नगराध्यक्षा प्रा. प्रियंका विश्वकर्मा यांच्याकडून पाहणी

चांदूर रेल्वे/प्रतिनिधी:-

चांदूर रेल्वे शहरातील विरूळ रोडवर असलेल्या क्रीडा संकुलाची गेल्या अनेक वर्षांपासून दुरवस्था झाली असून, खेळाडूंना सरावासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांचाही अभाव आहे. क्रीडा संकुलातील ट्रॅकची अवस्था खराब झाली असून, संकुलात प्रवेश करण्यासाठी असलेला मुख्य रस्ताही जवळपास चार वर्षांपासून बंद असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर खेळाडू व नागरिकांच्या तक्रारींची दखल घेत नगराध्यक्षा प्रा. प्रियंका निलेश विश्वकर्मा यांनी स्वतः क्रीडा संकुलाला भेट (पान २ वर)



भोजने दाम्पत्याच्या पोलीस कोठडीत २० नोव्हेंबरपर्यंत वाढ!

नवजात बालिकेच्या कथित विक्रीप्रकरणी तपास सुरू

अमरावती/प्रतिनिधी:-

नवजात बालिकेच्या विक्रीचा प्रयत्न केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आलेल्या डॉ. वैशाली भोजने आणि प्रफुल्ल भोजने या दाम्पत्याच्या पोलीस कोठडीत आणखी चार दिवसांची वाढ करण्यात आली आहे. सोमवार, १६ नोव्हेंबर रोजी त्यांची पोलीस कोठडी संपल्याने दोघांनाही न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना २० नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. तपासादरम्यान पोलिसांनी दाम्पत्याची कार आणि मोबाईल जप्त केले असून, डॉ. भोजने यांच्या स्वाक्षरीचे नमुनेही घेतले आहेत. फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या या प्रकरणाचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.



सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस कोठडीदरम्यान वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही भोजने दाम्पत्याची चौकशी केली. मात्र, चौकशीदरम्यान दोघांकडून वारंवार वेगवेगळी माहिती दिली जात असल्याचे समजते. अद्याप या प्रकरणातील महत्त्वाचे धागेदोरे हाती लागले नसल्याने पोलिसांसमोरील तपासाचे आव्हान कायम आहे. (पान २ वर)